ISSN 2320 - 0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९४२
(जानेवारी-जून २०२० / खंड १३, अंक १)


- विकासाचा पर्याय : भांडवलवाद ?
- सौम्य मंदी वा निम्नगामी अर्थव्यवस्था व त्यावरील उपाय
- आर्थिक मंदी – एक आव्हान
- २०१९ चे नोबेल पारितोषिक विजेते
- अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार
- The Journey of Human Development from HDI to LGBTI - Inclusion Index
- जैविक शेतीचे स्वरूप
- कृषी प्रत्यय : एक आढावा


## – व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची ५० वर्षे –


- भारतीय अधिकोषण व्यवस्था : राष्ट्रीयीकरणाची पार्श्वभूमी
- Banks and Non-Performing Assets
- राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या ठेवी आणि अग्रक्रम क्षेत्रासाठी वित्तपुरवठ्यात झालेले बदल
- भारतातील व्यापारी बँकांपुढील आव्हाने – एक टीप
- व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण ते विलीनीकरण
- Amalgamation of Public Sector Banks

ISSN 2320-0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९४२

(जानेवारी-जून २०२०/ खंड १३, अंक १)

❑ प्रमुख संपादक ❑
दि.व्यं.जहागिरदार

❑ सल्लागार मंडळ ❑
श्रीनिवास खांदेवाले
सुनील शिंदे
प्रतिभा काळमेघ
आशीष महातळे

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑
दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)–२६६१८५१, मो. ९८२२९२२९५१

## अनुक्रमणिका

- विकासाचा पर्याय : भांडवलवाद ?
  – मृणालिनी फडणवीस ..........१
- सौम्य मंदी वा निम्नगामी अर्थव्यवस्था व त्यावरील उपाय
  – श्रीनिवास खांदेवाले..........०५
- आर्थिक मंदी – एक आव्हान
  – वर्षा गंगणे..........१०
- २०१९ चे नोबेल पारितोषिक विजेते
  – दि.व्यं.जहागिरदार ..........१७
- अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार
  – रामदास माहोरे..........२२
- The Journey of Human Development from HDI to LGBTI -Inclusion Index
  - Anjali Kulkarni..........३१
- जैविक शेतीचे स्वरूप
  – गजानन भारती ..........४१
- कृषी प्रत्यय : एक आढावा
  – उमेश घोडेस्वार..........४७

**–व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची ५० वर्षे –**

- भारतीय अधिकोषण व्यवस्था : राष्ट्रीयीकरणाची पार्श्वभूमी
  – वनिता चोरे..........५४
- Banks and Non-Performing Assets
  - H.A. Hudda..........५९
- राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या ठेवी आणि अग्रक्रम क्षेत्रासाठी वितपुरवठ्यात झालेले बदल
  – प्राची दिलीप देशपांडे..........७०
- भारतातील व्यापारी बँकांपुढील आव्हाने – एक टीप
  – लाजवंती आर. टेंभुर्णे..........७६
- व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण ते विलीनीकरण
  – राजेश रामासा चव्हाण..........८०
- Amalgamation of Public Sector Banks
  - Madhuri Lele..........८९

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी
## (२०१९-२०)


- कार्याध्यक्ष
  डॉ. निवृत्ती पिस्तुलकर
- अध्यक्षा
  डॉ. मृणालिनी फडणवीस
- उपाध्यक्ष
  डॉ. राजेश बुरंगे
- सचिव
  डॉ.राजेश चव्हाण (अमरावती विभाग परिक्षेत्र)
  डॉ. विठ्ठल घिनमिने (नागपूर विभाग परिक्षेत्र)
- प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'
  डॉ. द्वि.व्यं. जहागिरदार
- जिल्हानिहाय प्रतिनिधी :
  डॉ. पुष्पा ज. उदासी (नागपूर शहर)
  डॉ. सुनिल कृ.शिंदे (नागपूर ग्रामीण)
  डॉ.विशाल वा. मालेकार (चंद्रपूर)
  प्रा. एस.बी.भुरे (भंडारा)
  डॉ.महेंद्र पां. गावंडे (वर्धा)
  डॉ. संजय ज. कोठारी (अमरावती )
  डॉ. डि.के.राठोड (अकोला )
  प्रा. दिलीप पा.महाजन (बुलढाणा)
  प्रा.माधुरी पं. राखुंडे (यवतमाळ)
  डॉ.मधुकर श्री.लाकलोडे (वाशिम)


आजीव सदस्यता शुल्क : रू. १०००/-आहे, ही रक्कम सचिव डॉ. राजेश चव्हाण, स्व. छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालय,अचलपूर कॅम्प, (जि.अमरावती) यांचेकडे ''विदर्भ अर्थशास्त्र परिषद'' या नावाने ड्राफ्टने पाठवावी.


- अक्षर जुळवणी व मुद्रक :
  कॉम्प्यूटर-नेटवर्क (नरेंद्र पांढरीकर)
  अमरावती. मो. ९८५०२८३२४६,७०२०४६७०२१ (whatsapp no.)
  email : narendrapandharikar@gmail.com


**: स्वागत मूल्य :**

१) परिषद सदस्य - १५० रू.
२) शैक्षणिक संस्था - २०० रू.

# संपादकीय .....

'अर्थमीमांसा' या संशोधन पत्रिकेचा खंड १३, अंक १ (जानेवारी - जून २०२०) आपल्यास सादर करताना प्रमुख संपादक म्हणून मला विशेष आनंद दोन कारणांसाठी होत आहे. पहिले कारण असे की अर्थमीमांसेने बारा वर्षाचा कालखंड पूर्ण केला आहे. दुसरी व तेवढीच महत्त्वाची घटना म्हणजे आपण परिषदेच्या स्थापनेची ५० वर्षेही पूर्ण करीत आहोत. हा अंक प्रसिद्ध करण्यासाठी परिषदेचे कार्याध्यक्ष, अध्यक्ष, सचिव, कार्यकारिणीचे सदस्य व 'अर्थमीमांसा' पत्रिकेचे सल्लागार मंडळ या सर्वांचेच सक्रिय सहकार्य लाभले हे सांगणे आवश्यक आहे.

वर्तमानकाळात भांडवलवाद आणि विकासप्रक्रिया यांची चर्चा होत असते. या पार्श्वभूमीवर मृणालिनी फडणवीस यांचा 'विकासाचा पर्याय : भांडवलवाद?' हा लेख वाचकांना निश्चितच विचार करण्याची दिशा दर्शवेल. सध्या काही वर्षांपासून भारतीय अर्थव्यवस्था ही सौम्य मंदीच्या अथवा घसरणीच्या अवस्थेत आहे. सौम्य-मंदीचे नेमके स्वरूप कोणते ? ती का निर्माण झाली? तसेच ही स्थिती दूर करण्यासाठी कोणते उपाय सूचवता येतील या बाबींचे विश्लेषणात्मक विवेचन श्रीनिवास खांदेवाले यांच्या लेखात आहे. सध्याच्या घसरणीवर प्रकाश टाकणारा वर्षा गंगणे यांचा 'आर्थिक मंदी- एक आव्हान' हा लेख मंदीच्या विविध पैलूंचे विवेचन करणारा आहे. २०१९ चा अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार यंदा अभिजीत बॅनर्जी, एस्थर डुफ्लो आणि मायकल क्रेमर यांना संयुक्तरित्या प्राप्त झाला. दि.व्यं.जहागिरदार यांनी अभिजीत बॅनर्जींच्या जीवनाचा आणि या तिघांनी जे संशोधन केले आहे त्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. विशेषत: त्यांनी अवलंबिलेल्या नमूना नियंत्रित चाचण्या घेतल्या होत्या त्यावर शास्त्रीय पद्धतीने स्पष्टीकरण केले आहे. रामदास माहोरे यांनी आपल्या लेखात प्रो. बॅनर्जी यांनी आपल्या सहकार्यांच्या द्वारे जे संशोधन केले त्याचे सविस्तर विवेचन, त्यांच्या Poor Economics या गाजलेल्या ग्रंथाच्या आधारे केले आहे.

आर्थिक विकास प्रक्रियेमध्ये आपण लोकसंख्ये संबंधित पुरूष आणि स्त्रिया या दोन लिंगांचा विचार करतो. गेल्या काही वर्षांपासून स्त्रीपुरुषांप्रमाणेच तृतीय लिंग (Third gender) या घटकाचा विचार सुरू झाला आहे. आश्लेषा कुळकर्णी यांनी आपल्या लेखात या बदलाचा आढावा घेऊन LGBTI या समावेशक देशनांक निर्मितीच्या होत असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला आहे. गजानन भारती यांनी वर्तमान काळात शेती पद्धतीत जे बदल झाले त्याचे अन्तर्गत जैविक शेतीची आवश्यकता, स्वरूप आणि या शेतीसमोरील आव्हाने इ. घटकांचे विवेचन आपल्या लेखात केले

आहे. कृषी क्षेत्रात ज्या प्रश्नाची वारंवार चर्चा होते असा प्रश्न म्हणजे कृषी प्रत्यय. उमेश घोडेस्वार यांनी या प्रश्नावर आकडेवारीच्या सहाय्याने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

यावर्षी आपण व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची ५० वर्षे झाल्याचे निमित्त साधून हा विषय विविध अंगांनी चर्चिला जावा म्हणून या अंकासाठी निवडला होता. सुर्दैवाने त्यावरील सहा लेख आपण या अंकात देत आहोत. १९६९ मध्ये १४ व्यापारी बँकांचे जे राष्ट्रीयीकरण झाले त्याची पार्श्वभूमी वनिता चोरे यांनी आपल्या लेखात विशद केली आहे. व्यापारी बँकांनी जी कर्जे दिलीत त्यातील बऱ्याच मोठ्या प्रमाणावरील कर्जे बुडीत खात्यात जमा होतात. या स्थितीचा आढावा सविस्तर आकडेवारीच्या सहाय्याने एच.ए. हुद्दा यांनी घेतला आहे. विशेषतः त्यांनी योग्य प्रकारे या बुडीत कर्जाच्या कारणांचाही शोध घेतला आहे. व्यापारी बँका कर्ज देतांना अग्रक्रम क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या नियमानुसार खरोखर कर्जपुरवठा करतात का याचे प्राची देशपांडे यांनी आपल्या लेखात स्पष्टीकरण दिले आहे. राष्ट्रीयीकृत बँकांसमोर जागतिकीकरणानंतर कोणती आव्हाने उभी आहे त्याचाही उल्लेख त्यांच्या लेखात आहे. लाजवंती टेंभुर्णे यांनी 'भारतातील व्यापारी बँकापुढील आव्हाने - एक टीप' या आपल्या लेखात जागतिकीकरणानंतर झालेले बदल सांगून या बँकासमोरील सात आव्हाने विशद केली आहेत. गेल्या काही वर्षांपासून काही व्यापारी बँकांच्या परस्परातील विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. त्याची सद्य:स्थिती राजेश चव्हाण यांनी आपल्या लेखात दर्शविली आहे. माधुरी लेले यांनीAmalgamation of Public Sector Bank' या लेखात विलीनीकरणाचा इतिहास सांगून बँक विलीनीकरणामुळे अर्थव्यवस्थेला होणाऱ्या संभाव्य लाभाची चर्चा केली आहे. तसेच या प्रक्रियेत निर्माण होणाऱ्या समस्यांचाही उहापोह केला आहे.

हा अंक सिद्ध करतांना सर्व लेखकांनी जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार, अभ्यासकांनी अर्थमीमांसेला आपले दर्जेदार संशोधनात्मक लेख वर्षभर पाठवत रहावे. तसेच अर्थमीमांसेला जाहिरातींची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी हातभार लावावा. जिल्हा प्रतिनिधींनी आपल्या जिल्ह्यातील महाविद्यालयांना अंक विकण्यासाठी प्रयत्न करावेत. शेवटी कॉम्प्यूटर नेटवर्कचे नरेंद्र पांढरीकर यांनी अंक सुबकपणे व वेळेत तयार करून दिला त्याबद्दल त्यांचे आभार.

२६ जानेवारी, २०२०.

स्थळ : अमरावती.

**(दि.व्यं.जहागिरदार)**

प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'

# विकासाचा पर्याय : भांडवलवाद?

**मृणालिनी फडणवीस**
कुलगुरू,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर.

ज्यांच्या माध्यमातून सामुदायिक भांडवलवाद उदयास आला आहे, (पश्चिमी राष्ट्रे) तेच म्हणत आहेत की, भांडवलवाद काम करत नाही. आता त्यांचे बदलेले मत प्रगतिशील देशांसाठी आव्हान आहे.

१९९२ साली (दरम्यान) याचे पर्याय म्हणजे 'जागतिकीकरण', ही शब्दावली आणून त्याला जिवंत ठेवण्याचे कार्य झाले पण आता परत 'भांडवलवाद' हा शब्द रूढ व्हायला लागला आहे. स्पर्धा, कंपन्यांच्या अपेक्षा, कार्पोरेट जग, नको ती भाषा पश्चिम राष्ट्रांकडून घेत आहेत. सध्याचे भांडवलशाहीचे वैशिष्ट्ये काय आहेत? ही बाब विचार करण्यासारखी आहे.

- बेरोजगारी वाढने आणि विकासात चढउतार आहेत.
- आर्थिक विषमता प्रचंड वाढली आहे.
- पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. असे सर्व देश मान्य करत आहेत.
- श्रीमंतांचा असा समज झाला आहे की, पैशाच्या आधारावर आम्ही जग जिंकू शकू.
- सामान्य माणसाला वाटते नियोजनाचे काही चांगले साध्य करता येईल. पण नियोजनकारच डगमगलेले आहेत का? आणि भांडवलवाद विकासासाठी प्रेरक की मारक यावर विचार करण्यास भाग पाडतो आहे. असे असंख्य प्रश्न पडत आहेत.

जगातील मोठा व्यापारी वर्ग अर्थव्यवस्थांच्या उतार-चढावाला वाचवू शकतो? आर्थिक व सामाजिक समस्यांना सोडवणे हा एक महत्त्वाचा विषय बनला आहे. आता अमेरिकेत असे व्यापारी जे स्वतः शिवाय कोणाचाही विचार करत नव्हते, ते आता या परिस्थितीवर विचार करत आहेत. वालमार्ट, जे. पी. मोरगनचे अधिकारी म्हणतात की, उपभोक्ता, कामगार, पुरवठा करणारे आणि विभिन्न समुदायापैकी एकही असा वर्ग नाही, जो गौण असेल. अर्थात आर्थिक व्यवहार चालविण्याकरिता सर्वच महत्त्वाचे आहेत. असे विचार म्हणजे मोठ्या कंपन्यांकडून मुद्दाम मांडलेला विचार असू शकेल ना एक देखावा देखील असू शकेल.

- कारण अमेरिकेच्या दोन्ही बाजूने आता व्यापार वाढतो आहे.
- तरुण वर्ग या लोकांसोबत काम करायला तयार आहे, पण सोबतच नैतिक व राजकीय बाबतीत सजग आहे. भांडवलशाहीची भाषा त्यांना लक्षात आली आहे.

* राजकीय लोकांना मात्र रोजगार व गुंतवणूक घरी म्हणजे त्यांच्या देशात वाढविण्यास रस आहे.

या सर्वांचे नाव आहे सामुदायिक भांडवलवाद. असे विचार अधिक तोटा निर्माण करणारे वाटतात की काय? असे म्हणायला हरकत नाही. मोठ्या प्रमाणात या धर्तीवर तयार झालेले CEO'S जे अधिकारी उत्तरदायी नाहीत, ते बेकायदेशीर झाले आहेत, ही स्थिती दीर्घकालीन विकासासाठी धोकादायक आहे आणि यातूनच भांडवलवाद फोफावत आहे.

एकोणिसाव्या शतकामध्ये समाजाला मोबदल्यात काय मिळेल याची चर्चा होत होती. १९५० ते १९६० मध्ये अमेरिका व युरोपने प्रायोगिक तत्त्वावर भांडवलवाद अंगिकारले. त्यामध्ये मोठ्या पेढ्यांने शासन आणि संघटनांच्या माध्यमातून लोकांना नोकऱ्या मिळतील व वस्तूरूपात उत्पन्नाची हमी दिली. पण १९७० च्या स्थैर्यानंतर भांडवलदारांच्या मूल्यवृद्धीत मर्यादा लागली. कारण पेढ्यांने त्यांची संपत्ती अधिकाधिक महत्तम करण्याचा प्रयत्न केला. सैद्धांतिकदृष्ट्या पाहिल्यास असे दिसते की त्यांची कार्यक्षमता पण महत्तम केली. श्रमिक संघटना मागे पडल्या आणि अमेरिका, युरोप व जपानने भांडवल बाजार उच्चांकावर नेले व त्याने अद्यापही टिकून आहेत. त्या वेगवेगळ्या भांडवलवादी व्यवस्थेचा प्रयोग करत जर त्याची उपयोगिता अमेरिकेच्या दृष्टिकोनातून नफा हा निकष धरून पाहिलीस तर ती १९८९ ला त्यांच्या जीडीपीत पाच टक्के पासून वाढून २०१९ मध्ये आठ टक्के इतकी झाली आहे. ते स्वतः त्याला यशस्विता गाठणारे देश संबंधित करत आहेत.

नफा जरी यांना महत्त्वाचा असला तरी इतर निकष काय सांगतात? इतर निकष नफ्याची चौकट नाकारतात. व इतर बाबींकडे लक्ष देण्यास भाग पाडतात.

१) लोकांमध्ये व्यावसायिक नैतिकता कमी झाली.

२) बँकर्सकडून बोनसची मागणी वाढली व वित्तीय समस्यांतून वाटा सुरू झाल्या. हे एकाच वेळेस घडलं.

३) सर्वात प्रमुख तक्रार आहे की, भांडवलदारांचे मूल्य उत्पादनाचे अर्थव्यवस्थेवर ऋणात्मक/वाईट आर्थिक परिणाम व्हायला लागले. तसे काही पेढ्यांना काळ्या यादीत जाहीर केले, अनेकांनी अल्पकालीन फायद्यासाठी बरोबर गुंतवणूक केली नाही. कर्मचाऱ्यांचे शोषण, पगार कमी देणे, जर प्रदूषण निर्माण झाले असतील तर त्या बाह्यांतांसाठी योग्य देय न देऊ शकणे, असे ठरले. म्हणजे नफा वाढविण्यासाठी काहीही, करण्यात आले.

ही नफ्या संबंधी टीका जरी खरी नसली तरी–

* अमेरिकेत गुंतवणूक १९६० पासून प्रचंड वाढली आहे.
* अमेरिका व इतर देशात शेअर मार्केटचा पसारा वाढला आहे.
* मेझॉन व नेटफिक्स कंपन्या बऱ्याच आहेत. आणि स्पर्धेसाठी धडपड वाढली आहे.
* कामगारांच्या कामाचे मूल्य निश्चित घसरले आहे.
* ग्राहकांना मिळणारे खरेदी आकर्षण पण दूषित आहे त्यावर आधारित सामाजिक गतिशीलता कमी झाली आहे.

**भाग भांडवलासंबंधी :**

- ग्राहक व कर्मचाऱ्यांना आवडेल अशा सामाजिक गोष्टी शोधण्याच्या मागे कंपनीचे प्रमुख लागलेले आहेत.
- पेढ्या भांडवल गुंतवणूक क्षमतेला सोडून इतर कारणांसाठी कार्य करत आहेत. मायक्रोसॉफ्ट ५०० कोटी नवीन ग्राहक निर्माणासाठी देत आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प काही कंपन्यांना पेढ्या व उद्योग करण्यासाठी प्रेरित करत आहेत. ऐलिज वेथ वॉरेन, व्हाईट हाऊसच्या, डेमॉक्रॅटिक पार्टीच्या एक महत्त्वपूर्ण व्यक्ती म्हणतात की, पेढीला परवानगी देताना, येथील कर्मचारी, ग्राहक व समाजाकडे विशेष लक्ष द्या. मोठ्या उद्योगासाठी सामाजिक उद्देश मोठे ठेवा आणि स्वतःचा नफा थोडा बाजूला ठेवा.

हे जरी ऐकायला चांगलं वाटत असलं तरी सामुदायिक भांडवलवाद दोन बाबतीत चुकीचा ठरतो.

१) हिशोब ठेवण्यास समस्या आहेत.

२) गतिमानतेत उतार आहे. (संथ आहे.)

**१) हिशोब ठेवणे–**

सीईओला माहीत पाहिजे की, त्यांच्या कंपनीकडून समाजाला काय हवं आहे? पण होतं अस की, नेता, जाहिरातदार व सीईओ आपलं ठरवणार आणि ग्राहकांचा आवाज कोणी ऐकणार नाही. मोठ्या उद्योगांवरच लहान उद्योग वाढत आहेत (वीस वर्षांपासून). म्हणून लहान उद्योगांचा चांगला सामाजिक उपयोग जरी असला तरी तो पूरा करू शकत नाही. त्याला कंपनीसाठी लक्ष देण्यातच वेळ जातो.

**२) गतिशीलतेत कमी–**

सामुदायिक भांडवलवाद 'बदल' पटकन स्वीकारत नाही. काही भागधारकांना या प्रक्रियेत सोडून द्यावे लागते. भांडवलवादाच्या पुनर्बांधणीसाठी आणि कामगारांना नवीन उद्योगात वळविण्यासाठी काही भागधारक बाजूला ठेवावे लागतात.

जर पर्यावरणीय बदलात तेल उद्योगांना काही बदल करणे अपेक्षित असेल, तर ते आवश्यक ठरेल पण सामुदायिक भांडवलवादाचे प्रणेते १९६० मधल्या पद्धतीप्रमाणे काम करण्याचा सल्ला देतात. जनरल मोटर्स यांनी असुरक्षित गाड्या या धर्तीवर तयार केल्या. एका बाजूने नवीन बदल व सुरक्षित वस्तू तयार करणे यामध्ये समतोल प्रस्थापित करणे आवश्यक आहे. सामाजिक जीवनासाठी काम आणि जागतिक स्तरावरचे विज्ञान यात सकारात्मक संबंध ही अर्थशास्त्र यांची खरी परीक्षा आहे.

केवळ गतीक्षमता किंवा हिशोबाची प्रक्रिया असे चालणार नाही तर या दोन्ही गोष्टी एकत्र कामात आणाव्या लागतील. स्वतः कंपनी चालवणारे व्यक्ती लागणार आहेत. कोणीतरी प्रचार करणारे किंवा नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या भरवशावर कामे होणार नाही. चांगल्या व्यवस्थेसाठी दीर्घकालीन योजना असायला हवीत.

समाजात होणारे बदल सातत्याने लक्षात घेणे आवश्यक आहे. उपभोक्त्याला काय हवं आहे? जर विद्यार्थ्यांना पेढ्या, कंपन्यांबद्दल कळत असेल आणि नाव खराब झालेल्या कंपन्यांकडे ते जात असतील तर मालकांना विचार करणे गरजेचे आहे. त्यांनी स्वतः जबाबदार राहण्यासाठी आपली मालकी विस्तृत करायला पाहिजे. अधिक श्रीमंत अधिकच श्रीमंतीकडे जात असल्याने अशांतता वाढणारच

आहे. राजकीय क्षेत्रात त्याचा बाबींचा शिरकाव व व प्रभाव वाढत जातो.

उत्तरदायित्वाची भावना कार्यरत असेल आणि स्पर्धा असेल तर चांगले निकाल प्राप्त होतील. थोड्या थोड्या कालावधीत वस्तूंच्या किमती कमी करणे, मोफत, आमिषाची घोषणा करणे यामुळे उद्योग, पेढी फार काळ टिकू शकत नाही. म्हणून नफा पण मिळू शकत नाही. ग्राहकांची प्रत्येक बाजू बघताना अतिरिक्त नफ्यावर परिणाम होणारच.

१९९० पासून अमेरिकेत होणारे बदल मोठे आहेत. एकाधिकारात वाढ झाली आहे. खाजगी क्षेत्रात वाढ व ६ टक्के श्रमिकांना अधिक नोकऱ्या व पगार वाढल्या आहेत. अमेरिकेच्या १८० कंपन्या अल्पाधिकारात मोडतात. त्यामध्ये टीव्ही, एअरलाइन्स यासारख्या कंपन्यांची संख्या अधिक आहे. इतरांना ते त्यांच्या स्पर्धेत येऊ देत नाहीत. किंबहुना त्यांना येऊ द्यायचं नाही.

एका प्रभावशाली वातावरणात ज्याला सकारात्मक राजकीय पाठिंबा असेल त्यात सर्वांचा विचार करता येईल. त्याकरिता उद्योग वाढवणे, पर्यावरणीय बदल, प्रदूषण इत्यादी बाबींचा विचार होऊ शकेल. या दृष्टीने जगात बऱ्याच नकारात्मक बाबी असल्याने मोठ्या उद्योगांदेखील चांगला पर्याय शोधावा लागेल. या प्रकारच्या भांडवलवादांमध्ये समाजाभिमुख नवप्रवर्तन कसं शक्य होईल, हे अर्थशास्त्राच्या संशोधनाचे मोठे व्यासपीठ ठरू शकेल.

◆◆◆

# सौम्य मंदी वा निम्नगामी अर्थव्यवस्था व त्यावरील उपाय

**श्रीनिवास खांदेवाले**
नागपूर.

**प्रस्तावना :**

सध्या भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धिदर क्रमाक्रमाने कमी होत आहे. त्याला मराठीत रोजच्या भाषेत मंदी म्हटले जाते काहींच्या मते शास्त्रीय व्याख्येनुसार त्याला मंदी म्हणता येत नाही. त्यामुळे त्या परिस्थितीला काय म्हणावे असा प्रश्न उपस्थित होतो. म्हणून काही शब्दकोश चाळले. इंग्रजीत ह्या परिस्थितीचे बरेच समानार्थी शब्द वापरले जातात. उदा. Recession, Depression, Crisis, Slump, Decline, Slowdown, Contraction, Down swing, वगैरे. मराठीत समानार्थी म्हणून वापरले जाणारे शब्द सौम्य मंदी/ मंदी, मंदगती, घसरण, अवदोलन, निम्नगामी, उतरती, संथगती, निराशाजनक/गर्त इत्यादी. इंग्रजीतील contraction, down-swing, crisis ह्यांच्यात अल्पकाळाचा भाव आहे, Decline, slowdown ह्यामध्ये विशिष्ट दिशा आहे परंतु त्यातून परिस्थिती सामान्य रूपाने बदलत असल्याचे ध्वनित होते. Recession आणि Depression मुळे परिस्थिती गंभीर असल्याचे ध्वनित होते. मराठी मंदगती किंवा संथगती हे शब्द कमी वेग दर्शवीत असले तरी ते वेगाची विशिष्ट स्थिरता दर्शवितात. घसरण शब्द बदलाचे तात्पुरतेचा दर्शवितो. मंदी, निम्न गामी, उतरती हे शब्द वृद्धी दराच्या गती आणि बदलाची दिशा ह्या दोन्हींचे निर्दशक आहेत. अरिष्ट, गंडांतर, निर्वाणीचा क्षण हे शब्द विकासातील अचानक बदल व प्रश्नाची तीव्रता दर्शवितात. अर्थात प्रत्यक्ष परिस्थितीत वेगवेगळ्या वैशिष्ट्यांचे मिश्रण असते लेखकांच्या भूतकाळाबद्दल व भविष्यकाळाबद्दल काही धारणा असतात. त्याप्रमाणे शब्दांचा वापर केला जातो. परिस्थिती बदलत राहिली पण सुधारणा होत असली तर upswing आणि स्थिती फारच बिघडल्यास Mayhem = उत्पात, नाश, विध्वंस ह्या सारख्या शब्दांचा वापर केला जातो.

वरील संज्ञांपैकी ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ मंदीची व्याख्या, 'सलग दोन तिमाहीत नकारात्मक किंवा उणे विकास (Negative Economic growth for two consecutive quarters) अशी करतात. काही जण "Business cycle contraction when there is a general decline in economic activity" अशी व्याख्या करतात. काही अर्थशास्त्रज्ञ १२ महिन्यात १.५ ते २.० टक्के बेरोजगारीत वाढ अशी व्याख्या करतात. अमेरिकेतील नॅशनल ब्यूरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्च ह्या संस्थेच्या बिझिनेस सायकल डेटिंग कमिटीची व्याख्या '' a significant decline in economic activity spread across the

economy, visible in real GDP, real income, employment, industrial production and wholesale retail sales'' ब्रिटिश व अमेरिकन व्याख्यांची तुलना केल्यास दिसून येते की ब्रिटिश व्याख्या संकुचित व अव्यात्प आहे.

सगळ्यांना आठवेल की भारताच्या लोकसभेत जेव्हा विरोधी पक्षांच्या सदस्यांनी पावसाळी अधिवेशनात अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात निम्नगामी आर्थिक विकास चालू आहे व मंदीवर सरकारने उपाययोजना करावी अशी मागणी केली त्यावर उत्तर देतांना ब्रिटिश व्याख्या उधृत करून सलग दोन तिमाहीत शून्यपेक्षा कमी वृद्धी दर नाही म्हणजे मंदी नाही असे म्हणून शासनाने प्रश्न झटकून टाकला.

जशी ब्रिटिश व्याख्या दोन तिमाहींच्या अटीवर मंदी ओळखण्याचा प्रयत्न करते म्हणून असमाधानकारक आहे तशीच दुसरी एक व्याख्या 'बिझिनेस सायकल कॉंट्रेक्शन' म्हणते, ती व्याख्या अनेक अर्थव्यवस्थांमध्ये जे संस्थात्मक घटक कार्यरत राहून त्या अर्थव्यवस्थांच्या विकासाची गती मंद करतात त्यांचा समावेश ह्या व्याख्येत होत नाही. त्यामुळे भारतात सध्या जी निम्मगामी अर्थव्यवस्था आहे तिच्या विश्लेषणाच्या निमित्ताने मंदीची चांगली व्याख्या करण्याचाही प्रयत्न झाला पाहिजे.

**भारताची अर्थव्यवस्था :**

जानेवारी ८, २०२० रोजी उपलब्ध झालेल्या माहितीनुसार भारताचा २०१९-२०ह्या वित्तीय वर्षाचा चालू किंमतींचा सकल वृद्धिदर ७.५% असणार आहे. जो ५ जुलै २०१९ रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पात १२% असा अंदाज व्यक्त केला गेला होता.

अर्थव्यवस्थेचा वास्तविक वृद्धिदर २०१६-१७ मध्ये सुमारे ८.२५% होता तो २०१८ मध्ये ७%, २०१९ मध्ये ६% व सांख्यिकी विभागाच्या अग्रिम अंदाजानुसार ५% राहील. गेल्या ४२ वर्षातील यंदाची सर्वात खराब कामगिरी आहे असे मानले जाते. भूतपूर्व संपादक, अर्थशास्त्रज्ञ स्वामीनाथन अंकलेश्वर आणि मुंबईच्या इंदिरा गांधी संस्थेचे संचालक डॉ. नागराज ह्यांनी असे मत व्यक्त केले आहे की २०२०-२१ चा अर्थसंकल्प हा प्रत्यक्ष आर्थिक परिस्थितीचे भान राखून तयार केला गेला पाहिजे. २०२४ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्सची भारतीय अर्थव्यवस्था ही कल्पनातीत महत्त्वाकांक्षी आहे, असे त्यांचे मत आहे. आजचा प्रश्न भारतीय अर्थव्यवस्था २०२४ मध्ये किती मोठी असेल असा नाही व असू नये. सिद्धांतात त्याला दीर्घकाळ म्हणतात. ज्या विषयी आज काही अनुमान करणे कठीण आहे त्या विषयी नंतर विश्लेषण करू. महत्त्वाचे आहे की आज ही परिस्थिती बदलण्यासाठी कोणती धोरणे अवलंबिली जात आहेत व कशा प्रकारची धोरणे असावयास हवीत.

**सध्याची धोरणे :**

हा लेख लिहीत (दि. १३ डिसेंबर २०१९) असतांना हाती आलेल्या प्रकाशित झालेल्या माहितीनुसार, रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, दिवाळी-ख्रिस्मसच्या खरेदी हंगामानंतर व कॉर्पोरेट कंपन्यांच्या उत्पन्नावर कराची सुटी दिल्यानंतरही नोव्हेंबर २०१९ मध्ये बँकांकडून दिल्या जाणाऱ्या कर्जामध्ये (पूर्वीच्या दोन वर्षांतील नोव्हेंबर महिन्यांतील कर्ज वाटपाच्या तुलनेत) कमी, म्हणजे ७.३ टक्क्यांचीच वाढ झाली होती. चालू वित्तीय वर्षातील (२०१९-२०) एप्रिल ते नोव्हेंबर ह्या

आठ महिन्यात बँक कर्ज वाटप फक्त १.०४ टक्कयांनीच वाढले. त्यातही वाढ ही वैयक्तिक कर्जांमध्ये झाली. पण उद्योग व सेवा ह्या (अर्थव्यवस्थेचे ६०% प्रतिनिधित्व करणाऱ्या) क्षेत्रांमध्ये बँक कर्ज वाटपात अनुक्रमे ३.९३% व २.१८% ची घटच झालेली आहे. ह्याचा अर्थ असा की बाजारात उद्योगामध्ये सध्या गुंतवणूक व उत्पादन वाढविण्याबाबत आत्मविश्वास नाही आणि २०२०-२१ चा अर्थसंकल्प १ फेब्रुवारी २०२० रोजी सादर करावयाचा आहे. म्हणून इंडियन एक्सप्रेसचे संपादकीय सरकारला स्पष्ट शब्दात बजावत आहे की ''सरकारजवळ मंदी हटविण्यासाठी खर्च करण्यावर मर्यादा आहेत, व्याजाचे दर आणखी कमी केले तर भाववाढीची भिती आहे, खासगी क्षेत्रात बोटावर मोजण्याइतक्या कंपन्यांशिवाय कोणाजवळ पैसा नाही व आत्मविश्वास नाही, उपभोक्ता हाती असलेला पैसा खर्च करू इच्छित नाहीत, असे एकूण खिन्न करणारे चित्र आहे. म्हणून व्ही (V) आकाराची उसळी वगैरे मारली जाईल असे चित्रित करण्यापेक्षा उत्पन्न, वृद्धी ह्याबाबत माफक अंदाज बांधा, तुटीबद्दलचे विश्वासार्ह आकडे सादर करा, पाच वर्षात १०२ लाख कोटी रूपयांच्या मनोवेधक पायाभूत सुविधांच्या सारख्या घोषणा टाळून पूर्ण होण्यासारखे प्रकल्प जाहीर करा. परिस्थितीत सुधार ही दीर्घकाळाची प्रक्रिया असल्याने सरकारला आपल्या राजकीय डावपेचांची पुर्नआखणी करावी लागेल. प्रत्येक छोटी-मोठी निवडणूक जिंकण्याच्या ईर्षेने अर्थव्यवस्थेला फायदा होत नाही. तिला आधीच नोटबंदी, वस्तू व सेवा कर (जीएसटी) आणि नागरिकत्व कायद्याबाबतचा विरोध ह्यांचे धक्के बसलेले आहेत आणि आणखी धक्के सहन करण्याची तिची क्षमता संपलेली आहे. म्हणून अर्थव्यवस्थेवर लक्ष केंद्रित करणे सरकार व सत्ताधारी पक्ष ह्या दोघांच्याही हिताचे होईल.

सरकारच्या धोरणात मनरेगावरील खर्च कमी झाला आहे, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांकडून उज्वला योजनेतील गॅस सिलिंडर घेणे कमी झाले आहे आणि उत्पादन वाढ कमी होत असल्याने मागील पाच वर्षांत सुमारे ९० लाख (९ मिलियन) रोजगार कमी झाला आहे. प्रश्न असा निर्माण होतो की सत्ताधारी पक्षाजवळ सगळ्या आकडेवारीचे संगणकीय विश्लेषण करणारी भली मोठी फौज आहे. (असे म्हणतात), तर मग २०१४ च्या निवडणुकीच्या वेळी कोणत्या गृहीतकांवर आधारून दरवर्षी २ कोटी (म्हणजे पाच वर्षांत दहा कोटी) रोजगार निर्माण केला जाईल अये सांगितल्या गेले? ते जनतेला माहीत होणे आवश्यक आहे. देशात गेल्या तीन वर्षात शेतमजुरांचे वास्तविक उत्पन्न कमी झाले आहे. त्यामुळे ग्रामीण प्रभावित झाली आहे.

जुलै २०१९ मध्ये शासनाने अर्थसंकल्प सादर केल्यानंतर ज्या प्रकारे औद्योगिक जगताला करकपात व इतर सवलती जाहीर केल्या (त्यांना विरोध नाही) त्या तुलनेत कृषी व ग्रामीण क्षेत्राला दिल्या गेल्या नाहीत. त्यामुळे तेथील शासकीय खर्चातून ग्रामीण रोजगार, उत्पादन व उपभोग खर्च वाढून औद्योगिक वस्तूंकरता मागणी वाढावी व त्याचा गुणक परिणाम ह्यापासून कृषी व ग्रामीण क्षेत्र वंचितच राहिले आहे.

**दीर्घकाळाचे प्रारूप काय?**

रिकार्डोने (इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीचे पूर्ण स्वरूप नजरेस पडल्यानंतर १८२० च्या सुमारास)

राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटणीबाबत असे मत व्यक्त केले होते की चार उत्पादन घटकांच्या मालकांचे तीन गटात वर्गीकरण करता येते. ते घटक भूमी, श्रम, भांडवल आणि उद्योजकता हे आहेत. रिकार्डोच्या मते भूमिला भाटक (खंड) रूपाने व भांडवलाला व्याजाच्या रूपाने मिळणारा मोबदला हा कराराच्या स्वरूपात आधीच ठरतो. तिसरा हिस्सा श्रम आणि उद्योजक ह्यांच्यात उत्पादन क्रिया पूर्ण झाल्यावर वाटला जातो. तो मजुरी व नफा असा संयुक्त वाटा असतो. त्यापैकी कोणाला किती मिळेल हे त्यांच्या सौदाशक्तीवर अवलंबून असते. पण आपला हिस्सा वाढविण्यासाठी त्यांचा संघर्ष चालू असतो.

सुमारे १८४० पासून ते १८८० च्या काळात लिखाण करतांना मुख्यत: भांडवली व्यवस्थेत श्रमिकांच्या शोषणासंबंधी लिहितांना मार्क्स म्हणतो की भांडवलशाहीतील राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटणीचे खरे विश्लेषणासह स्वरूप हे ॲडम स्मिथच्या लिखाणातून नाही तर रिकार्डोच्या लिखाणातून कळते, ते वर्गीय संघर्षात्मक आहे.

१९ व्या शतकाच्या अखेरीस आफ्रिकेत सोन्याच्या खाणी सापडल्यामुळे काही काळ तेजी आली आणि १९१४-१८ च्या पहिल्या महायुद्धाच्या काळात (सामान्य उपभोक्ता मागणी व युद्ध लढतांना नष्ट होणाऱ्या वस्तूंसाठी मागणी = एकूण मागणी) मागणी, उत्पादन, रोजगार उच्च पातळीवर पोहचले. महायुद्ध संपल्यावर २० व्या शतकाच्या तिसऱ्या दशकापासून सततच्या मंदीतून १९२९ ते १९३९ ह्या काळात महामंदी आली आणि ती जागतिक झाली. त्या मंदीच कॅन्स ह्यांनी केलेले विश्लेषण असे होते की तांत्रिक विकासातून उत्पादन वाढविणे सोपे आहे. त्यातून निर्माण होणारे उत्पन्न उद्योजक व अन्य उच्च उत्पन्न गटांत केंद्रित होते व बहुसंख्या असलेल्या मजूर व तत्सम घटकांमध्ये पोहचत नाही. उच्च उत्पन्न गटांची उपभोगक्षमता कमी असल्यामुळे व बहुसंख्यांजवळ क्रयशक्ती नसल्यामुळे सगळ्यांना रोजगार देण्याइतकी एकूण प्रभावी मागणी निर्माण होत नाही. पुरेशी मागणी नसल्यामुळे किंमती कमी होऊन, नफ्याचा दर कमी होऊन बेरोजगारी वाढते. त्यावर उपाय म्हणून केन्सने श्रमिकांना कायद्याने उच्च मजुरी दर आणि उच्च उत्पन्नावर कर असे समतेचे प्रारूप न सुचविता शासनाने खर्च करून, अल्प कौशल्याची प्रतिपूरक सार्वजनिक कामे काढून, प्रतिपूरक रोजगार निर्माण करावा असे सुचविले. सगळी उत्पादन व्यवस्था खासगी असल्यामुळे सरकारजवळ स्वत:चे उत्पन्नाचे साधन नसते. म्हणून सरकारने जास्त खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून जेवढी तूट महसुलात असेल ती सार्वजनिक कर्ज उभारून भरून काढावी. त्या खर्चाने मागणी व किंमती, गुंतवणूक, उत्पादन, नफा, रोजगार वाढून नफ्याची पातळी पूर्ववत झाली म्हणजे सरकारने तुटीचे अंदाजपत्रक बंद करावे, असे केन्सने सुचविले. जगात नफ्याच्या एकमेव उद्देशाने चालविले जाणारे मोठे (कॉर्पोरेट) उद्योग सरकारची कर विषयक, बँक विषयक, आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक धोरणे स्वत:ला अनुकूल करून नफ्याचे महत्तमीकरण करून घेतात. ती त्यांची शक्ती व यश मानले जाते. कमी क्षमता असलेले उद्योग मध्यम, लहान, सूक्ष्म, स्टार्ट-अप उद्योग बनतात. त्यामुळे प्रत्येक उद्योजक स्वत:ला आवश्यक असेल तेवढाच रोजगार निर्माण करतो आणि मजुरी वरील खर्च कमी करणारी यंत्रे मिळल्यास इतरांच्या स्पर्धेत

उत्पादन खर्च करून नफा वाढविण्यासाठी तो मजुरांना कामावरून कमी करतो. त्यामुळे पूर्ण रोजगार निर्माण करणे हे खाजगी क्षेत्राचे उद्दिष्ट नसते, हे पुन्हा अधोरेखित होणे महत्त्वाचे आहे.

मग शासकीय कर्जातून रोजगार निर्माण करून मंदी हटविण्याचे काय झाले? केन्स ह्यांनी सुचविल्या प्रमाणे जगातल्या सरकारांनी सगळ्याच कामांसाठी सरकारी कर्जे उभारणे सुरू केले. जागतिक अधिकोषाने सावधानीचा इशारा दिला आहे की १९७० पासून सुमारे १०० देशांमध्ये 'कर्जलाट्' (Debt wave) आली आहे. त्यात २०१८ पर्यंत ५५ ट्रिलियन डॉलर्स (१ ट्रिलियन डॉलर्स = ३९०० लाख कोटी रूपये) इतकी असह्य होणारी कर्जे उभारली गेली आहेत. त्यापैकी २०१० ते २०१८ ह्या आठ वर्षांत सरकारांच्या सार्वजनिक कर्जांमध्ये विशेष भरती आली आहे. ती कर्जे परत करणे कठीण जात असल्यामुळे नवीन कर्जे उभारून मंदी हटविणे उत्तरोत्तर कठीण जात आहे. उद्योजक व इतर उच्च उत्पन्नाचे लोक श्रीमंतांवर कर वाढविणार नाही अशी कबुली घेतल्यानंतरच होतकरू राजकीय पक्षाला देणग्या देतात. मग गरीब आणि मध्यम वर्गावर अप्रत्यक्ष (वस्तू-सेवा)कर वाढविले तर लोकांची मते मिळत नाहीत व राजकीय अस्थिरता निर्माण होते. आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीने भारत सरकारला सुद्धा सार्वजनिक कर्ज फार वाढले आहे, असा इशारा दिला आहे. भारतातील अनिश्चितता पाहून अमेरिका-इराणच्या तणावाचा परिणाम म्हणून परकीय कंपन्यांनी जानेवारी २०२० च्या पहिल्या बारा दिवसांतच रू २४१५ कोटी भारताच्या भांडवल बाजारातून काढून घेतले.

भारतातील आजच्या घसरत्या अर्थव्यवस्थेत अर्थसंकल्पात कशा तरतुदी कराव्या असा प्रश्न वाहिन्यांनी विचारला असता बहुतेक अर्थशास्त्रज्ञांनी केन्स प्रतीत उत्तर दिले, ते म्हणजे (अ)ग्रामीण रोजगार हमीवर खर्च वाढवा (ब)पायाभूत सुविधा विकासाचे प्रकल्प राबवा (क)छोट्या-मध्यम व रोजगार-सधन उद्योगांना कर्ज पुरवठा वाढवा (ड)तुटीच्या अर्थ-संकल्पाचा बागुलबुवा न करता सरकारी खर्च वाढवा(इ) खासगी क्षेत्राचा विश्वास संपादन करावा इत्यादी.

परंतु जागतिक पातळीवर भांडवली व्यवस्थेच्या मर्यादा गाठल्या गेल्या आहेत हे स्पष्ट झाले आहे. सतत उत्पादन वाढ होऊन सुद्धा दारिद्र्य व बेरोजगारी कमी झालेली नाही, विषमता परकोटीची वाढलेली आहे. सरकारांची कर्जे अनियंत्रितपणे वाढली आहेत, सरकारे व जनता ह्यांचा आपसातील संवाद कमी होत आहे, उद्योगामधील स्पर्धा कमी होऊन मोठ्या कंपन्यांचा अधिकार वाढतो. हे सर्व पाहून अनेक आर्थिक विचारवंत अशा एक पर्यायी अर्थ व्यवस्थेचा विचार करीत आहेत की ज्यामध्ये (१) नैसर्गिक संसाधनांचा उत्पादनात वापर करताना केवळ खासगी नफ्याच्याच महत्तमी करणाचा विचार न करता सामाजिक गरजांना प्राधान्य देण्यात येईल. (२) तांत्रिक प्रगतीचा लाभ जास्तीत जास्त लोकांना मिळेल.(३)विकसित तंत्रज्ञानावर समाजाचे नियंत्रण राहील.(४) सामाजिक गरजा (निर्यातीसह) आणि उत्पादन ह्यांचा मेळ घालून, अति उत्पादन टाळून, मंदी टाळली जाईल.

विचारवंत अशा अर्थव्यवस्थेच्या नामकरणाची घाई करत नाहीत. त्यांच्या मते लोकशाही प्रक्रियेतून आधी असे बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे.

◆◆◆

# आर्थिक मंदी – एक आव्हान

**वर्षा गंगणे**
सहयोगी प्राध्यापक,
देवरी, जि. गोंदिया

विकसित देशापेक्षा विकसनशील देशांच्या समस्या अधिक असतात. भारतही याला अपवाद नाही. अनेक अडचणीवर मात करीत भारताची अर्थव्यवस्था आता विकासाकडे वाटचाल करू लागली आहे. आर्थिक विकासाचा दर वाढत चालला आहे. एवढेच नव्हे तर जगातील काही राष्ट्रांनी भारत २०२० पर्यंत महासत्ता होण्याचे अनुमानही केले आहे. विकसित देशांना कदाचित, भारतीय अर्थव्यवस्था विकसित झाल्यास आपले स्थान गमावण्याचे भय वाटत असावे. कारण काहीही असले तर अविकसित ते विकसनशील अर्थव्यवस्था असा विकासाचा टप्पा भारताने अनेक संकटावर मात करीत पूर्ण केला आहे. नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल, बदलते आर्थिक धोरण, काळाबाजार, भ्रष्टाचार, सीमेवरील समस्या ही त्यातील काही प्रमुख संकटे म्हणता येतील.

वर्तमान स्थितीत भारतासमोर घोंघावणारे एक नवीन संकट म्हणजे मंदी. जगातील जवळ-जवळ सर्वच मोठया देशात मंदीचे संकट अर्थव्यवस्थेसमोर असलेले एक आव्हान ठरले आहे. त्यामुळे मंदीची भीती सर्वच विकसीत देशात गडद छायेच्या रूपात पसरत चालली आहे. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा, जपान आणि चीनमध्ये मंदीने आपली पाळेमुळे घट्ट करण्यास सुरूवात केली आहे. याचे सावट भारतीय व तत्सम विकसनशील देशांवरही पडेल असे ईशारे जागतिक तज्ञांद्वारे दिले जात आहेत. आर्थिक मंदी ही धोक्याची घंटा आहे. त्यामुळे गेल्या २०-२५ वर्षात जे आर्थिक धोरण आपण राबविले त्याचा पूर्ण विचार व पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ आली आहे. असा सावधानतेचा ईशारा पोप बेनेडिक्ट यांनी 'करितास इन व्हेरिरात' म्हणजे सत्याला करूणेची चौकट या परिपत्रकाद्वारे जगाला दिला आहे.

मे २०१० मध्ये सत्तेत आल्यानंतर ब्रिटनमधील आघाडी सरकारने सार्वजनिक तोटा कमी करण्यासाठी पुढच्या ५ वर्षांत खर्चात ८१ अब्ज पौंडाची म्हणजे १३१ अब्ज अमेरिकन डॉलर्स कपात करण्याची घोषणा केली होती. ही स्थिती कायम राहिल्यास अर्थव्यवस्था मंदीच्या विळख्यात सापडण्याची शक्यता असल्याचा ईशारा आय.पी.पी.आर. चे मुख्य अर्थशास्त्र डॉल्फिन यांनी दिला होता. ब्रिटनची आर्थिक स्थिती बघता त्याच्या एकूण उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. त्यामूळे संपूर्ण यूरो क्षेत्राची अर्थव्यवस्था मंदीच्या फेऱ्यात येईल.

अमेरीकेची अर्थव्यवस्था देखील मंदीच्या

विळख्यात सापडली आहे. अमेरिकन कंपन्याची उत्पादन क्षमता दरवर्षी ५ ते १० टक्के ने वाढत राहते. खर्च अधिक केल्यास मागणी अधिक होते व मागणी अधिक झाल्यास उत्पादन अधिक होते. त्यामूळे एकूण उत्पन्नातून खर्च अधिक करावा व बचत कमी करावी हे अमेरिकेचे पूर्वीपासूनचे धोरण आहे. चंगळवाद ही जगण्याची शैली असल्यामूळे मोठया प्रमाणवर कर्ज घ्यायचे व नंतर हप्ते फेडता येत नाही या समस्येला तोंड द्यायचे. मंदीची सुरूवात जरी हवीहवीशी वाटत असली तरी नंतर तिचे परिणाम अधिक गुंतागुंतीचे होत जातात. कारण सुरूवातीला मंदीचे सकारात्मक परिणाम दिसून येतात जसे स्वस्ताई, इन्शुरन्सचे दर खाली येणे, सोन्यात गुंतवणूक करणे योग्य वाटणे, गृहकर्ज स्वस्त होणे इत्यादी. अमेरिका, जपान आणि काही युरोपियन राष्ट्रांनी याचा खूप फायदा घेतला पण आता ते आर्थिक संकटात सापडले आहेत. अमेरिकेची राजकिय व्यवस्था देखील या परिस्थितीस तेवढीच कारणीभूत आहे असे म्हणता येईल कारण 'उपरसे टामटूम अंदरसे रामजाने' ही नीती त्यांनी नेहमीच स्वीकारल्यामूळे अमेरीका मंदीच्या लाटेत सापडली. कचरा गोळा होत असतांना तो कारपेटखाली ढकलायचा म्हणजे वरून सगळच स्वच्छ आणि टापटिप व आतून सगळं पोकळ आणि घाणेरडं असे धोरण एक दिवस अंगलट आले. कारपेटची कचरा सामावून घेण्याची क्षमता संपल्यामूळे दुर्गधी येऊ लागली व भ्रमाचा भोपळा फुटला. अधिकारी वर्गाला कर्जावर कमीशन खाण्याची सवय लागल्यामुळे लागोपाठ कर्ज दिले गेले. ते वसूल होईल का, फेडण्याची कुवत पुढच्या व्यक्तीत आहे का याचा विचारच झाला नाही नुसताच व्यवसाय वाढवायचा हा एकमेव उद्देश बँक अधिकाऱ्यांनी ठेवला. याचे उदा. म्हणणे लहेणन ब्रदर्स बँकेत सी.इ.ओ. पदावर कार्यरत असणाऱ्या फल्ड या अधिकाऱ्याने एका वर्षात १४०० कोटी रू. कमीशन मिळवले. बँक बुडण्याच्या तीन दिवस आधीपर्यंत ही व्यक्ती वृत्तपत्र व मिडियाला सगळे व्यवस्थित सुरू आहे असे सांगत होती. या बनावटी धोरणामुळे अमेरिकेत मंदीचे संकट आले. सध्या अमेरिकन अर्थव्यवस्थेचा विकासाचा दर शुन्य आहे हे त्यांच्या सरकारनेही मान्य केले आहे.

जपान आर्थिकदृष्टया विकसित राष्ट्रांमध्ये उच्च क्रमांकावर येऊन पोहोचलेला देश आहे. अमेरिकेच्या अगदी विरूद्ध आर्थिक धोरण जपानचे आहे. जपानची कौटुंबिक बचत अतिशय चांगली आहे. चंगळवादाला अजिबात थारा नाही. मेहनती व चिकाटी असलेले ईमानदार लोक असलेल्या माणसांचा देश अशी जपानची सर्वदूर ख्याती आहे. म्हणूनच आकाराने लहान असलेला, भूकंपाच्या तोंडावर असलेला जपान प्रगतीची उत्तुंग भरारी घेऊ शकला. मागील दोन वर्षात दारावर येणारी नैसर्गिक संकटे, त्सुनामी व त्यात जलमय झालेला जपानचा औद्योगिक परिसर यामुळे जपानची अर्थव्यवस्था पार कोलमडली. पण मंदीसाठी हे कारण अत्यंत लहान आहे. दुसरे महत्वाचे व मोठे कारण म्हणजे जपानचा स्वत:व्यतिरिक्त इतरांवर विश्वासच नाही. कौटुंबिक, बचतीला अत्यंत महत्व दिल्यामुळे श्रीमंती खूप वाढली. बचत वाढली पण कपाटात नोटा भरून ठेवल्यामूळे त्या सडू लागतात कपाट उघडताच खाली पडू लागतात. तेव्हा जी अवस्था होते तीच जपानची झाली. परिणामी बचत तर आहे पण योग्य मार्गाने गुंतविली न गेल्यामूळे जपान देखील मंदीच्या गर्तेत सापडला, त्याच्या

निष्क्रिय बचतीचा फायदा आता जपानला घेता येत नाही.

चीन देखील याला अपवाद नाही, अत्याधिक लोकसंख्या व क्षेत्रफळाने मोठा असलेला चीन मागील दशकात झपाटयाने प्रगतीपथावर वाटचाल करू लागला. महासत्ता बनण्याचे त्याचे स्वप्न मंदीने मात्र गिळंकृत केले असेच म्हणावे लागेल. चीनी मालाने जगातील जवळ-जवळ सर्वच देशांच्या बाजारपेठा व्यापल्या होत्या. भारतात तर चायना मार्केट या नावाने नवीन मॉल देखील बघायला मिळतात. असे असतांना देखील चीन मंदीच्या विळख्यात सापडला. कारण चीनची अर्थव्यवस्था प्रामुख्याने निर्यात प्रधान आहे. चीन स्वस्त माल बनवून यूरोप व अमेरीकेत पाठवितो आता युरोप व अमेरिकेत मंदी आल्यावर चीनी मालाला उठाव कसा असणार ? चीनचा आर्थिक वृद्धीचा दर धडकन खाली येऊन ८.५% वर आला चीनची अर्थव्यवस्था दक्षिण आणि पूर्वच्या ३५% ते ४०% इतर देशांवर अवलबूंन आहे. त्यामुळे चीन संकटात सापडला.

चीनवर आज तिहेरी दडपण आहे. १) चीनची इतर देशांना होणारी निर्यात कमी झाली. २) चीनमध्ये शेती फारशी होत नाही. त्यामूळे अन्नधान्याची समस्या आहे. ३) चीनचा पैसा अमेरीका व यूरोपियन राष्ट्रात अडकला आहे. त्यामूळे चीनपुढे भीषण संकट उभे आहे. चीनने तिबेट, नेपाळ बळकावला, अरूणाचल प्रदेश व म्यानमारवर त्याचा डोळा आहे. हिंदी-चीनी भाई-भाई म्हणत असतांना भारतावर टाकलेले बॉम्बगोळे हे त्याचे ऐतिहासिक (१९६२) उदाहरण म्हणता येईल. हा अनुत्पादक खर्च मंदीच्या रूपाने चीनच्या अंगाशी आला आहे.

भारतात देखील मंदीची ओरड सर्वत्र सुरू आहे. अमेरीका, यूरोप व इतर मंदीग्रस्त देशांशी भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार असल्यामूळे भारतातही मंदीची झळ पोहचल्याचे संकेत मिळाले आहेत. भारतात आर्थिक प्रगतीचे बॅरोमीटर स्टॉक एक्स्चेंज समजले जाते. त्यामुळे शेअर बाजार पडला म्हणजे मंदी आली ही अफवा वर्तमानपत्रांनी सर्वत्र पसरविली व भीतीचे वातावरण तयार केले. दुसरे भीतीचे वातावरण ऑटो इंडस्ट्रीबाबत तयार केले गेले आहे. भारताची ऑटोइंडस्ट्री जगातील टॉप थ्री असलेली इंडस्ट्री आहे. ऑटोमोबाईल इंजिनिअर्स, स्पेअर पार्ट बनविणारे उद्योग, तंत्रज्ञान उच्च दर्जाचे असल्यामूळे पुढच्या दोन वर्षात भारत ऑटो इंडस्ट्रीत प्रथम क्रमाकांवर गेला असता पण आपला अंदाज चुकला. भारत मॅन्युफॅक्चरिंग हब होऊ लागला आहे. उत्पादन क्षमतेत ८०% वाढ झाली मात्र ही वाढ अमेरीका व युरोपातील होती. अमेरीकेत मंदी आली त्यापाठोपाठ युरोप आणि जपानमध्ये आली. आमच्या कार आम्ही विकायच्या कुठे? हा प्रश्न समोर आला. त्यामुळे ऑटो इंडस्ट्रीत मंदी आली त्यामुळे पोलाद उद्योगात मंदी आली. ही झळ चीनलाही बसली पर्यायाने भारतावरही याचे पडसाद पडत आहेत.

भारतावर मंदीसदृश्य आणखी एक परिणाम झाला तो आय.टी. आणि बी.पी.ओ. ४०% निर्यात युरोप आणि अमेरीकेला होत होती. अमेरीकेचा व्यापार कोलमडल्यावर बऱ्याच भारतीयांच्या नोकऱ्या गेल्या आजही ३:१ या प्रमाणात नोकऱ्या दिल्या जात आहेत. या काही घटनांमुळे भारतात मंदीची लाट आल्याची भीती सर्वदूर व्यक्त केली जात आहे. आज ३:१ या प्रमाणात नोकरीतील भरती

प्रक्रिया सुरू आहे. मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर फारसा विपरीत परिणाम होणार नाही असे मत तज्ञांनी व्यक्त केले आहे. सोने, कर्जरोखे, बँका इत्यादिंमध्ये भारताची बचत व गुंतवणूक केली जाते. कौटुंबिक बचतीचे प्रमाण चांगले आहे. काही ठराविक सणांना थोडे-थोडे सोने घ्यायचेच ही पद्धत अजूनही बहूतांश समाजात सर्वमान्य असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था डबघाईस येणार नाही.

मंदीचे प्रमुख कारण म्हणजे नियमित अर्थचक्रांचे मधूनच तुटणे होय. जागतिकीकरणामूळे प्रत्येक देशाचे परस्परावलंबित्व वाढले त्यामूळे एक कंपनी दुसरीवर, दुसरीवर तिसरी, तिसरीवर याप्रमाणे अर्थचक्र फिरत असते. यातील एक जरी कडी निखळली तरी अर्थव्यवस्था डगमगते व मंदीचे परिणाम समोर येतात. विकसीत देशांना आतापर्यंत स्वत:चे स्थान टिकवून ठेवणे गरजेचे वाटत होते. आता खालच्या (विकसीतदृष्टया) देशांतील ग्राहक महत्वाचा वाटू लागला आहे. टिप्पीकल मिडिल क्लास मेंटालिटी आता आवश्यक वाटू लागली आहे. पूर्वीइतका पगार, बोनस, कमिशन आता मिळणार नाही तेव्हा अंथरूण पाहून पाय पसरावे ही नीती कार्पोरेट, जगातही अनुसरली जात आहे.

भारतात मंदीची ओरड जरी सुरू झाली असली तरी तीची सावली तितकी गडद नाही पण तरीही 'Prevention is better than cure ' या उक्तीप्रमाणे आजारापूर्वीच खबरदारी घेणे गरजेचे आहे. मंदीची सकारात्मक बाजू म्हणणे किंमती कमी होणे होय. वस्तूंच्या किंमती कमी होण्याचा सर्वाधिक फायदा ग्राहक वर्गाला होतो. वस्तुंच्या किंमती कमी झाल्यामूळे जागांचे दर सिमेंट, पोलाद, सगळच स्वस्त, इन्शुरन्स कंपन्या, प्रिमियमचे दर खाली आणतात. अनेक शैक्षणिक योजना आणि पॉलिसी मंदीच्या काळात कमी किंमतीत उपलब्ध होत असतात. एकूणच काय तर मंदीची चाहूल लागताच सजग नागरिकांनी त्याचा फायदा करून घेणे गरजेचे असते. दुसऱ्या शब्दात मंदीवर स्वार होणे गरजेचे असते. असे करता आले तर मंदी एक चांगली संधी ठरू शकते. युरोपात बर्फ पडतो तेव्हा लोक घरातली व घराशी संबंधित कामे करून घेतात. उदा. वाहनांची दुरूस्ती, औजारांची देखभाल, वैद्यकिय व्यवस्थापन, घराची डागडूगी, धार्मिक-सामाजिक कार्यक्रम इत्यादी कार्यालये किंवा कारखान्यात कामगारांना, येणाऱ्या नविन कार्याचे प्रशिक्षण देणे इत्यादी.

भारतातही मंदीला एक आव्हान समजून काही गोष्टींची खबरदारी घेतल्यास मंदीची तीव्रता बरीच कमी करता येईल जसे -

१) नागरिकांशी स्वत:जवळ रोख रक्कम (बचत) बाळगावी. ज्यामूळे २-३ वर्षात सुरळीत खर्च करता येईल.

२) अवाजवी खर्च टाळला जावा. ज्यामुळे पैशाचा चांगला उपयोग करता येईल.

३) गुंतवणूक नियमित करावी - कारण या काळात आकर्षक किंमतीत गुंतवणूकीचे पर्याय उपलब्ध असतात.

४) नोकरदार व व्यवसायिकांनी उत्पादकतेवर भर द्यावा. त्यामूळे श्रमिक बेकार होणार नाहीत व मागणी करणारा एक माणूस सुरक्षित राहील.

५) मंदीला सामोरे जाण्यासाठी सूचना दिल्या जाव्यात व तशी तयारी ठेवली जावी.

६) व्यापारी बँकांनी अनावश्यक कर्जपुरवठा

कमी करावा.

७) शेतीत सुधारणा करून शेतमालाला योग्य भाव दिला जावा.

८) सरकारी निधीचा गैरवापर टाळला जावा.

९) रूपयांचे अवमुल्य टाळले जावे यासाठी विदेशी चलन वाढविण्याची व भारतीय चलन बाहेर जाण्यापासून थाबंविण्याचे प्रयत्न केले जावेत.

१०) अप्रत्यक्ष कराच्या प्रमाणात बदल करावा. ग्राहकांवर सर्व भूर्दंड बसू नये.

११) शेतीचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

१२) मंदीबद्दल चुकीची मानसिकता तयार केली जाऊ नये.

ब्रेटनबुडसच्या (१९४४) धर्तीवर आजही शिखर परिषद घेऊन समस्या सोडविता येऊ शकते. मंदीवर सकारात्मक उपायासाठी इन्फोसीसचे उदा. लक्षात ठेवण्यासारखे आहे. कर्मचाऱ्यांना १ महिन्याच्या पगारी सुट्टीवर पाठवून पुन्हा नव्या जोमाने कामावर परत बोलविण्यात यावे. बी.पी.ओ. मधील मुलगा १ लाख पगारावरून ६०,००० वर आला पण त्याला कामावरून काढले नाही.

२०११ हे वर्ष भारतासाठी आर्थिक आघाडीवर वाईट वर्ष ठरले आहे. कारण एकापाठोपाठ अनेक संकटे आलीत जसे –

* अमेरीकेत मंदी
* पेट्रोलची दरवाढ
* काळया पैशाची वाढती आवक
* काळया पैशाची वाढती चर्चा
* बांधकाम क्षेत्रातील मंदी, औद्योगिक क्षेत्रात वाढलेली अस्वस्थता
* विदेशी गुंतवणूकीत (न झालेले) वाढ
* वेगाने झालेली चलनवाढ

असे असले तरी भारतीय अर्थव्यवस्था कोलमडणार नाही असा निर्मला सीतारमण यांचा आशावाद अधिक बोलका आहे. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू नरेंद्र जाधव यांच्या मते ही मंदी नाही. विकासाचा दर सतत नकारात्मक असेल तर मंदी आहे असे म्हणता येईल. भारतातील आर्थिक विकासाचा दर ७% वरून ४.५% वर येण म्हणजे मंदी नव्हे. त्यामुळे मंदीचा बागूलबुवा करण्यापेक्षा मंदीचा सामना करण्याची तयारी ठेवणे गरजेचे आहे.

थोडक्यात संकटाचे व्यवस्थापन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सरकार विविध क्षेत्रांना पॅकेजेस व सोयी-सुविधा देऊन आपले काम करीत आहे. पण नुसते शासनावर विसबूंन न राहता उद्योजकांनीही स्वत:चे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. तसेच वैयक्तिक पातळीवर देखील व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. मंदीविषयी निरर्थक भ्रम व भीती बाळगण्यापेक्षा तिच्याकडे सकारात्मक पैलूने कसे बघता येईल याची चर्चा घडवून आणणे, तज्ञांनी मार्गदर्शन करणे, तसेच जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.

आपल्या देशात विविध सामाजिक विषयांवर होणाऱ्या चर्चाऐवजी आता आर्थिक संकटे, मंदीची कारणे, परिणाम व सामना, बाजारव्यवस्था, आर्थिक उलाढाली व व्यवहार यासारख्या महत्वाच्या बाबीवर चर्चा होणे गरजेचे आहे. ज्यामुळे सामाजिक समस्या कमी होण्यासोबतच आर्थिक संकटावर मात करता येईल जे अधिक महत्वपूर्ण आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात धावतांना टिकून राहायचे असेल तर 'सर्व्हायवल ऑफ द फिटेस्ट' ही म्हण लक्षात ठेवणे गरजेचे आहे. जंगलात तोच प्राणी जगू शकतो

जो सुदृढ आहे. त्याचप्रमाणे आज तो देश व अर्थव्यवस्था तग धरून उभी राहू शकते जी सुदृढ आहे. जागतिक स्पर्धेत आपण कुठे आहोत ? कुठे असायला हवे ? आणि कुठे असू शकतो ? यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे असे झाल्यास मंदी भारतासाठी एक संधी ठरू शकते याबाबत शंका नाही. वर्तमान स्थितीत सुरू असलेल्या अमेरीका व युरोपमधील मंदीचा भारताला फायदाच झाला आहे. नोव्हेंबर – २०११ साली भारताची निर्यात ३.८०% वाढली आहे. या कालावधीत २३.३ अब्ज डॉलर निर्यात व आयातही २४.५% नी वाढून ३५.९% अब्ज डॉलर्स पर्यत गेली आहे. केवळ तेल आयात ३२.२% नी वाढली आहे. तिचे मूल्य नोव्हेंबर २०१० साली १०.३ अब्ज डॉलर इतके आहे. देशातील आयात निर्यातीचे प्रमाण अनुक्रमे २१.२ अब्ज डॉलर आणि २८.८ अब्ज डॉलर होते. एप्रिल ते नोव्हेबर २०११ दरम्यान निर्यात ३३.२% नी वाढून १९९२.६ अब्ज डॉलर झाली. तर याच दरम्यान आयातही ३०२% नी वाढून ३०९.५ अब्ज डॉलर झाली आहे. यामूळे चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यातील देशाची व्यापारी तूट ही ११६.८ अब्ज डॉलरची राखली गेली आहे. फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष रामू एस. देवरा यांच्या मते एकूणच जागतिक आर्थिक सदयस्थितीमूळे चालू आर्थिक वर्षात २०१२ निर्यात २७२ अब्ज डॉलर इतकी राहिल. युरोपातील मंदीमुळे मार्च २०१२ अखेर निर्यातीचे प्रमाण हे उद्दिष्टापेक्षा कमी, २८० अब्ज डॉलर इतके राहिल असे मत 'राहूल खुल्लर' सचिव, केंद्रीय वाणिज्य खाते यांनी व्यक्त केले आहे. यावरून असे म्हणता येईल की, मंदीचा भारताला लाभच झालेला आहे. मंदीला अनुरूप सकारात्मक दृष्टीकोन व आर्थिक व्यवस्थापन केल्यास मंदी ही एक सुसंधी ठरेल पण दुसरीकडे हे देखील महत्वाचे आहे ही, भारत २०२० पर्यत महासत्ता बनेल हे स्वप्न सत्यात उतरणार नाही कारण ४०% गरीबी रेषेखालील लोकांना आपण दोन वेळेचे पोटभर जेवण देऊ शकलो तरी बऱ्याच प्रमाणात विकासाचे उद्दिष्ट साध्य झाले असे म्हणता येईल.

**सारांश :**

भारतीय अर्थव्यवस्थेसमोर असलेले एक मोठे आव्हान म्हणजे मंदीची चाहूल होय. भारतात मंदी पूर्णपणे आली नसली तरी तिने अर्थव्यवस्थेच्या दारावर थाप दिली आहे. ५ टक्के जी.डी.पी. असताना तो शून्य टक्के झाला नाही, असे म्हणत मंदीचे भय नाकारणाऱ्यांना आगामी काळात मंदीचा सामना करता येईल का ? या प्रश्नाचे उत्तर शोधणे कठीण होईल. भारतीय अर्थव्यवस्था संक्रमण अवस्थेत आहे. म्हणजेच ती सध्या सुस्तीच्या अवस्थेत आहे. या अवस्थेवर उपाय शोधले नाहीत किंवा प्रतिबंध लावले नाहीत तर सुस्ती मंदीकडे वाटचाल करेल हे स्पष्टपणे दिसते आहे.

नोकऱ्या न मिळणे, सुशिक्षितांची वाढती बेरोजगारी, औद्योगिक उत्पादनातील घट, कृषी क्षेत्रातील घसरण, वाढती वित्तीय तूट, बाजारातील पुन्हा-पुन्हा होणारी अनियमित घसरण, बँकांची अस्वस्थ करणारी धोरणे, आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीने भारतीय अर्थव्यवस्थेबदल व्यक्त केलेली भिती, गरिबीचा वाढता निर्देशांक, मुडीजचा अहवाल, सामान्य लोकामधील वाढत चाललेली अस्वस्थता, असुरक्षिततेची वाढती भावना, ग्रामीण क्षेत्राची उपेक्षा, स्वरोजगाराकडे दुर्लक्ष या व यासारख्या अनेक

दाखल्यांमुळे मंदीची चाहूल भारतीय अर्थव्यवस्थेस देखील लागली आहे. तिचा सामना करणे हे आज भारतासमोरील एक मोठे आव्हान आहे.

अत्याधिक मंदी अर्थव्यवस्थेला निराशावादितेकडे घेऊन जाते. त्यामुळे तिला आधीच सुस्तीच्या अवस्थेतून बाहेर काढणे गरजेचे आहे. त्यासाठी गुंतवणुकीचे नवीन पर्याय शोधणे, नवीन प्रकल्प उभारणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, स्वयंरोजगाराला प्रोत्याहन देणे, पारंपरिक व्यवसाय जीवित ठेवणे, आर्थिक वृद्धीदर वाढविण्याचे प्रयत्न करणे, विकासाचे नवीन स्त्रोत शोधणे, जुने आर्थिक प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करणे, तरूणाईला विश्वासात घेणे, ग्रामोद्धार करणे, यासारखे प्रयत्न करणे गरजेचे आहे. हळूहळू मंदीकडे वाटचाल करणारी अर्थव्यावस्था पुन्हा पूर्वपदावर आणणे हे आज एक आव्हान आहे. मंदीमूळे निर्माण होत असलेली बेकारी, त्यामुळे भरकटणारी तरूणाई व गुन्हेगारी प्रवृत्तीत होत असलेली वाढ, हे देखील आगामी काळातील मोठे संकट आहे.

गुंतवणूक हा करमणुकीचा करण्याचा विषय नव्हे तर अभ्यासपूर्णरित्या गांभीर्याने घेतला जाणारा निर्णय आहे. २०१५ साली ३० टक्के असलेली गुतवणूक २०१९ साली २८.९ टक्के झाली. मागील ५ वर्षात गुंतवणुकीचा दर २८.३ टक्के एवढा एकसारखा असलेला दिसून येतो. निर्देशांकातील आणि शेअर बाजारातील उतार-चढावामुळे गुंतवणुकीवर परिणाम झाला आहे. वर्तमान स्थितीत शेअर बाजारात सुवर्णकाळ आहे पण त्यात गुंतवणूक करावी की करू नये ? हा संभ्रम गुंतवणूकदारांमध्ये आहे. बँकांचे विलीनीकरण अर्थव्यवस्थेला मजबुती देईल पण त्याला १५ ते २० वर्षाचा कालावधी लागेल. येत्या ५ वर्षात मात्र बचत-गुंतवणूक यातील टंचाईमूळे एकूण भांडवलनिर्मितीत घट दिसून येईल.

अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने १.७६ लाखांचे पॅकेज जाहीर केले. पण, त्याचा वापर केवळ संघटित क्षेत्रासाठी केला जाणार आहे. त्यामुळे असंघटित क्षेत्राचे काय ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. रोजगार वाढविण्यासाठी कोणतेही ठोस पॅकेज नाही त्यामुळे रोजगार संधी वाढविण्यासाठी गुंतवणुकीचा मोठा प्रश्न आहे.

सुस्तीच्या या अवस्थेत बाजारातील मागणीत घट झाल्यामुळे सामान्य व्यापारी हवालदिल आहे. ऑटो सेक्टरमधील घट एक चिंतेचा विषय आहे. जेट एयरवेज बंद होणे, बीएसएनएलचे खाजगीकरण होण्याचे संकेत, डाकसेवेतील १५००० कोटीचे वार्षिक नुकसान, विमा आणि मास्टरकार्ड कंपनी तोटयात येणे, या मंदीची नांदी देणाऱ्या घटना आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुख क्रिस्टेलिया जोर्जिएव्हा यांनी येत्या काही वर्षात भारताला मंदीची झळ सोसावी लागेल असा इशारा दिला आहे. मंदीचा सामना करण्यासाठी आता विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची :**


१. दत्त एवम, भारतीय अर्थव्यवस्था (५३ वा संशोधित संस्करण २००८), एस. चंद एण्ड कंपनी.
२. धर्माधिकारी अविनाश, चाणक्य मंडल परिवार : (डिसे. - जाने., अंक १२,१३ वा), सदाशिव पेठ, पुणे.
३. कोळम्बे रंजन (२०१९) : भारतीय अर्थव्यवस्था भगीरथ प्रकाशन, पुणे.
४. लोकप्रभा - २०१०, २०११.
५. दै. लोकसत्ता - ०३/०१/२०१२
६. दै. भास्कर - ०३/०१/२०१२


◆◆◆

# २०१९ चे नोबेल पारितोषिक विजेते

**दि.व्यं.जहागिरदार**
संचालक, कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी,
अमरावती

**प्रस्तावना :**

१४ ऑक्टोबर २०१९ रोजी दरवर्षी प्रमाणे अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला व तो अभिजीत बॅनर्जी, एस्थर डुफ्लो आणि मायकल क्रेमर या तिघांना संयुक्तपणे प्राप्त झाला. अभिजीत बॅनर्जी यांना हा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे भारतीयांना विशेषत: अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना आनंद होणे स्वाभाविक आहे. यापूर्वी १९९८ मध्ये प्रो. अमर्त्य सेन यांना हा पुरस्कार प्राप्त झाला होता. या दोघांनाही विदेशी विद्यापीठांमध्ये केलेल्या संशोधन कार्यामुळे हा पुरस्कार प्राप्त झाला हे ही आपण लक्षात घेतले पाहिजे. आता दोघेही भारतीय वंशाचे अर्थशास्त्र समजले जातात. आतापावेतो प्रो. अभिजीत बॅनर्जी धरून नऊ भारतीयांना नोबेल पुरस्कार प्राप्त झाला आहे. पहिला पुरस्कार इ.स. १९१३ मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना साहित्याचा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर १९३० मध्ये सी.व्ही.रमण यांना भौतिकशास्त्रात, हरगोविंद खुराणा यांना १९६८ मध्ये मेडीसीन मध्ये, शांततेसाठी मदर टेरेसा यांना १९७९ मध्ये, १९८३ मध्ये एस्.चंद्रशेखर यांना भौतिकशास्त्रासाठी, प्रो. अमर्त्य सेन यांना १९९८ मध्ये अर्थशास्त्रासाठी २००९ मध्ये व्हि. रामकृष्णन यांना रसायनशास्त्रासाठी तर कैलास सत्यार्थी यांना २०१४ मध्ये शांततेसाठी आणि आता प्रो. अभिजीत बॅनर्जी यांना अर्थशास्त्रासाठी नोबेल पुरस्कार प्राप्त झाला. नोबेल पुरस्कार हे साहित्य, शांतता, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, मेडीसीन व अर्थशास्त्र ह्या सहा विषयासाठी दरवर्षी दिले जातात. पण ते मृत व्यक्तीस दिले जात नाहीत. विशेष म्हणजे या सहाही विषयांमध्ये भारतीयांनी हे पुरस्कार प्राप्त केले आहेत. अर्थशास्त्रात पती-पत्नी म्हणून बॅनर्जी आणि एस्थर डुफ्लो यांना प्रथमच असा पुरस्कार मिळाला आहे. आपल्या देशातील उच्च शिक्षणाचा प्रसार व त्यांच्याशी संबंधित विद्यार्थी-प्राध्यापक संख्या पाहता आपल्यास मिळणाऱ्या नोबेल पुरस्कारांची संख्या फारच अल्प वाटते.

इ.स. १९९८ मध्ये प्रो. अमर्त्य सेन यांना हा पुरस्कार प्राप्त झाला होता. त्यापूर्वी त्यांनी अर्थशास्त्र, न्याय, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, गणित अशा विषयांमध्ये जागतिक मान्यता प्राप्त केली होती. त्यांच्या अनेक पुस्तकांची तसेच संशोधनपर लेखांची अर्थशास्त्राच्या सर्वसाधारण अभ्यासकांना माहिती होती. इ.स. १९९८ पूर्वी त्यांच्या नावाची नोबेल पुरस्काराबाबत चर्चा झाल्याची माहिती भारतीयांच्या कानावर आली होती. पण, प्रो. अभिजीत व अन्य दोघांनी केलेल्या संशोधनाबाबत अनेकांना जुजबी

माहिती होती. विशेषत: त्यांनी अंमलात आणलेल्या नव्या संशोधन पद्धती देखील अभ्यासकांना फारसा परिचित नसाव्यात. त्यामुळे प्रो. अभिजीत बॅनर्जी, एस्थर डुफ्लो आणि मायकल क्रेमर यांना जेव्हा नोबेल पारितोषिक जाहीर झाले तेव्हा अनेकांना त्याचा सुखद व आनंद देणारा धक्काच बसला. मला हे आठवले की अमर्त्य सेनांना नोबेल पारितोषिक मिळाल्यावर भारतातील इंग्रजीसहीत अनेक प्रादेशिक भाषेतील दैनिकांमधून तसेच साप्ताहिक, पाक्षिकांमधूनही त्यांच्या कार्याबद्दल व त्यांच्याबद्दल भरभरून लिखाण प्रसिद्ध झाले. त्यांच्या बहुतेक सर्व पुस्तकांच्या नव्या आवृत्त्याही दोन-तीन महिन्यात प्रसिद्ध झाल्यात. यंदा मात्र इंग्रजी दैनिके वगळता भारतीय भाषांमधून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकांमधून या तिघांच्या व्यक्तित्वावर फारसे लिखाण प्रसिद्ध झाले नाही. या पार्श्वभूमीवर सदर लेखातून प्रो. अभिजीत बॅनर्जी यांच्यावर व या तिघांच्या संशोधनपर कार्यावर थोडक्यात प्रकाश टाकण्याचा मनोदय आहे.

**प्रो. अभिजीत बॅनर्जी :**

यंदाच्या नोबेल पारितोषिक विजेत्यांमध्ये प्रो. अभिजीत बॅनर्जी हे भारतीय वंशाचे अर्थशास्त्रज्ञ असल्याने त्यांच्या जीवनाविषयी आपणा सर्वांना कुतूहल असणे स्वाभाविक आहे. प्रो. अभिजीत यांचा जन्म २१ फेब्रुवारी १९६१ रोजी मुंबई येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दीपक बॅनर्जी तर आईचे नाव निर्मला. त्यांचे वडील दीपक हे बंगाली तर आई निर्मला ह्या महाराष्ट्रीयन. दोघेही अर्थशास्त्राचे अभ्यासक वडील दीपक बॅनर्जी हे कलकत्ता येथील प्रेसिडन्सी कॉलेजात अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांचा काही वर्षांपूर्वी मृत्यू झाला होता. अभिजीत बॅनर्जी यांचे शालेय शिक्षण कलकत्ता येथील साऊथ पॉईंट हायस्कूल मध्ये झाले. त्याला गणितात विशेष रुची होती. तसेच ते फुटबॉल, क्रिकेट सारख्या खेळांमध्ये सहभागी होत असे. त्याने प्रेसिडन्सी कॉलेज, कलकत्ता येथून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. तेथे अर्थशास्त्र विषय प्रा. दीपक बॅनर्जी शिकवत होते. एकदा विद्यार्थ्यांना शिकवत असतांना एक गंमतच झाली. विशिष्ट सिद्धांत शिकवत असतांना त्यांना असे दिसले की विद्यार्थ्यांना हा सिद्धांत नीट समजला नाही. त्यांना याचा राग आला. ते सर्व वर्गाला उद्देशून म्हणाले,''तोमराशोब गधार बच्चे'' (तुम्ही सर्व गाढवाचे बच्चे आहात) त्या वर्गात अभिजीत होता. तो म्हणाला,''बाबा मी पण येथेच आहे.'' त्यावर प्रा. दीपक बॅनर्जी वर न पाहता म्हणाले,''तोके छारा शोब'' (तू सोडून सर्व). अभिजीतचे सहाध्यायी अशा अनेक घटना सांगतात. प्रेसिडन्सी कॉलेजातून पदवीपर्यंतचे शिक्षण केल्यावर अभिजीत एम्.ए.(अर्थशास्त्र) साठी दिल्लीच्या जेएन्यु मध्ये गेलेत. तेथे प्रभात पटनाईक, कृष्णा भारद्वाज, अमित भादुरी अशा सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांचा सहवास त्याला लाभला. एम्.ए. अर्थशास्त्रात तो प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. त्यानंतर पीएच्.डी. करण्यासाठी ते हार्वर्ड विद्यापीठात गेलेत. पीएच्.डी. प्राप्त केल्यावर प्रिन्सस्टन विद्यापीठात ते चार वर्षे प्राध्यापक होते १९९३ पासून ते जगविख्यात एम्.आय.टी. मध्ये कार्यरत असून सध्या ते फोर्ड फाऊंडेशन इंटरनॅशनल प्रोफेसर आहेत. संशोधन प्रयोगासाठी त्यांनी अब्दुल लतीफ जमील पॉव्हर्टी ॲक्शन लॅब स्थापन केली आहे. त्यांची विद्यार्थीनी व पुढे त्यांच्या सोबत संशोधन करणाऱ्या व आता प्राध्यापक असणाऱ्या इस्थर डुफ्लो यांच्याशी त्यांनी विवाह केला. प्रो. अभिजीत बॅनर्जी, प्रो. एस्थर

डुफ्लो, मायकल क्रेमर यांनी स्वतंत्रपणे तसेच संयुक्तपणे पाहण्यांच्या आधारावर अनेक संशोधनपर लिखाण प्रसिद्ध केले आहे. इ.स. २०११ मध्ये प्रो. बॅनर्जी आणि प्रो. एस्थर डुफ्लो यांचे Poor Economics आणि नोव्हें. २०१९ मध्ये Good Economics for Hard Times ही पुस्तके प्रसिद्ध झालीत.

**संशोधन कार्य :**

गेल्या काही दशकांपासून जागतिक दारिद्र्य हा एक व्यापक आणि गुंतागुंतीचा प्रश्न बनला आहे. आजही जगातील ७०० मिलीयन इतकी लोकसंख्या अत्यल्प उत्पन्नावर जीवन कंठतांना दिसते. तसेच, दर वर्षी पाच वर्षाखालील अंदाजे ५ मिलीयन बालके अशा रोगांनी मृत पावत आहेत की जे रोग नियंत्रणात आणणे सहज शक्य आहे. अल्प आणि मध्यम उत्पन्न गटातील देशांमध्ये अनेक मुले/मुली प्राथमिक शाळेत जातात पण गणित, वाचन व लिहणे न येताच शिक्षण सोडून जातात. असे काही महत्त्वाचे प्रश्न दारिद्र्याशी संबंधित असून ते जगापुढील तसेच अर्थशास्त्रासमोरील प्रश्न झाले आहेत.

समाजातील तळागाळातील जनसंख्येला मदत करण्यासाठी योग्य ती व्यूहरचना कशी निश्चित करता येईल या पार्श्वभूमीवर २०१९ मध्ये नोबल पारितोषिक मिळविणाऱ्यांचा संशोधनाचा विचार करता येईल. त्यांनी प्रयोगशील वा प्रयोगात्मक दृष्टिकोन (Experimental Approach) स्वीकारून विकासाच्या अर्थशास्त्राला बदलून टाकले. विकासाच्या अर्थशास्त्रात जागतिक दारिद्र्याचे अध्ययन करून त्यामागची कारणे व उपाय सांगितले जात होते. नोबेल पारितोषिक विजेत्या तिघांनी जवळपास वीस वर्षाच्या अध्ययन आणि संशोधनातून विकासाच्या अर्थशास्त्राला प्रायोगिक क्षेत्रात परिवर्तित करून दारिद्र्यावरील उपायांचा पुरस्कार केला आणि विशेष म्हणजे त्यांनी सुचविलेल्या उपायांची अंमलबजावणी अनेक देशात सुरूही झाली आहे. असे परिवर्तन घडून येण्यास अन्तर्गत आणि बाह्य क्षेत्रातील नवप्रवर्तन (Innovation) कारणीभूत आहे. एंगस डेटॉन (२०१५) यांनी विकासाच्या अर्थशास्त्रात व्यष्टी विश्लेषणाच्या पद्धतीचा वापर केला होता. त्यांच्या अध्ययनाचे सार असे की, चांगल्या स्थितीत असणाऱ्यांचे मापन हे दारिद्र्याशी मुकाबला करणाऱ्या उपायांशी वा प्रयत्नांशी परस्पर जोडले पाहिजे. इ.स. १९६० च्या सुमारास श्रम अर्थशास्त्रात विश्वासार्हता क्रांती (Credibility Revolution) सुरू झाली. त्याद्वारा आर्थिक संशोधन हे कार्यकारण प्रभावाकडे (Casual effect) वळविले गेले. मानवी व्यवहार प्रोत्साहन आणि माहितीच्या द्वारे कसे प्रभावित होतात यावर विशेष लक्ष अशा संशोधनातून दिल्या गेले. अशा प्रकारे व्यष्टी आर्थिक सिद्धांत योग्य शास्त्रीय पद्धतीतून उदयास येऊ लागलेत. अशा अध्ययनामुळे दारिद्र्य मापन आणि निर्मूलन अशा प्रश्नांचे निर्धारक (Determinants) ठरविणे शक्य होऊ लागलेत. असे अभ्यास करणाऱ्यांना नोबेल मिळाल्याचे आपणास माहीत आहे. दारिद्र्य निर्मूलनाचे प्रभावी उपाय सांगणारे केवळ सिद्धांत महत्त्वाचे नाहीत. कारण असे सिद्धांत याबाबत ठामपणे काही बाबींचा उलगडा करू शकत नाहीत. जसे, व्यष्टी वित्त योजना गरीब वर्गात उपक्रमशीलता वाढवू शकेल का यावर हे सिद्धांत उत्तर देऊ शकत नाहीत. ही उत्तरे देण्यासाठी अनुभवनिष्ट दृष्टिकोन आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर बॅनर्जी, डुफ्लो आणि क्रेमर यांनी केलेले संशोधन अत्यंत मोलाचे

ठरले आहे.

या तिघांच्या अध्ययनातून दारिद्र्याच्या स्वरूपातील विविधता आणि त्यांची निश्चित कारणे शक्य झाले आहे. तसेच कोणत्या स्वरूपात व कोणत्या पातळीवर अर्थव्यवस्थेत वा विशिष्ट क्षेत्रात हस्तक्षेप करणे गरजेचे आहे, या दृष्टीने शिक्षण व आरोग्य क्षेत्रांचा विचार करू. शिक्षणाच्या बाबत व्यष्टी पाहणी करून या विजेत्यांनी असा निष्कर्ष काढला वा उपाय सुचविला की, विद्यार्थ्यांची शिकण्याची प्रक्रिया सुधारावी म्हणून शिक्षकांची करारावर नेमणूक करणे व्यय बचत करणारे ठरते. आरोग्याच्या क्षेत्रात गरीब वर्ग आरोग्याची निगा राखणाऱ्या सेवांच्या किंमतींशी लवचीक असतो. म्हणून अशा सेवांचा गरिबांनी वापर करावा म्हणून त्यांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रमही अंमलात आणले पाहिजेत. १९९० च्या मध्यात क्रेमेर व त्यांच्या सहकाऱ्यांनी केनियातील शालेय शिक्षणाच्या प्रश्नांचे अध्ययन करण्यासाठी नियंत्रित चाचण्या (Randomized Controlled Trials) घेतल्यात.

नोबेल पारितोषिक विजेत्या या तीनही अर्थशास्त्रज्ञांच्या अध्ययन, संशोधनाचा आधार हा प्रत्यक्षातील प्रयोग आहे. अशा नियंत्रित नमुना चाचण्या, शासन वा अन्य संस्थेच्या हस्तक्षेपामुळे किंवा कार्यक्रमामुळे कोणता परिणाम घडून आला याचे मूल्यांकन करणारी पद्धत म्हणजे नियंत्रित नमुना चाचणी पद्धत होय. या कार्यक्रमात समाविष्ट झालेल्या गटाचे वर्तन कार्यक्रमात समाविष्ट न होणाऱ्यांच्या तुलनेत तपासले जाते. किंवा जे या कार्यक्रमात समाविष्ट झाले नाहीत ते जर समाविष्ट झाले असते तर त्यांचे वर्तन कसे घडून आले असते याही दृष्टीने वर्तवणूकीचे अध्ययन केले जाते. या पद्धतीत संशोधकाला अधिक स्वतंत्र असते. या पद्धतीत नमुन्यांची निवड ही निवड अभिनत (selection bias) नाही तसेच जे उपचार केले जातात त्यावर संशोधकाचे नियंत्रण असते. या पद्धतीत जी धोरणे अजून राबविली गेली नाहीत ती जर राबविली गेलीत तर कोणत्या निष्पत्ती (Results)येतील हे देखील लक्षात येते. या तीन विजेत्यांनी जी संशोधन प्रणाली विकसित केली त्यावर तज्ञांनी काही आक्षेपही नोंदविले आहेत. या पद्धतीद्वारे एखादे धोरण अंमलात आणणे यशस्वी ठरेल का याचे मार्गदर्शन केल्या जाते. पण विविध धोरणांमध्ये सर्वात प्रभावी धोरण कोणते याचे उत्तर ही पद्धती देऊ शकत नाही. या पद्धतीने नियंत्रित नमुन्यांद्वारा काढलेले निष्कर्ष हे संपूर्ण राज्यात वा देशात लागू करता येतील असे नाही. २०१५ मध्ये नोबेल पारितोषिक प्राप्त करणाऱ्या डेटॉन यांनी देखील अशीच टीका या पद्धतीवर केली आहे. ही संशोधन पद्धती भरपूर वेळ घेणारी व खर्चीक असल्याची टीका केली जाते. अमेरिकेतील जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठातील तज्ञ अजय चिब्बेर यांनी नमूद केले आहे की, पूर्व आशियातील देशांनी जी विकासाची उंची गाठली ती नियंत्रित नमुना चाचण्यांद्वारे केलेल्या अध्ययनातून साध्य झाली नाही.

त्यानंतर बॅनर्जी व डुफ्लो यांनी आणि तसेच त्यांनी क्रेमरसह आरोग्य, शिक्षण, शेती, वित्त इ. क्षेत्रातही या प्रकारच्या चाचण्या घेतल्यात. अशा संशोधन पद्धतीद्वारे काही कूटप्रश्नही सोडविणे शक्य आहे. जगातील विविध देशांमधील प्रती व्यक्ती उत्पन्नात प्रचंड तफावत का असते? विकसनशील देशांमध्ये एखाद्या उत्पादक घटकापासून प्राप्त उत्पन्नात भिन्नता का असते? काही पेढ्या (firms) नवीन तंत्रज्ञान आत्मसात का करीत नाही? अशा कूट

प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी ही नवीन संशोधन पद्धत उपयुक्त ठरू शकते.

जागतिक पातळीवर दारिद्र्याची समस्या सोडविण्यासाठी अनुभवनिष्ट दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. याला आपण विकास अर्थशास्त्राचा आधुनिक दृष्टिकोन म्हणू शकतो. कारण यात प्रत्यक्ष परिणामांच्या आधारावर निश्चित निष्कर्ष काढण्यासाठी नियंत्रित नमुना क्षेत्र चाचण्यांचा वापर केला जातो. इ.स. २००३ पासून क्रेमर व त्यांच्या सहकार्यांनी केनियात शिक्षणाच्या उत्पादन फलनाबाबत विविध चाचण्या घेतल्यात. अमेरिकन एकॉनोमिक रिव्हू मधील त्यांचा २००३ मधील संशोधनपर लेख (Randomised Evaluations of Educational Programmes in Developing Countries : Some lessons) यादृष्टीने महत्त्वाचा ठरतो. त्यानंतर अभिजीत बॅनर्जी आणि डुफ्लो यांनी अन्य काही क्षेत्रातही अशाच पाहण्या केल्यात. परिणामत: विकास अर्थशास्त्राच्या विविध शाखांच्या अध्ययनात ह्या प्रकारची पाहणी व कारण-परिणाम तसेच उपाय योजना यांना महत्त्व प्राप्त झाले. अशा अध्ययनातून बाजार अकार्यक्षमता स्पष्ट झाल्यात त्या अकार्यक्षमता कशा दूर करता येतील याचे मार्गही सापडलेत. या संदर्भात इ.स. २०१० मध्ये बॅनर्जी, डुफ्लो आणि ग्लेनस्टेअर यांचा "Pitfals of Participatory Programme : Evidence from Randomized Evaluation in Education in India". हा तीस पानांचा विस्तीर्ण संशोधनपर लेख जिज्ञासूंनी अवश्य पहावा. बॅनर्जी आणि डुफ्लो "Poor Economics (2011) " या ग्रंथात आणखी एक पाऊल पुढे गेलेत. आरोग्य, शालेय शिक्षण, गरिबांचे उत्पन्न अशा विषयांवर महत्त्वपूर्ण निष्कर्ष त्यांनी नवीन तंत्राद्वारे काढून दाखविलेत. या तीनही संशोधकांनी विकास अर्थशास्त्रातील संशोधनासाठी नवीन वाट घालून दिली आहे. अर्थशास्त्रात नोबेल पारितोषिक देणाऱ्या समितीने त्यांच्या संशोधनाचे महत्त्व स्पष्ट करतांना म्हटले की, 'In just two decades their new experiment based approach has transformed development economics, which is now a flourishing field of research.....'

**समारोप :**

प्रयोगशील दृष्टीने विकास प्रक्रिया राबवून गरिबीचे प्रश्न सोडविण्यासाठी वापरलेली नियंत्रित नमुना चाचण्या पद्धती आज संशोधनकर्त्यांमध्ये लोकप्रिय ठरली असून त्यामुळे विकासाच्या अर्थशास्त्राचे स्वरूप बदलले आहे. भारतासारख्या देशात विकास साधतांना तत्त्व विचार आणि अंमलबजावणी यात बरीच तफावत दिसते. अशा स्थितीत अंमलबजावणी योग्य व्हावी म्हणून संशोधनाची ही पद्धती उपयोगी ठरू शकते. अर्थात या पद्धतीचा वापर म्हणजे दारिद्र्य निर्मूलनाचा रामबाण उपाय आहे असेही समजता कामा नये.

**संदर्भ :**


1) The Royal Swedish Academy of Science (2019) : Understanding Development and Poverty Alleviation.
2) Times of India, 15th Oct. 2019.
3) Goswami Omkar (2019) : Noble Arrow in the Quiver, Economic Times, 29th Oct.
4) Chhibber Ajay (2019) : Relying on sure Economics, Economic Times, 9 Nov.
५) जहागिरदार दि.व्यं (२०१९) : अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराचे मानकरी प्रो. अभिजीत बॅनर्जी, दै. हिंदुस्थान, २१ ऑक्टो. २०१९.
६) हातेकर नीरज, पडवळ राजन (२०१९) : आरसीटी प्रणाली : प्रभाव आणि मर्यादा, दै. लोकसत्ता, २६ ऑक्टो.


◆◆◆

# अभिजीत बॅनर्जी यांचे आर्थिक विचार

**रामदास यशवंतराव माहोरे**
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद
प्राध्यापक व माजी पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागप्रमुख,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

जागतिक गरीबी निर्मूलनाविषयी केलेल्या प्रयोगात्मक संशोधनासाठी भारतीय वंशाचे अमेरिकन संशोधक अभिजीत बॅनर्जी, त्यांच्या पत्नी सहसंशोधक एस्थर डुफ्लो आणि आणि मायकल क्रेमर यांना २०१९ चा अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार प्राप्त झाला. अभिजीत बॅनर्जी यांना गरीबीची जाणीव फारच अल्प वयात झाली होती. कलकत्ता शहरात त्यांच्या घरामागे गरीबांची वस्ती होती. गरीबांच्या मुलांना खेळण्यासाठी बराच वेळ मिळत होता. ती मुले अभिजित बॅनर्जी यांना सर्वच खेळात हरवित असत.

गरीबांची दारिद्र्यातून सुटकाझाली पाहिजे असे त्यांना वाटत होते. गरीबांच्या अर्थशास्त्रासाठी गरीबीचे अर्थशास्त्र संकल्पना चुकीची वाटते. कारण गरीबांजवळ फारच कमी संपत्ती असते. त्यांच्याजवळ आर्थिक अस्तित्वासाठी काहीच नसते.या चुकीच्या समजुतीमुळे जागतिक दारिद्र्या विरूद्धचा लढा कमजोर बनतो. साध्या समस्येच्या साध्या उपाययोजनांना काही हानिकारक घटनांमुळे दारिद्र्य निर्मूलनाला अपेक्षित यश मिळत नाही.

भारताने काही वर्षापूर्वी जी सामाजिक धोरणे आखली होती. ती आता कालबाह्य झालेली आहेत. त्या धोरणात अपेक्षित बदल करणे आवश्यक आहे. भारतात दारिद्र्य निर्मूलनासाठी ४०० पेक्षा जास्त योजना कार्यान्वित करण्यात आल्या. या योजनांची नावे योजनांची अंमलबजावणी करणाऱ्यांना सुद्धा माहित नसतात. जागतिक बँकेने या योजनांची माहिती संकलित केली होती. या योजनांपैकी काही योजनांवरील खर्चाची तरतूद फारच कमी होती. बऱ्याच योजनांची आवश्यकता नव्हती. आज आपणास आवश्यक योजनांचा अग्रक्रम निर्धारित करावा लागेल आणि त्यानुसार योग्य योजनांची अंमलबजावणी करावी लागेल.

आर्थिक प्रगतीसाठी प्रशासकीय दक्षतेचा अभाव जाणवतो. प्रशासकीय दक्षता वाढविण्याच्या योग्य तंत्राचा अवलंब करता येत नाही. ती पैशापेक्षा सुद्धा दुर्मिळ आहे. आर्थिक प्रगतीसाठी प्रशासकीय दक्षतेत वाढ झाली पाहिजे. साधनांची कमतरता ही दुसरी महत्त्वाची समस्या होय.सरकारला उत्पन्नात वाढ करण्यासाठी कर वसुलीत वाढ करावी लागेल. सकल राष्ट्रीय उत्पन्न आणि कर अनुपात यामध्ये विशेष बदल झाला नाही. परिस्थितीत सुधारणा झालेली असली तरी अपेक्षित प्रमाणात यश मिळाले नाही. कर वसुली बाबत अपेक्षित उद्दिष्टपूर्ती होत नाही. भारतातील शहरांच्या विकासाकरिता तीन ट्रिलियन डॉलरची गुंतवणूक आवश्यक आहे. या

दृष्टीने विचार करता साधनांचा अभाव मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्या संशोधनामुळे गरीबी निर्मूलनाच्या क्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. गरीबीची समस्या फक्त भारत, दक्षिण आशिया किंवा विकसनशील देशांपुरती मर्यादित नसून विकसित देशातही मोठ्या प्रमाणात गरीबी आढळून येते. गरीबी सार्वत्रिक स्वरूपाची आहे. समाजातील विभिन्न गटातील दारिद्र्याच्या प्रमाणात तफावत आढळते.

आज भारताची अर्थव्यवस्था 'मध्यम उत्पन्न जाळ्यात' अडकलेली आहे.मध्यम उत्पन्न जाळे म्हणजे ज्या देशातील वृद्धि दर एका निश्चित बिंदू नंतर थांबतो. जागतिक पातळीवर विचार केला तर आपल्या देशातील मानवी भांडवल फार उच्च गुणवत्तेचे नाही. आपली पायाभूत संरचना उच्च दर्जाची नाही. पर्यावरणाचे प्रदूषण वाढत आहे. तरीसुद्धा आपण प्रगती करीत आहोत. आपल्या देशातील साधनांची वाटणी विषम स्वरूपाची झालेली आहे.

देशात व्यावसायिकांसाठी मोठ्याा प्रमाणात संधी निर्माण केल्या जातात. संधी मिळताच ते तिचा लाभ घेतात. जेव्हा संधी मिळणार नाही तेव्हा वृद्धिदरात शीघ्र गतीने ऱ्हास होऊ शकतो. भारतात सध्या जी स्थिती निर्माण झाली आहे तशी स्थिती इतर देशात सुद्धा निर्माण झाली होती. १९६१ ते १९८० या काळात ब्राझीलच्या अर्थव्यवस्थेचा वृद्धि दर ९ टक्के होता. १९८० नंतर वृद्धि स्थिरावली. नंतर ती पूर्ववत होऊ शकली नाही. मंदी फारच तेजीने येऊ शकते. एका वर्षात सुद्धा संपूर्ण चित्र पूर्णपणे बदलू शकते. त्यानंतर सुरुवातीचा वृद्धि दर गाठणे शक्य होत नाही. जपान मध्ये सुद्धा अशीच स्थिती निर्माण झाली होती. सुरुवातीला भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धि दर जास्त होता. भारतात निर्माण झालेली स्थिती सुधारण्यासाठी आर्थिक संरचना कशी बदलता येईल या दृष्टीने प्रयत्न करावे लागतील. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने खालील बाबी महत्त्वाच्या आहेत.

**१) शिक्षण :**

भारताने शिक्षणाबाबत चांगली प्रगती केली आहे. १९९०च्या दशकात बरीच मुले शाळेत जात नव्हती. ती मुले त्या काळात बाल श्रमिक म्हणून काम करीत होती. त्यांचे आई-वडील सुद्धा त्यांना गरीबीमुळे शाळेत पाठवित नव्हते. काही भौगोलिक क्षेत्रे वगळता आज भारतातील सर्व मुले शाळेत जातात. १२ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांचे शाळेत नामांकन झालेले असते. मुला-मुलीत कोणताच भेदभाव केला जात नाही. यापैकी बरीच मुले माध्यमिक स्तरापर्यंत शाळेत जातात.

त्यांच्या असे निदर्शनास आले की शाळेत जाणारी बहुतांश मुले काहीच शिकत नाहीत. पाचव्या वर्गात शिकणाऱ्या (जास्तीत जास्त) विद्यार्थ्यांची गणितातील प्रगती दुसऱ्या वर्गांच्या मुलांबरोबर आढळली. मातृभाषेच्या प्रगतीबाबत स्थिती सुद्धा सारखीच आढळून आली. यासंबंधी वाईट वाटण्याचे कारण म्हणजे अशा विद्यार्थ्यांच्या प्रगतीत सुधारणा होत नाही. जे विद्यार्थी दुसऱ्या वर्गांत मागे होते ते पाचव्या वर्गांत सुद्धा मागे राहतात. ते आठवी पर्यंत अधिक मागे पडतात. अशा रीतीने त्यांची मागे राहण्याची प्रवृत्ती कायम राहते.

आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यार्थ्यांसाठी एक परीक्षा घेतली जाते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी मूल्यांकन कार्यक्रमात भारताचे प्राप्तांक फारच कमी होते. या चाचणीतील प्राप्तांक श्रेणी फारच निम्न पातळीची

असल्यामुळे भारताने यामध्ये भाग घेणे बंद केले आहे.जेव्हा जागतिक बँकेच्या अहवालात असे नमूद केले जाते की भारतातील मानवी भांडवल बांगलादेशापेक्षा निम्न प्रतीचे आहे तेव्हा त्याबाबत नापसंती दर्शविली जाते.

भारतात शिक्षणाचा अधिकार हा कायदा करण्यात आला. या कायद्याचा उद्देश शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडविणे आहे. या कायद्यानुसार पायाभूत संरचनेवर भर देण्यात आला आहे. शिक्षकांना योग्य पगार दिले पाहिजे. तसेच त्यांना जास्त प्रमाणात प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्यामुळे आमच्या शिक्षण पद्धतीत सुधारणा होऊ शकेल. परंतु भारतातील शिक्षण पद्धती मधील दोष दूर झालेले नाहीत. आपल्या देशातील शिक्षकांचे पगार समाधानकारक आहेत. शिक्षकाची नोकरी चांगली मानली जाते. अशी नोकरी मिळविणे फार कठीण झाले आहे.

चांगले वेतन आणि चांगले परिणाम यांची पडताळणी करण्याच्या दृष्टीने मोठ्याा प्रमाणात सर्वेक्षण करण्यात आले होते. यासाठी काही शाळांची दैव नमुना पद्धतीने निवड करण्यात आली होती.ज्या शाळांमधील शिक्षकांचे पगार दुप्पट झाले होते त्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या निकालावर वेतन वृद्धिचा झालेला परिणाम शून्य टक्के होता. शाळेतील पायाभूत सोयींमध्ये सुधारणा घडून आल्या आणि पगारात सुद्धा वाढझाली. परंतु त्यामुळे विद्यार्थ्यांच्या निकालात काहीच वाढ झालेली नव्हती.

विद्यार्थ्यांची शिक्षणात प्रगती कशी होईल यासंबंधी काही पर्यायी उपाय शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यादृष्टीने आपणास जास्त प्रमाणात प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. भारतातील अनेक राज्यात ५० टक्केपेक्षा जास्त मुले खाजगी शाळेत शिक्षण घेतात. या शाळेत विद्यार्थ्यांकडून जास्त प्रमाणात फी वसूल केली जाते. सरकारी शाळेच्या तुलनेत खासगी शाळा चालविणे फारच कमी खर्चाचे आहे. सरकारी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांवर होणारा खर्च खाजगी शाळेच्या तुलनेत २ ते ५ पट जास्त असतो.

शिक्षण पद्धतीच्या परिणामकारकतेसंबंधी आंध्र प्रदेशात एक अभ्यास करण्यात आला होता.आंध्रप्रदेशातील शिक्षण पद्धती तुलनात्मकदृष्ट्या चांगली असल्यामुळे हा अभ्यास महत्त्वपूर्ण मानला जातो. या अभ्यासाकरिता विद्यार्थ्यांना मोठ्याा प्रमाणात खाजगी शाळेत प्रवेश घेण्यासाठी पावत्या (Voucher) देण्यात आल्या होत्या.या प्रोत्साहन पावत्या दिल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे सुलभ झाले होते. या विद्यार्थ्यांची दैव नमुना पद्धतीने निवड करण्यात आली होती. या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली होती. त्यानंतर या विद्यार्थ्यांचे प्राप्त गुण विचारात घेण्यात आले होते. खाजगी शाळांचा निकाल सुद्धा सरकारी शाळांप्रमाणेच वाईट होता. 'शिक्षणाचा अधिकार' या कायद्यानुसार खाजगी आणि सरकारी शाळांमधील शिक्षकांना नियमानुसार पगार देणे बंधनकारक आहे. याचा शिक्षणाच्या गुणवत्तेवर काहीच परिणाम होत नाही. शाळांमध्ये पायाभूत सोयी निर्माण करणे बंधनकारक असूनही काही शाळांनी पायाभूत सोयींची निर्मिती केली नव्हती. त्यामुळे देशातील १०००० पेक्षा जास्त शाळा बंद पडल्या.त्याचा गुणवत्तेवर काहीच परिणाम झाला नाही.

२००३ मध्ये अभिजीत बॅनर्जी, एस्थर डुफ्लो आणि सेंन्थिल मुलाईनाथन यांच्या सहकार्याने

'अब्दुल लतीफ जमील पॉव्हर्टी ॲक्शन लॅब' (PAL) ची स्थापना करण्यात आली. शिक्षणातील मुख्य समस्या अध्यापनाची आहे. आपण मुलांची सामाजिक आर्थिक स्थिती आणि शिक्षकांची शिकविण्याची क्षमता विचारात न घेता सर्वच विद्यार्थ्यांना एकच अभ्यासक्रम शिकवतो. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम समजत नाही. जर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम समजला नसेल तर दुसऱ्यांदा त्यांना शिकविण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारची मदत केली जात नाही. जर आपण शिक्षकांना विचारले की आपण विद्यार्थ्यांना मदत का करीत नाही तर शिक्षक निराशाजनक पद्धतीने उत्तर देतात की विद्यार्थी अभ्यासात फारच कमकुवत आहेत. शिक्षकांजवळ शिक्षणात मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा मदत करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा वेळ नसतो. सर्व विद्यार्थ्यांसाठी समान अभ्यासक्रम असला तर प्रथम पिढीतील शिक्षण घेणारे विद्यार्थी अभ्यासात मागे पडतात. प्रथम पिढीतील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे आई-वडील निरक्षर असतात. त्यांना आई-वडिलांचे मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे ते अभ्यासक्रमात नेहमीच मागे राहतात.

त्यांनी शिक्षणाच्या प्रगती संबधी सात राज्यात मोठ्याा प्रमाणात प्रयोग केले. त्यावरून त्यांनी असा निष्कर्ष काढला की विद्यार्थ्यांना तेच शिकविले पाहिजे की जे त्यांच्यासाठी त्यावेळी आणि त्या परिस्थितीत शिकणे आवश्यक होते. त्यांना जे शिक्षण आवश्यक आहे ते प्राप्त झाले तर ते अभ्यासात चांगली प्रगती करू शकतात. अनेक वर्षापासून आपण शिक्षण पद्धतीत बदल करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यात बदल करणे शक्य वाटत नाही अशी आपली धारणा आहे. त्यांनी शिक्षणासंबंधी काही प्रयोग स्वयंसेवी संस्थांद्वारे करण्याचा प्रयत्न केला विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन तीन महिनेपर्यंत शिकविण्यात आले. या प्रयोगाच्या दरम्यान त्यांना असे आढळून आले की मागील दोन वर्षाच्या तुलनेत विद्यार्थ्यांची प्रगती चांगली होती.

त्यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्न केला आहे. ही बाब अधिक स्पष्ट करण्यासाठी त्यांनी दिल्लीचे उदाहरण दिले आहे. पूर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांवर प्रयोग करण्यात आला. या प्रयोगावरून असे स्पष्ट करण्यात आले की मुले गणिताच्या सोप्या प्रश्नांचे उत्तर देऊ शकतात. याकरिता गणिताच्या सैद्धांतिक ज्ञानाची आवश्यकता नसते. त्यांना त्यांच्या प्रयोगातून असे आढळून आले की दिल्लीतील गलिच्छ वस्त्यांमधील विद्यार्थ्यांची प्रगती हार्वर्ड विद्यापीठाच्या आसपास राहणाऱ्या पीएच्. डी. प्राप्त पालकांच्या मुलांसारखीच होती. भारतातील विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिमत्तेची कमतरता नाही तर ती शालेय शिक्षण पद्धतीची आहे.

शिक्षणाचा अधिकार या कायद्यातील आवश्यक साधने (inputs) ही तरतूद काढून घेतली आणि त्याऐवजी परिणामावर आधारित नियमन (Effect based Regulation) लागू केले तर विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अधिक चांगली होऊ शकेल. सर्व विद्यार्थ्यांमध्ये कोणते तरी मूलभूत कौशल्य आढळते. याचा विचार करून ६ व्या वर्गापर्यंत फक्त मूलभूत कौशल्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. मध्यप्रदेशातील सरकारी शाळेतील मुलांना जवळच्या शाळेत पाठविण्यात आले. त्यामुळे काही मुलांनी शिक्षण सोडून दिले. परंतु शिक्षणाची गुणवत्ता वाढलेली दिसून आली. अलीकडे सरकारी

शाळांची संख्या कमी होत आहे. माध्यमिक शाळांच्या विकासाकरिता अधिक प्रमाणात वित्तीय तरतूद आवश्यक आहे. जगातील पन्नास टक्के मुले अक्षर ओळख न होताच शाळा सोडतात. त्यांच्या संशोधनाचा परिणाम म्हणजे भारतातील ५० लाख विद्यार्थ्यांना उपचारात्मक अध्यापनाचा (remedial teaching) फायदा होत आहे.'प्रथम' या संस्थेच्या 'बालसखी' कार्यक्रमाची मुंबई आणि वडोदरा येथे चाचणी घेण्यात आली.त्यांच्या मते विद्यार्थ्यांचे प्राप्तांक वाढविण्याच्या दृष्टीने उपचारात्मक अध्यापन पद्धती व्यय प्रभावी आढळून आली. अमर्त्य सेन यांनी म्हटले होते की दारिद्र्यामुळे बुद्धिमत्तेचे अपरिमित नुकसान होते. अभिजित बॅनर्जी यांच्या मते मुलांना शाळेत भोजन दिले पाहिजे. त्यामुळे पालकांना त्यांची मुले शाळेत पाठविण्याची चालना मिळेल. मुले शाळेत जाण्यासाठी तयार होत नाहीत कारण त्यांना असे वाटते की शिक्षण घेण्यात काहीच अर्थ नाही.

**२) आरोग्य सेवांची उपलब्धता :**

भारतात संसर्गजन्य रोगांचे संकट वाढत आहे. सरासरी आयुर्मानातील वाढ चांगली बाब असली तरी फारच कमी लोकांना चांगला आहार मिळतो. व्यायाम करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. मधुमेह, रक्तदाब, हृदयरोग आणि जीवनशैलीच्या आजारात वाढ होत आहे. या आजारांवरील उपचार खर्च बराच जास्त आहे. यामुळे केवळ उत्पादकता कमी होत नाही तर वेळ आणि पैशाची सुद्धा हानी होते. गरीबीमुळे मुलांना बालपणापासूनच कुपोषणाच्या समस्येला तोंड द्यावे लागते. या मुलांना तरुणपणात जरी चांगला आहार मिळाला तरी त्यांना जीवनशैलीच्या रोगांची भिती असते. बालपणीच्या कुपोषणाचा भविष्यकालीन जीवनावर परिणाम घडून येतो. याव्यतिरिक्त महत्त्वाची समस्या म्हणजे प्रति-जैविकांची (Antibiotic)प्रतिकार शक्ती वाढत आहे.

भारत सरकारच्या आयुष्मान योजनेचा भर तृतीय क्षेत्रातील आरोग्य सेवांवर केंद्रित आहे.ही बाब चांगली आहे कारण तृतीय क्षेत्रातील आरोग्यसेवा महाग असतात. किडनीचे प्रत्यारोपण केले तर त्याचा खर्च फार जास्त येतो. आयुष्मान योजना या दृष्टीने चांगली आहे. परंतु या योजनेमुळे आरोग्याच्या समस्या सुटत नाहीत. ही योजना मर्यादित प्रमाणात आरोग्यावरील खर्चाच्या समस्येची सोडवणूक करते.

आयुष्मान योजनेमुळे आरोग्यात पूर्णत: सुधारणा होत नाही. आरोग्यात सुधारणा तेव्हाच होऊ शकेल की जेव्हा प्राथमिक आरोग्य सेवा योग्यरित्या पुरविल्या जातील. या क्षेत्रात कार्य करण्याची आवश्यकता आहे. भारतातील आरोग्य सेवांची स्थिती फार वाईट आहे. ज्यांच्या जवळ आरोग्य सेवा प्रदान करण्याची योग्य पात्रता नाही असे काही डॉक्टर्स रुग्णांना सेवा प्रदान करतात.

एका गावात साधारणपणे पदवी नसलेले ३ डॉक्टर्स आरोग्य सेवा प्रदान करतात. एका गावात ५ पैकी १ एमबीबीएस डॉक्टर आहे. बहुतांश गावात एमबीबीएस डॉक्टर्स नाहीत. अनेक लोक बेकायदेशीरपणे आरोग्य सेवा प्रदान करतात. त्यांचा शोध घेणे कठीण आहे. कारण व्यवस्थेमध्ये त्यांचे कोणतेच अस्तित्व नाही. आपण योग्य डॉक्टर्स पर्यंत पोहोचू शकत नाही की ज्यांच्या सेवा मिळाल्या पाहिजेत.

आरोग्य सेवा अधिक कार्यक्षम बनविण्याच्या दृष्टीने जे लोक बेकायदेशीर सेवा प्रदान करतात त्यांचा शोध घेऊन त्यांना प्रशिक्षित केले पाहिजे. प्रशिक्षणानंतर ते अधिक चांगल्या सेवा प्रदान करू शकतील. प्रति-जैविक प्रतिकारशक्ती कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. औषधांच्या दुकानातून प्रति-जैविके खरेदी न करता डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांचा उपयोग केला पाहिजे. आपण आपल्या सवयीत बदल केला पाहिजे. नवीन प्रति-जैविकांचा अनावश्यक उपयोग टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

त्यांच्या संशोधनामुळे अनेक देशातसरकारद्वारे अनुदानित आरोग्य सेवा प्रदान केल्या जातात. त्यांनी असे म्हटले की प्रलोभनामुळे लसीकरण मोहिमेला राजस्थानमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. राजस्थानमध्ये लसीकरण मोहिमेची परिणामकारकता प्रति लाभार्थी एक पिशवी मसूर डाळ दिल्यामुळे सहा पट वाढली होती. यांच्यामते डॉक्टर रोग्यांचे अपुरे निदान करून जास्त प्रमाणात औषधांवर भर देतात. जास्त औषधांचा उपयोग धोकादायक मानला जातो. उदयपूर जिल्ह्यातील एका खेड्यामध्ये एका डॉक्टरने इंजेक्शनची सुई निर्जतुक न केल्यामुळे सर्व रोग्यांना संसर्गाचे दुष्परिणाम भोगावे लागले.

२००२-०३ मध्ये जागतिक बँकेने जागतिक अनुपस्थिती सर्वेक्षण केले होते.त्यानुसार बांगलादेश, इक्वेडर, इंडोनेशिया, पेरू आणि युगांडा मध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांचे अनुपस्थितीचे प्रमाण ३५ टक्के होते. भारतात ते ४३ टक्के होते. यामुळे लोकांना पुरेशा प्रमाणात आरोग्याच्या सोयी उपलब्ध होत नाहीत.

**३) रोजगारात कमी वाढ:**

भारतात रोजगार रहित विकास घडून येत आहे. अलीकडे रोजगाराच्या अशा संधी निर्माण केल्या जात नाहीत की ज्याची तरुणांना आवश्यकता आहे. उद्योगपती असे म्हणतात की आम्हाला जसे श्रमिक पाहिजे तसे मिळत नाहीत. त्यांच्या मते 'मानव साधनांची कमतरता असणारी आमची अर्थव्यवस्था आहे'. चांगले काम करणाऱ्यांना जास्त पगार द्यावा लागतो. भारतात पांढरपेशा नोकर वर्गाची स्थिती बरीच हालाखीची आहे.

आपण मेक इन इंडिया बद्दल बोलतो जागतिक श्रम पुरवठा श्रृंखलेचा घटक बनण्याची अपेक्षा करतो. श्रम कायदे श्रम हिताचे आहेत असे म्हणतो. पायाभूत संरचनेत सुधारणा, बँकिंग क्षेत्रात सुधारणा, व्यवसाय सुलभता इत्यादी चांगल्या बाबींचा विचार करतो. ज्या देशासाठी आवश्यक आहेत. या सर्व बाबी श्रमाची मागणी वाढविणाऱ्या आहेत. देशातील लोकांना असे का वाटते की आपल्या देशात श्रमाची कमतरता आहे?

भारतात एकूण श्रमशक्तीत महिलांचे प्रमाण कमी आहे. जगात ते सर्वात कमी असून त्यात सतत घट होत आहे. भारतातील २६ वर्षे वयोगटातील दहावीपर्यंत शिक्षण घेतलेले २० टक्के लोक काम करीत नाहीत. या वयोगटातील काही मुले शाळेत शिक्षण घेणारी असतात.३२ वर्षे पर्यंत वयोगटात बेरोजगारीचा दर २ टक्के होता.

श्रम पुरवठ्याची महत्त्वाची समस्या म्हणजे आपण प्रशिक्षण देताना श्रमिकांच्या पसंतीचा विचार करीत नाही. बऱ्याच लोकांना काम पसंत पडत नसल्यामुळे ते नोकऱ्या सोडून जातात. त्यामुळे त्यांच्या प्रशिक्षणावरील खर्च वाया जातो. त्यांनी एका

प्रशिक्षण कार्यक्रमाचे मूल्यांकन केले होते. त्यात ५५० प्रशिक्षणार्थी होते. त्यांनी सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले होते. प्रशिक्षणानंतर फक्त ३७ लोकांनी (७.५ टक्के) आपल्या कामाला सुरुवात केली होती.

आपल्या देशात श्रमाची कमतरता का आहे? तर प्रत्येकाला सरकारी नोकरी हवी आहे. कारण ती आदर्श नोकरी असून ती जास्त पगाराची आणि आरामाची असते. रेल्वेमधील निम्नश्रेणी च्या ९० हजार जागांसाठी २ कोटी ८० लाख अर्ज आले होते. यावरून बेरोजगारीची वास्तवता दिसून येते. चांगल्या पगाराच्या किंवा सामान्य नोकऱ्यात सुद्धा वाढ होत नाही. सरकारी नोकरी साठी वयाची महत्तम मर्यादा आहे. काही लोक वयाच्या २० वर्षापासून ३० वर्षापर्यंत स्पर्धा परीक्षा देत राहतात. स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना फक्त दोन संधी देण्यात येतील असे ठरविले तर परीक्षा देणाऱ्यांच्या संख्येवर मर्यादा पडेल. त्यामुळे सरकारचा परीक्षेवरील खर्च कमी होईल. कमी विद्यार्थी परीक्षेला बसले तर जास्त लोकांना नोकऱ्या मिळू शकतील. परंतु स्पर्धा परीक्षेच्या फक्त दोन संधी देणे हा बॅनर्जी यांचा विचार योग्य वाटत नाही.

**४) सामाजिक सुरक्षितता :**

सामाजिक सुरक्षितता हा सामाजिक धोरणाचा एक महत्त्वाचा पैलू मानला जातो. आपल्या देशात दोन सामाजिक सुरक्षितता कार्यक्रम महत्त्वपूर्ण मानले जातात.

अ) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि

ब) सार्वजनिक वितरण प्रणाली.

आपल्या देशात अति गरीबांची संख्या बरीच जास्त आहे. ते वरील योजनांबाबत फारच असमाधानी आहेत. आपल्या देशातील शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. देशात आर्थिक समस्या सोडविण्यासाठी अनेक कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. कर्जमाफी, राखीव जागांच्या प्रमाणात वाढ, सबसिडी मध्ये वाढ, इत्यादी. देशातील महत्त्वाच्या समस्या वीज, खते आणि जलसिंचनाबाबत आहेत. पंजाबमध्ये शेतीमधील धसकटे जाळणे ही महत्त्वाची समस्या आहे. त्यामुळे प्रदूषणात वाढ होते. परंतु त्यावर योग्य उपाययोजना करण्यात आली नाही. जागतिक किंमत पातळीत बदल, हवामानात बदल तसेच मानवनिर्मित संकटात वाढ होत आहे. त्यामुळे लोकांकडून काही तरी हिरावून घेतले जात आहे अशी जाणीव निर्माण होते.

मुद्रा स्फीतीमुळे पेट्रोलियमच्या किंमतीत वाढ होते. किंमतीची पातळी कमी करण्यासाठी आम्हाला उपाय योजावे लागतात. त्याचा कृषी क्षेत्रावर परिणाम घडून येतो. आम्ही निर्यातीवर बंधने लादतो आणि अशा वस्तूंची आयात करतो की ज्या आपल्याजवळ उपलब्ध असतात. त्याचा कृषी क्षेत्रावर विपरीत परिणाम होतो. यामुळे संघर्षात वाढ होते. ज्यांची सोडवणूक करणे कठीण जाते. भारतात पीक विमा योजना आहे. परंतु ती योग्यरित्या राबविली जात नाही. शेतकरी कोण आहेत ?त्यांनी किती उत्पादन घेतले? त्यासाठी त्यांना किती रकमेचा विमा आवश्यक आहे? इत्यादींचा विचार झाला पाहिजे. त्यांच्यामते नवीन सामाजिक संरचना तयार केली पाहिजे सरकारने लाभार्थ्यांच्या आवश्यकतेनुसार पूर्णक्षमतेने मदत करावी. वैयक्तिक बाबींपेक्षा भौगोलिक बाबींवर जास्त लक्ष द्यावे.ऊस उत्पादकांच्या समस्या असतील तर त्यांना योग्य

प्रमाणात नुकसान भरपाई दिली पाहिजे. त्यासाठी एखादी राष्ट्रीय समिती तयार केली पाहिजे.

**५) शहरीकरण :**

भारतात शहरीकरणात वाढ होत आहे. आज अशा शहरांची संख्या वाढत आहे की ज्या ठिकाणी पायाभूत सोईंची कमतरता आहे. त्यासाठी आमच्याजवळ पुरेसा पैसा नाही. प्रशासकीय व्यवस्था नाही. शहरांचा विस्तार झाल्यानंतर आपण रस्ते तयार करू शकत नाही. आपण ज्या पद्धतीने शहरीकरण करीत आहो त्यासंबंधी पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. वर्तमान दृष्टीकोण निराशाजनक आहे. आमची शहरे राहण्यालायक नाहीत. घन कचऱ्याची योग्य विल्हेवाट होत नाही. पाणीपुरवठा योग्यरित्या होत नाही. सांडपाण्याची अपुरी व्यवस्था आहे. ७४ वी घटनादुरुस्ती यावरील उपाय होय. आज काही शहरातील लोक सुखी होत आहेत. कार खरेदी केली जाते परंतु शहरात चांगले रस्ते तयार झालेले नाहीत. आज ज्या समस्या निर्माण होतात त्यासाठी मार्ग शोधले पाहिजेत.

Poor Economics या ग्रंथाचा भर गरीबांचे जीवन कसे आहे? त्यांच्या निवडी कशा आहेत? आणि जागतिक दारिद्र्याचे निर्मूलन कसे करता येईल यावर आहे.गरीबांसाठी अधिक आशादायक वातावरण कसे निर्माण करता येईल यासंबंधी मार्गदर्शन त्यांच्या पुस्तकाद्वारे प्राप्त होते. गरीबांची दारिद्र्याच्या चक्रातून मुक्तता करण्यासाठी गरीब देशात गुंतवणूक वाढविली पाहिजे.

बॅनर्जी यांनी सिद्धांत आणि व्यवहार याची सांगड घालून सिद्धांताचे परीक्षण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपली विचारसरणी परंपरागत अर्थशास्त्रापर्यत मर्यादित न ठेवता आपले विचार आरोग्या पासून अन्नसुरक्षितते पर्यंत व्यापक स्वरूपात मांडले. त्यांनी अर्थशास्त्राला शुद्ध विज्ञानाचे स्वरूप देऊन गणिताची जोड दिली. त्यांच्या सिद्धांतानुसार कमीत कमी दहा देशांना गरीबी कमी करता आली. त्यांच्या विचारानुसार धोरणे तयार केली तर देशातील लोकांच्या कल्याणात भर पडू शकेल. त्यांनी आपल्या सिद्धांताचे परीक्षण भारतात केले आहे. त्यांच्या सिद्धांताचा भर निष्पत्ती (Outcomes) वर आहे. त्यांनी म्हटले होते की शेतकऱ्यांना खताची सबसिडी न देता सबसिडीची रक्कम त्यांच्या बँकेतील खात्यात जमा केली पाहिजे. कॉंग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात गरीबांना वार्षिक ७२ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु अभिजीत बॅनर्जी यांनी ३६ हजार रुपये देण्याचे सुचविले होते.ते राहुल गांधी यांचे आर्थिक सल्लागार होते. भारतात शिक्षण आणि आरोग्य ही दोन्ही क्षेत्रे दुर्लक्षित आहेत. यामुळे गरीबांची गरीबीच्या दुष्टचक्रातून सुटका होत नाही. असे त्यांनी ग्रंथात म्हटले आहे. गरीबांचे प्रश्न समजून घेऊन त्यावर मार्ग शोधण्याची आवश्यकता आहे.

त्यांच्या मते सामान्य माणसाला किमान सुनिश्चित उत्पन्नाची प्राप्ती झाली पाहिजे. सरकारद्वारे गरिबांना जी मदत दिली जाते त्यामध्ये कोणतीही गळती किंवा भ्रष्टाचार व्हावयास नको. त्यांचे सिद्धांत फार गुंतागुंतीचे नाहीत तर ते व्यावहारिक आहेत. सरकारने पूर्वग्रह सोडून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. त्यांनी दैव नमुना पद्धतीच्या नियंत्रित प्रयत्नांद्वारे प्रायोगिक प्रणालीचा अवलंब केला होता. त्यांनी दोन गटातील लोकांची निवड केली होती. एका गटातील लोकांना सरकारी मदत मिळाली होती तर दुसऱ्या गटाला मदत मिळाली नव्हती.

त्यानंतर काही कालावधीनंतर दोन्ही गटातील लोकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन केले.

आर्थिक वृद्धीसाठी मनुष्यबळ आणि बौद्धिक बळाची आवश्यकता असते. जर स्त्रिया व पुरुषांना योग्य शिक्षण मिळाले, चांगले आरोग्य लाभले, सुरक्षिततेची जाणीव झाली तर ते त्यांच्या मुलांवर जास्त गुंतवणूक करू शकतील. त्यांना शहरात नवीन नोकऱ्यांची संधी मिळू शकेल. परंतु यासाठी त्यांना प्रतिक्षा करावी लागेल. जर त्यांच्या मार्गात निराशा आणि दु:ख आले तसेच राग आणि हिंसा वाढली तर जीवनात आशेचा किरण केंव्हा दिसेल ते सांगता येत नाही.

याकरिता योग्य सामाजिक धोरणाची आवश्यकता आहे. एकदम दारिद्र्याचे निर्मूलन होणार नाही. समारोपामध्ये त्यांनी ५ मार्गांची शिफारस केली होती

१) गरिबांजवळ योग्य माहितीचा अभाव असतो आणि ते ज्या गोष्टीवर विश्वास ठेवतात त्या खऱ्या असतीलच याची शाश्वती नसते.

२) जीवनाच्या अनेक बाबीसंबंधी गरीब लोक जबाबदारीचा स्वीकार करतात. त्यांना चांगल्या जीवनासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध नसतात, जसे नळाद्वारे पाणी, पक्के रस्ते, आरोग्य सोयी, इत्यादी.

३) त्यांच्यासाठी स्वतंत्र बाजारपेठा नसतात. त्यांना जास्त किंमतीला वस्तू खरेदी कराव्या लागतात. जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागते.

४) लोक गरीब असतात कारण अनेकांना गरिबीचा वारसा पूर्वजांकडून मिळालेला असतो.याचा अर्थ गरिबांची मुले गरिबीत जीवन जगतात. गरिबांसाठी असलेल्या योजनांचा त्यांना लाभ मिळतोच असे नाही.

५) लोक काही काम करण्यास समर्थ किंवा असमर्थ असतात. त्यावरच त्यांच्या जीवनाचे भवितव्य अवलंबून असते. जेव्हा अभ्यासक्रम अनुकूल असेल तेव्हाच मुले शाळेत शिक्षण घेऊ शकतील. अपेक्षांची पूर्तता करणे सोपे नसले तरी ते अशक्य नसते. त्यांच्यासाठी परिस्थिती अनुकूल असेल तर ते प्रगती करू शकतील आणि जर परिस्थिती प्रतिकूल असेल तर त्यांना प्रगतीची संधी मिळणार नाही. आपण पराभूत वृत्तीचे असू नये. मदत ही योग्य आहे की अयोग्य याचे उत्तर त्यांच्या पुस्तकात मिळू शकत नाही.

**संदर्भ :**


1. Banerjee Abhijit & Esther Duflo. (2013). Poor Economics: Rethinking Poverty & the Ways to end it. New York, Penguin Random House, India, Pvt. Ltd.
2. Lokmat (2019), 'Daily Lokmat news paper' Nagpur ed. October 15.
3. TOI (2019), 'The Times of India news paper' Nagpur ed. October 15.
4. Maharashtra Times (2019), 'Daily Maharashtra Times news paper' Nagpur ed. October 15.
5. Economic Times (2019), 'The Economic Times news paper' Nagpur ed. October 15.


◆◆◆

ISSN 2320-0197

# 'The Journey of Human Development from HDI to LGBTI -Inclusion Index'

**Ashlesha Kulkarni**
Assistant Professor,
Department of Economics,
SMRK-BK-AK Mahila Mahavidylay, Nashik.

**Introduction :**

Economic development deals with quality of population. Longevity, literacy rate and Technical as well as conventional educational rate are three criteria to measure quality of population. Gender Development is significant in Human Development. The pace of economic development enhances with Gender Development. Gender studies play a vital role in identifying the hurdles in the pathway of Economic Development. Special deliberate efforts are required to develop men, women and third gender as efficient human resources for the world development. This article is an effort to review the journey of human development from HDI to LGBTI-(Lesbian Gay Bisexual Transgender Intersex) Inclusion Index.

**Human Development Index :**

United Nations Development Programme introduced Human Development Index (HDI)in 1990. Mehboob-Ul-Haq with his team members Amartya Sen,Meghnad Desai,Sudhir Anand,Gustav Ranis,Frances Stewart and Paul Streeten gave a new direction to human development. All Human Development Reports indicate that many countries are top rankers in Human Development but still women in those countries live in poor condition. In the Human Development Report of 1995, male-female inequality was discussed. Then it was also observed that even in developed nations women do not have equal rights. Sudheer Anand, Meghnad Desai and Amartya Sen contributed a lot for developing the concept of Gender Development Index (GDI). Afterwards in 2010 Gender Inequality Index (GII) was introduced in which male-female inequality on the basis of reproductive health, empowerment and labor market participation was considered. In 2010,two more indices were introduced namely ,Multidimensional Poverty Index(MPI) and Inequality adjusted Human Development

Index(IHDI). Unfortunately, till the second decade of twenty first century, the third gender was completely neglected. Third gender people were never considered as human resources and therefore their participation in the process of economic development was never thought of. In 2015, UNDP started preliminary work to construct LGBTI-Inclusion Index and the first draft was finalized in 2017.

United Nations Development Programme clearly mentioned the objectives behind the construction of Human Development Index. "Along with the economic growth, people and their capabilities can be the only criteria for evaluating progress of the nation. HDI can also be considered as the criteria of selecting appropriate national policy . It can be helpful to identify the differences in human development between two countries who have attained similar level of national income. The HDI is the geometric mean of normalized indices for each of the three dimensions." HDI changed the focus of development from mere national income accounting to human centric policies. The gist of the concept was - Enhanced capabilities and capacities of the human resources can be resulted in to rapid human development.

**GAD and WID Approach :**

In the last decade of 20th century the wave of gender empowerment engrossed the globe. All over the world the concept of gender development added new dimensions to human development. Earlier though the concept was in existence, it took a long time for the deliberate efforts. The roots of this concept were hidden in The Gender and Development (GAD) approach which is a way of determining how best to structure development projects and programs based on analysis of gender relationships. In 1980s GAD approach was put forward as an alternative to the Women in Development (WID) approach.

Many times the term gender is misunderstood as difference between sexes, but actually sex and gender are two independent concepts. Sex refers to the biological characteristics that categorize someone as either female or male; whereas gender refers to the socially determined ideas and practices of what it is to be female or male. Therefore, Gender Development is wider concept which includes social status and equal opportunities of development.
Prior to seventh decade of the twentieth century, it was believed that development has the similar impact on males and females. The book published by Ester Boserup 'Women's Role in Economic Development',

was an eye opener. The book highlighted that development affected men and women differently. It started the debate on Women and development. Boserup firmly stated, "Women were marginalized in the modernization process and practices of growth, development, and development policy threatened to actually make women worse off." Boserup's work resulted into the commencement of making the new term Women in Development (WID) . 'Women in Development' term was coined by the Women's Committee of the Washington DC Chapter of the Society for International Development; a network of female development professionals Society. The first aim of WID was inclusion of women in various existing development initiatives. Since it was argued that women were marginalized and excluded from the benefits of development, the WID approach underlined the main problem of women's unequal representation and participation. WID approach considered patriarchy as the root cause, which did not consider women's productive and reproductive work. It was observed that women were overburdened with domestic responsibilities and therefore they were not seen in development activities.

Gradually, the gender issues were discussed on the international level and were brought to the notice of society. It was considered as the global strategy and was adopted at the United Nations Fourth World Conference on Women, held in Beijing (China) in 1995. The conclusion of this conference was, mentioned in the appropriate words -'Human Development is endangered unless it is engendered.'

The definition of gender mainstreaming was made by the United Nations Economic and Social Council (ECOSOC) in July 1997. "Mainstreaming a gender perspective is the process of assessing the implications for women and men of any planned action, including legislation, policies or programmes, in any area and at all levels. It is a strategy for making the concerns and experiences of women as well as of men an integral part of the design, implementation, monitoring and evaluation of policies and programmes in all political, economic and societal spheres, so that women and men benefit equally, and inequality is not perpetuated. The prime aim of mainstreaming is to achieve gender equality."

Though, Gender Equality was set as a goal, even today it is a mere dream because, 50% of the world's active population is deprived of equal opportunities of development. Women who are giving their contribution for family,

society and the economy at large are always underestimated. Unfortunately everywhere in the world irrespective of economic system, political framework and socio-cultural background, the women are treated with prejudice. In 21st century, the life of woman is not yet changed. Simon de Beauvoir narrated in detail the life of women at different stages in 'The Second Sex' (1949), but it can be related to current age. Nothing has been changed. Women are living miserable life and especially, when it comes to housewives they are spending their time, energy and everything for their family throughout the life. The contribution of housewives is always neglected and not calculated in national income. As, domestic work is not taken in to consideration housewives are always taken for granted. They are spending entire life for their family; they know it well that it is a thankless job. While satisfying unending demands of family members she becomes mere service provider. No one cares about her feelings, and no one is ready to accept her as human resource. When a highly qualified lady becomes mere housewife giving priority to her family responsibility she is not only becoming voluntarily unemployed but at same time she is withdrawing her from active participation in the process of production. When such types of lakhs of working women are ending their professional participation, the economy cannot utilize its human resources at maximum level. Housewives hardly get status. Freedom depends on economic conditions even more than political conditions. If a woman is not economically free and self earning, she will have to depend on her husband or someone else and dependents are never free.

For women empowerment some other things should be considered though women became economically self reliant, that does not mean that they are empowered. Irrespective of it, their social status, dignity and their active participation in socio-economic-cultural life of the nation it becomes necessary to test the remarkable contribution of women in the social development.

**Gender Development Index and Gender Empowerment Measures :**

In welfare Economics, the concept of GDI (Gender Development Index) made revolution; still the concept of "male female equality" should be put forward in a meaningful way because in this 21st century social status of women is not satisfactory. According to world development report 2006 published by UNDP 70% women in the world were living below poverty line including developed countries.

Human development report 1995 threw a light on issues related to gender development. In its overview it was clearly mentioned as Equal enjoyment of human rights by women & men is a universally accepted principle, reaffirmed by the Vienna declaration, adopted by 171 states at the world conference on Human Rights in June 1993. It has many dimensions:

i. Equal access to basic social services, including education and health.
ii. Equal opportunities for participation in political and economic decision making.
iii. Equal reward for equal work.
iv. Equal protection under the law.
v. Elimination of discrimination by gender and violence against women.
vi. Equal rights of citizens in all areas of life, both public - such as the workplace- and private - such as the home.

Abolition of slavery, the elimination of colonialism and the establishment of equal rights for racial and ethnic minorities are some commendable achievements. The equal rights given to women to fight with gender discrimination have equal significance.

Since the obstacles in the way of working women's progress and improved status , they are contributing commendably to the progress of economic development of the country are found to be mainly at two levels-

* Attitudinal level
* Situational or environmental level

There will have to be two fold approaches to the problem of improving their socio- economic status.

At the attitudinal side, the attitudes of men, women and society towards women's particularly towards working women's position in society at home at work have to be changed through the socialization process, educational system and effective mass media . Since most of the obstacles to women's effective work participation seem to be of a 'cultural nature' or due to the outdated social attitudes, conceptions and expectations that continue even with a changing civilization, the most urgent need is to promote fresh mental approach by means of making community as a whole, more widely informed about the demographic, technical and cultural events as well as about the changing life patterns and attitudes particularly of women. They should be made to understand that equality of privileges as concerns the development of any and every capacity.

At the situational or environmental level, changes have to be brought about

both in the situation at home and at work, so as to make both the environments congenial for the efficient and successful working of an employed woman.

Women are regarded as the better half of the society as they constitute half of the population. The modern women are exposed to education and training. This helped them to do all work which was once regarded as the prerogative of men. Over the years the educated women have become ambitious, acquired experience and basic skills, competency and self assurance.

Discrimination against women in education is also a reflection of the contending views on gender. Women's representation in education has largely been influenced by patriarchy, a dominant ideology to control and subjugate women in family and society ever since private property emerged. It operates by creating stereotypes about women's roles in the family and in the society and then either denies them access to education or places severe restrictions on them. Women's position in family and society further gets complicated due to the role that religion, caste and class play in furthering these stereotypes. Progressive and democratic movements on women's rights in the last few decades have successfully challenged these stereotypes and have compelled the state to recognize at least that both men and women are equal.

HDR 1995 which has been prepared against the backdrop of the Beijing conference on Women scheduled for September, focused this year on the status of women and the gender bias, in existing models of economic ,political and social development. Modifying the human development index, which was annually prepared for 174 countries, the HDR 95' offered the 'gender -related development index' (GDI) for a group of 130 countries for which comparable data was available. Another innovation was the estimation of the "gender -empowerment measure" GEM or the extent to which women participate in a country's economic and political life. Significantly 1995 human development report did not find any correlation between gender bias and a country's economic development.

It was observed from Human Development Report 1995 that, countries applying socialist models used social and political mobilization to achieve rapid and equal progress in education and health for women and men and to engineer social transformations to expand opportunities for women.

**Gender Inequality Index (GII) :**

The GII calculates gender disparity.

In the 2010 Human Development Report 20th anniversary edition by the United Nations Development Programme (UNDP) GII was introduced. According to the UNDP, GII captures the loss of achievement, within a country, due to gender inequality. It takes in to consideration reproductive health, empowerment, and labor market participation.

Dimensions-Reproductive health, empowerment, and labor market participation are three dimensions of Gender Inequality Index. UNDP observed that all these three measures have nothing to do with development, so, less developed countries can also do well, if there is less gender inequality. GII is very important as it never compensates more achievement in one dimension for less achievement in other dimension.GII makes the index association sensitive.

**LGBTI -Inclusion Index :**

Third Gender was always neglected in the process of economic development. As it was deprived of social recognition and general acceptance, it was never discussed with reference to human development in economic perspective. The change in social outlook was reflected in general acceptance of the third gender that is LGBTI all over the world. In 2015, United Nations Development Programme started preliminary work to construct LGBTI.UNDP and World Bank put forward 51 indicators to calculate LGBTI inclusion in development. The indicators are based on five dimensions - health, education, economic empowerment, civil and political participation, security and violence - as part of the development of an LGBTI Inclusion Index. Every human being has an equal right of development. Everyone has the right to get equal opportunities. Third Gender Community or LGBTQ should not be an exception for development. They are also the citizens of this world. Just because of their different biological structure or different sexual orientation they should not be deprived of their basic rights and opportunities to utilize their capabilities. For following the motto of all inclusive development and leaving no one behind it was decided to measure LGBTI Index. It will certainly be beneficial for the rapid development of third gender. As it covers all the aspects necessary to live a good quality life, it will be proved as a landmark.

* LGBTI Inclusion Index is considered as a remarkable step taken by UNDP and World Bank for all inclusive growth. Till date work is in progress. The process of launching LGBTI Inclusion Index began in 2015 and the first draft was finalized in September

2017.51 Indicators were selected considering feasibility of measurement, communicability and usefulness for their relevance. SDG tier system was utilized for it. Considering the feedback from LGBTI civil organizations webinars were organized in October 2017 by UNDP and World Bank. All the civil society conveners had discussed with the UN Economic and Social Council (ECOSOC): the Swedish Federation for Lesbian, Gay, Bisexual, Transgender, and Queer Rights (RFSL), Out Right Action International, and the International Lesbian, Gay, Bisexual, Trans and Intersex Association (ILGA). These organizations included various organizations to participate in a series of webinars and in discussions regarding the draft indicators. The final indicators were made available in three languages namely, English, French and Spanish languages. With the multi-sectoral expert consultations and in-person consultations fourth draft was prepared. Following are the selected dimensions of LGBTI Inclusion Index with their scope -

* **Education**- Safe learning Environments, access to education and knowledge
* **Civil and Political Participation-** Recognition, freedom of expression and association, political representation and public opinion
* **Economic Well being** - Access to jobs, adequate income, social security, business climate
* **Health** - SOGIESC inclusive health legislation and policies, Access to SOGIESC sensitive healthcare, Sexual and reproductive health and rights, health status
* **Personal Safety and Violence** - Bodily, physical and psychological integrity, hate crimes/ incitement to violence, SOGIESC related violence, SOGIESC asylum, access to justice for LGBTI People

Optimum utilization of the available resources is always advisable for better results. Therefore, inclusion of third gender community in the mainstream will directly boost the world economy. Presently, third gender community is fighting at each level of life. They are different that does not mean they should be excluded from the process of development.

Setting LGBTI Inclusion Index is a very challenging task. Even today, many nations consider LGBTI as a taboo and in many countries it is a punishable offence. It

is observed that few countries count Gays and Lesbians in their population but they exclude bisexual and transgender as they don't have social recognition. Therefore, the basic problem is an absence of a scientifically sound body of data. So, the researchers have developed few innovative survey methods which are tested. It is needed for a global LGBTI Inclusion Index.

Once, LGBTI Inclusion Index will be constructed, the world will come to know about the lacunas in socio-economic structure and the improvements can be made in the existing system. This index is going to be very helpful for the policy makers as it will provide them real data of unutilized labor force.

LGBTI Inclusion Index will be an important tool to measure the gender equality in the real sense. All the selected five dimensions are very important for the holistic development of an individual. Considering these norms, if all the required facilities are provided; third gender community will become a strong human resource which will make this world a better place. Therefore, LGBTI- Inclusion Index should be welcomed with open arms.

**Conclusion :**

We are moving towards the new world which is ready to change its outlook for all the members of world society without hesitation. All are equal and the available resources are equally owned by all the citizens of this world. Therefore, everyone has equal right to get equal opportunities of development. From an economic perspective, the journey of human development from Human Development Index to LGBTI-Inclusion Index indicates that we are on the right path. It is a sign of positivity and optimism that humanity is becoming the strong bond to connect the world. It reminds me the famous Shantimantra from Bruhadaranyak Upanishad which prays for the betterment of the world-

सर्वे भवन्तु सुखिन:
सर्वे सन्तु निरामय:
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चिदु:ख खभाग्भवेत् ।

**References :**

1. Meboob-Ul-Haq,Reflections on Human Development, Oxford University Press,Newyork,1995,p.61
2. HDR1990,UNDP Retrieved from http://hdr.undp.org/en/content/human-development-index-hdi
3. www.wikipedia.org.
4. www.bridge.ids.ac.uk
5. ibid,wikipedia
6. Amartya Sen's Work and Ideas: Gender Perspective edited by Agrawal Bina and others, Routledge an imprint

of Taylor and Francis Group, London, 2005.

7. www.ilo.org
8. Simon de Beauvoir (1989), The Second Sex, Vintage Books Edition
9. Hasbanis Sushama, Ph.D.Thesis (2012), University of Pune, Retrieved from IRDS,Nashik
10. Human Development Report 2006 Retrieved from http://hdr.undp.org/sites/default/files/reports/267/hdr06-complete.pdf
11. Human Development Report 1995 Retrieved from http://hdr.undp.org/sites/default/files/reports/267/hdr06-complete.pdf
12. Kumar, Abhay (2009) Gender Discrimination and Women Scientists in India, Economic & political Weekly August 8 2009, VOL XLIV No. 32, p.27
13. K.Sujatha,Ph.D.Thesis(2004), Mahatma Gandhi University,Kottayam, Kerala, p.1
    Retrieved from http://www.mgutheses.in/page/? q=T % 201340 &search=&page=1&rad=#1
14. Swaminathan Padmini, Exclusions From and Inclusions In 'Development': Implications for 'Engendering Development', October 25 2008, Economic & political Weekly,Vol 43 No. 43, p.48
15. Baru Sanjay, Mahbub ul Haq and Human Development: A Tribute Economic and Political Weekly, Vol. 33, No. 35 (Aug. 29 - Sep. 4, 1998), pp. 2277
16. Ibid, HDR1995
17. https://sdg.iisd.org
18. https://www.ceeol.com
19. https://www.webforum.org
20. https://ssir.org
21. Modi S, Bruhadaranyak Upnishad, Shilalekh, First Edition, 2014.


◆◆◆

# जैविक शेतीचे स्वरूप

**गजानन गं. भारती**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती.

**प्रस्तावना :**

जागतिक स्तरावर बहुतांश देशाचा आर्थिक विकास हा शेतीवर अवलंबुन आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे त्यानुसार शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. स्वातंत्र प्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून शेती विकासाचे प्रयत्न झाले व १९६० च्या दशकात हरितक्रांतीच्या रूपाने भारतीय शेतीचा विकास झपाट्याने सुरू झाला. पुढील काळात देश अन्न धान्याच्या बाबतीत स्वयंपुर्ण झाला. मुख्यत: गहु आणि धानाच्या उत्पादनात वेगाने वाढ होत गेली, परंतु ही वाढ काही ठराविक पिकांच्या बाबत खरी ठरली इतर पिकांबाबत अपेक्षीत वाढ करता आली नाही. हरितक्रांतीने जसे शेती उत्पादनात काही फायदे झाले तसेच काही तोटेही झाले जे शेती क्षेत्रासह समाज व्यवस्थेवरही प्रतिबिंबित होत गेले. आधुनिक शेती पध्दतीचे गंभीर परिणाम प्राधान्याने शेतकऱ्यांना भोगावे लागले. त्याची काही कारणे पुढील प्रमाणे आहेत. वाढत्या लोकसंख्येबरोबर, अल्पभुधारक, सिमांत व भूमिहीन शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ झाली. शेतीचे तुकडीकरण, अपखंडन, सिंचनाचा अभाव, पर्जन्यातील असमतोल, शेती आदानाच्या किंमतीत झालेली प्रचंड वाढ, त्यामुळे उत्पादन कमी व खर्च अधिक, अशी आधुनिक शेती करणे शेतकऱ्यांच्या अवाक्या बाहेर गेली आणि शेतकरी कर्जबाजारी झाला. अंतिमत: त्याचा परिणाम शेतकरी आत्महत्येकडे वळला, त्यातच या पध्दतीने शेतीच्या उपजत गुणाचा नाश झाला. सामाजिक अनारोग्यात वाढ होत गेली. या सर्वावर मात करून शेतीच्या शाश्वत व गुणात्मक वाढीकरीता, जैविकतंत्रज्ञानावर आधारीत शेती पध्दतीची कास भारतात वाढीस लागली.

**अ) जैविक शेती पध्दती म्हणजे काय ?**

जैवतंत्रज्ञानावर आधारीत शेती पध्दती म्हणजेच शाश्वत शेती पध्दती होय. यामध्ये निसर्गाधारीत व जैविक विविध तत्वाचा उपयोग करतांनाच खर्चिक व मानवासहीत निसर्गाला घातक ठरणाऱ्या रासायनिक निविष्टांचा उपयोग थांबवून ज्याव्दारे नैसर्गिक साधन सामग्रीचे जतन, संवर्धन, समतोल पर्यावरण व आरोग्यदायी मानवी जीवनाकरीता दीर्घकालीन शेती नियोजनाचा समावेश करणे म्हणजे जैविक शेती पध्दती होय.

जैवतंत्रज्ञान हा शब्द प्रयोग सर्वप्रथम: कार्ल इरकाम या हंगेरियन इंजिनिअरने इ.स. १९१७ मध्ये वापरात आणला. अलिकडे कृषी, वैदयकीय, उद्योग व पर्यावरणीय क्षेत्रात जैव तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे. या विविध क्षेत्रामध्ये अनेकविध घटकांचा व

प्रक्रियांचा मानवाच्या प्रगतीसाठी उपयोग करून घेण्याचे तंत्रज्ञान म्हणजे जैवतंत्रज्ञान होय. या तंत्राचे वैशिष्टये म्हणजे अधिक उत्पादन देणारे, बदलत्या हवामानात तग धरणारे, पर्याप्त रोग प्रतिकारक क्षमता असणारे, दुष्काळातही सहनशिल असणारे असे हे जैवतंत्रज्ञान होय.

**ब) भारतात जैवतंत्रज्ञानाची वाटचाल :**

शेतीच्या गुणात्मकतेसह कार्यक्षम उत्पादन वाढीकरीता जैवतंत्रज्ञानाचा विकास ही एक निकडीची बाब आहे. भारताच्या वाढत्या लोकसंख्येला पोषक आणि शाश्वत अन्नधान्याचा पुरवठा व्हावा या उदयेशाने या तंत्राकडे लक्ष दिले जात आहे. या अनुषंगाने भारतात १९८२ मध्ये राष्ट्रीय जैवतंत्रज्ञान विभागाची स्थापना केली गेली आणि दीर्घकालीन नियोजनाबरोबरच १९८६ ला या विभागाच्या कार्यास सुरूवात झाली. त्या अतंर्गत अन्न, वस्त्र, निवारा यांना प्राध्यान्य देण्यात आले. २००१ मध्ये नवा अध्याय सुरू करण्याचा प्रयत्न झाला ज्यामध्ये संपत्तीच्या वाढी बरोबर सामाजिक न्यायामध्ये गरीबांच्या कल्याणाला विशेष महत्व देण्यात आले. भारतात २००२ पासून बी.टी. कापूस वाणाचा प्रचार व प्रसार झाला. बऱ्याच तज्ञांनी इतर तेलबिया, कडधान्य, डाळी, सोयाबीन या पिकाच्या बाबतीतही नविन जैवतंत्रज्ञानाने विकसीत वाण तयार केले. अशा पध्दतीने जागतिक स्तरावर या तंत्रज्ञानाचा वापर झपाटयाने वाढला असून अमेरिकेत तर ७० प्रतिशत अन्नधान्याकरीता जैविक तंत्रज्ञानाचा वापर होतो. भारतात अलिकडे या तंत्रज्ञानाचा वापर टोमॅटो, बटाटे, पपई, भात, द्राक्षे या सारख्या फळाबरोबरच फळभाज्यासाठीही होत आहे. अशा पध्दतीने सुदृढ शेतीसह सुदृढ सामाजिक स्वास्थ्यासाठी उपयुक्त पध्दतीचा वापर भारतासाठी अधिक लाभकारक होईल यात शंका नाही. असे हे वरदान देशासाठी अधिक महत्वाचे आहे. या तंत्रज्ञानाचे काही तोटे असले तरी त्याचा किफायतशिर उपयोग करून शेतीला व आत्महत्येने ग्रस्त शेतकऱ्याला पर्यायाने देशाला लाभ होईलच हे महत्वाचे.

**क) जैविक शेतीची आवश्यकता :**

भारताच्या वाढत्या लोकसंख्येची स्वास्थ्यवर्धक अन्नधान्याची मागणी पुर्ण करणे, देशाच्या मानव समाजासाठी शाश्वत, गुणवत्ता प्रधान अशा पोषक अन्नधान्याची पुरेशा प्रमाणात निर्मिती करणे; जागतिक स्तरावर अन्नधान्याच्या निर्यातीचा वाटा वाढविणे; शेतीचा शाश्वत विकास करणे; दुष्काळावर मात करणाऱ्या वाणाची निर्मिती करणे; शेतीचे उत्पन्न व उत्पादकता वाढविणे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर घालून त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती उंचावणे तसेच त्यांना कर्जबाजारी जोखडातून मुक्त करून ते करीत असलेल्या आत्महत्येला प्रतिबंध घालणे, आधुनिक शेतीच्या वाढत्या खर्चाला आळा घालणे उदा. रासायनिक खते, बी-बियाणे, औषधी आदाने, यांचा अतिरिक्त खर्च टाळून शेतीच्या उपजत गुणांना टिकविणे आणि रासायनिक खते व औषधाचे शेती बरोबर मानवी आरोग्यावर होणारे दुष्परीणाम टाळणे; तसेच मृदा प्रदूषण, पाणी प्रदूषण, वायू प्रदुषण याला आळा घालून पर्यावरण समतोल राखणे या करीता जैविक शेतीची कास धरणे अत्यंत आवश्यक आहे.

अलीकडे पाण्याची असलेली तूट, रोगांचा वाढता शिरकाव, विविध तणांशी स्पर्धाकरून तग धरू शकतील अशा बियाणांची निर्मिती, देशातील मागणी बरोबरच विविध गरजांची पूर्तता करणाऱ्या

पिकांची निर्मिती, यासाठी अत्यंत कमी जागेत किंवा हरीतगृहासारख्या ठिकाणी फळे, फुले व भाजीपाल्याचे उत्पादन जैविक तंत्रामुळे शक्य होणार आहे. मात्र हे तंत्रज्ञान सिमांत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास बराच कालावधी लागणार आहे. या तंत्रामुळे देशात पारंपरिक शेती पध्दतीला छेद देउन आधुनिक अशा पीक पध्दतीला चालना मिळणार आहे. जसे की, टॉमॅटोच्या रोपटयाला जमिनीवर टमाटे तर जमिनीखाली आलूचे उत्पादन घेणे शक्य होणार आहे असे प्रयोग चालू आहेत. त्यामुळे साहजिकच या तंत्राचा दुहेरी लाभ शेती उत्पादनात होईल व हे तंत्र शेतीला प्रत्यक्ष वरदान ठरेल. एवढेच काय या तंत्रामुळे रोगास बळी पडणाऱ्या जैव विषाणुला बियाणाच्या गुणसुत्रातून वेगळे काढुन टाकणे शक्य होणार आहे. ज्यामुळे किटकनाशकाचा वापर बंद करणे शक्य होणार आहे व उत्पादन खर्चात कपात होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडणार आहे. अशा पध्दतीने हे तंत्र शेती क्षेत्रात जैविक क्रांती व शेतकऱ्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यास उपयुक्त ठरेल.

**ड) भारतीय शेती समोरील आव्हाने :**

भारतात आजही ५६ प्रतिशत लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. अर्थात सर्वात जास्त रोजगार याच क्षेत्रात आहे. देशात औद्योगिक विकास झपाटयाने होत असूनही कृषीवरील लोकसंख्येचा भार कमी होतांना दिसत नाही. कारण औदयोगिक धोरण व कृषी धोरण यामध्ये बरीच विषमता आहे. देशात औद्योगिकीकरण, शहरीकरण व पायाभूत सोयीमुळे लागवड योग्य जमिनीचे क्षेत्रफळ कमी कमी होत आहे. तर झपाटयाने वाढत जाणाऱ्या लोकसंख्येमुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करणे शक्य नाही. त्यातच शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा दरवर्षी कमी होत आहे. मात्र उत्पन्नातील वाटेकरीचा हिस्सा कमी होतांना दिसत नाही. अशातच प्रादेशिक कृषी विकास रचनेत बरीच तफावत आढळून येते, एकूण भौगोलिक उपलब्ध क्षेत्राचा ४४ प्रतिशत भाग पिकाच्या लागवडीस उपयुक्त आहे. यापैकी ६७ प्रतिशत क्षेत्र कोरडवाहू असून ते सर्वार्थाने नैसर्गिक पर्जन्यावर अवलंबुन आहे. अशा शेतीचे अनिश्चित स्वरूप, जमिनीच्या सुपिकतेतील व हवामानातील विविधता, प्रदेशवार पिकांची विविधता, मशागती बरोबरच तंत्राची भिन्नता त्यामुळे उत्पादनातील भिन्नता व अंतिमत: शेती विकास व उत्पादकतेत तफावत आढळते.

भारतीय सिंचन क्षेत्र केवळ ३३ प्रतिशत असूनही भूपृष्ठावरील व भुगर्भजलसाठा दिवसें दिवस वेगाने घटत आहे तर दुसऱ्या बाजुने जमिनीची सुपीकता विभिन्न ठिकाणी वैविध्यपुर्ण आहे. त्यामुळे अपेक्षित उत्पादन घेणे शक्य होत नाही. लोकसंख्येतील वाढीमुळे जमीन धारणाक्षेत्र कमी कमी होत आहे. त्याचा परिणाम, अल्प व सिमांत शेतकऱ्यांची संख्या वेगाने वाढत आहे. जीडीपीतील शेती उत्पादन व उत्पन्नाचा हिस्सा झपाटयाने कमी होत आहे.

भारतात सुधारणांच्या काळात शेतीतील गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाले आहे जे जीडीपीच्या केवळ २ प्रतिशत आहे. त्यातही खाजगी गुंतवणुकीचे प्रमाण कमी असल्याने शेती विकासाला आवश्यक पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध होत नाहीत व विकासावर त्याचा दुष्परीणाम होतो. शेतीची उत्पादकता कमी आणि उत्पादन खर्च अधिक तर

शेतमालाला मिळणारी किंमत कमी त्याचा एकंदरीत परिणाम शेतकऱ्यांचे बजेट कोलमडले आहे. याशिवाय अलीकडे दुष्काळाचा सातत्याने होणारा पाठलाग पाहाता भारतीय शेतकऱ्यांच्या अस्तित्वालाच आव्हान उभे झाले आहे. शेवटी हताश होऊन शेतकऱ्यांचे आत्महत्याचे सत्र अविरतपणे सुरू आहे. याचाच एक अविभाज्य भाग म्हणजे देशात अन्नसुरक्षितता आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर रूप धारण करतो आहे. भारतात एकुणच शेती क्षेत्राचा विचार करता दुष्काळी स्वरूप, अनुकूल हवामानाचा अभाव, पिकांवरील रोगांचा प्रादुर्भाव, पर्याप्त उत्पादन व खर्चावर आधारीत किंमतीचा अभाव आणि वाढता खर्च या सर्वांवर मात करता येईल अशा शासनाच्या धोरणाचा अभाव, तसेच सर्व स्तरातून शेती व शेतकऱ्याप्रती असलेली अनास्था शेती विकासाला किती घातक आहे हे स्पष्ट होते. म्हणुनच या सर्वांवर पर्याय शोधत असतांना जैविक शेतीला अधिकाधिक चालना देणे निकडीचे आहे.

**इ) महाराष्ट्रातील जैवतंत्राचा विकास :**

महाराष्ट्र शासनाने जानेवारी २००२ मध्ये जैवतंत्रज्ञान धोरण जाहीर केले व तत्कालीन मा. मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली जैवतंत्रज्ञान मंडळाची स्थापना केली गेली. हे मंडळ मुख्यमंत्र्यांना सल्ला देण्याचे काम करते. आपल्या धोरणानुसार या तंत्रावर आधारीत उदयोगांना शेतीला लागु असलेल्या दराने विजपुरवठा करणे तसेच संशोधन व विकासासाठी केन्द्र स्थापन करण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली जाते. या धोरणाअंतर्गत जैवतंत्रज्ञानाच्या विकासाकरीता व उपयुक्तते करीता संशोधनावर सोयी सवलती उपलब्ध करून देते. जागतिक तज्ञाच्या सल्ल्याने आपल्या राज्यात हा व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने योजना आखल्या आहेत. यासाठी महाराष्ट्रात जैवतंत्रज्ञान क्षेत्रातले तज्ञ, उदयोजक, हितचिंतक एकत्र यावेत म्हणुन 'महाबायोयात्रा' नावाची एक अभिनव यात्रा सुरू केली आहे. अर्थात जैवतंत्रज्ञानाचा विकास, प्रचार, प्रसार करणे हा उद्देश आहे. आता तर बायोटेक पार्कची संकल्पना साकार होण्याच्या मार्गावर आहे. या व्यतिरिक्त शासनाने पुणे येथे औषधी जैवतंत्रज्ञान केन्द्र, तर जालना येथे शेंद्रे व अकोला येथे कृषी जैवतंत्रज्ञान केन्द्र उभारली आहेत. या साठी जैवतंत्रज्ञान केन्द्राना उदयोग विभागाचा ड व ड + गटात अंतर्भूत होणाऱ्या उदयोगांना मिळणाऱ्या सर्व लाभासाठी पात्र ठरविले आहे.

**फ) जैवतंत्रज्ञानामुळे शेती क्षेत्रात होणारे लाभ :**

भविष्यात देशात जैवतंत्रज्ञानाचा उपयोग अनिवार्य आहे. त्याच्या विविध पैलुचा विचार केल्यास विविधांगी उत्पादनाला चालना मिळेल अशी शक्यता प्रयोगावरून सिध्द होत आहे. जसे कापूस उत्पादनात बहुरंगी उत्पादनाची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच नाशवंत अशा फळे, भाजीपाला, पिकांना जैवतंत्रामुळे अधिक टिकाऊपणा व जास्त किंमतीचा लाभ मिळेल, असे संशोधन सुरू आहे. पिकांच्या गुणसूत्रावर प्रयोग करून अधिक उपयुक्त पिक रचना बनविने शक्य झाले आहे. तसेच दुष्काळात टिकाव धरणाऱ्या प्रजातीला चालना दिल्या जात आहे व भरघोस उत्पादन देणारी पिके घेण्यासाठी संशोधन सुरू आहे.

पर्यावरणासह मानवी आरोग्यावर दुष्परिणाम करणारी किटकनाशके टाळून त्याऐवजी पिकांच्या गुणसुत्रात योग्य तो बदल करून किटक व

सुक्ष्मजीवांना प्रतिबंध करण्याचे तंत्र विकसीत झाले आहे. सर्वोत्तम बियाणे निर्मितीस चालना मिळत आहे. या तंत्राचा वापर जे जे देश करतील ते अधिक विकसीत असतील ज्यामुळे रासायनिक शेतीला पर्याय दिल्या जाणार हे निश्चित.

जैवतंत्रज्ञानाचा विशेष लाभ म्हणजे, फळे, भाजीपाला, शेंगा, मुळे, कंद धान्य हे अधिक पोषक, रूचकर, टिकाऊ, कमी वेळात येणारे व दर एकरी अधिक उत्पादन देणारे असेल. असे प्रयत्न प्रगतीपथावर आहेत. एकुणच शेतकऱ्यांसह मानव जातीला सुखा समाधानाचे जीवनमान यावे व निसर्गाला समृध्दीकडे नेता यावे या दृष्टीने उपयुक्त हे तंत्रज्ञान आहे म्हणुनच त्याचा स्विकार हिरीरीने केला पाहिजे. कारण वाढती लोकसंख्या, नष्ट होण्याच्या मार्गावर असलेली जंगले, निसर्गाचा वाढता असमतोल, जमिनीचा नष्ट होत असलेला पोत, वाढते जल प्रदुषण, वायुप्रदुषण या सर्वांचा मानवी आरोग्यावरील परिणाम, त्यासाठी होणारा खर्च, तरीही मानवाच्या सुखासाठी असलेला अतिहव्यास, त्यासाठी धरलेली विज्ञानाची कास त्यासाठी मानवाची होणारी धडपड यातून समाजाची मुक्तता करता यावी, अशी नवक्रांतीची सुरूवात करण्याकरीता जैवतंत्रज्ञान उपयुक्त आहे. विशेषता शेतकऱ्यांना ही क्रांती खरोखरच वरदान ठरेल ज्यामुळे शेतकऱ्यांची दारिद्रयावस्था आणि आत्महत्याचे सत्र थांबण्यास उपयुक्त ठरेल असे वाटते.

**ग) जैवतंत्रज्ञान वापराचे धोके व आव्हाने :**

१. जैवतंत्रज्ञानाचा पिकांसाठी उपयोग करतांना चुकून घातक घटकांचा शिरकाव होऊ शकतो अशा पिकांचे जनुकीय वाण मानवी आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतात. अशी जनुके अन्ना बरोबर शरीरात गेल्यास ती बाहेर पडत नाहीत.

२. या तंत्रज्ञानावर आधारीत पिक संररनेत बदल करणे सहजा सहजी शक्य नसते.

३. संकरित बियाण्याकरीता असे तंत्रज्ञान वापरल्यास तो बियाणे केवळ एका हंगामापूरते वापरता येतात. दुसऱ्यांदा वापरता येत नाही.

४. संकरित बियाणांची निर्मिती खाजगी कंपन्या तयार करत असल्याने त्यांचा एकाधिकार निर्माण होऊ शकतो.

५. जैवतंत्राचा वापर शेती, उदयोग, व्यापार, वैदयकीय क्षेत्रात होत असल्याने या तंत्रज्ञानाचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

६. जैविक पिके व अजैविक पिके परस्पराजवळ असल्यास नैसर्गिक किटकामार्फत परागीकरण होऊन अजैविक पिके जैविक पिकात रूपांतरीत होऊ शकतात.

७. प्रतिकुल हवामान व बाजार किंमती यामुळे जैविक शेतीकडे दुर्लक्ष केले जाऊ शकते.

८. अल्पभुधारक व सिमांत शेतकरी जैविक शेती करू शकत नाहीत.

९. भारतीय शेतीची सध्याची स्थिती पाहता जैविक शेती तसेच सहायक सेंद्रीय पध्दती शेती करणे अशक्यप्राय बाब आहे.

१०. जैविक शेती कडून असलेल्या प्रचंड अपेक्षा पूर्ण होतीलच असे नाही. ही बाब भविष्यातील वाटचाल काय राहील यावर अवलंबुन असेल.

११. प्रचलीत शेती पध्दतीला टाळून जैविक शेतीचा स्विकार करावा या मनस्थितीत आजतरी शेतकरी धजावत नाहीत.

अशी अनेक आव्हाने व धोके असले तरी

जैविक शेती भावी समाजासाठी वरदान ठरू शकते

त्यासाठी शेतकऱ्यांना तीचा स्विकार, प्रचार, प्रसार व महत्व पटवून देणे काळाची गरज आहे. त्यासाठी शासकीय धोरणाबरोबरच ग्रामीण समाजाचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. तरच जैविक शेतीला व्यापक स्वरूप प्राप्त होईल.

**मूल्यमापन :**

मागील ३ दशकापूर्वी संपूर्ण जगातील गरीब, अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक प्रगतीची साधने, जागतिक स्तरावरील कुपोषण निमूर्लन, आणि भूकबळी डोळ्यासमोर ठेवून जैवतंत्रज्ञानाच्या वापराद्वारे शेतीच्या उत्पादन क्षमतेत वाढ करणे व वातावरणातील बदलाला अनुकूल वाणाची निर्मिती करण्यात आली. मात्र आजही या शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला नाही. कारण गरीब व अल्पभूधारक शेतकरी आणि त्यांची आर्थिक मिळकत विचारात घेतली गेली नाही. जैवतंत्रज्ञान निर्मित बियाणांची किंमत शेतकऱ्यांना परवडणारी नाही. शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने बियाणे पुरवठा न झाल्याने शेतकरी अडचणीत सापडले. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा अपेक्षित प्रसार आणि विकास झाला नाही.

**संदर्भ :**


१. पाटील सुभाष (२०१५) : अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक,

२. कटमूसरे एस.बी.(२०५) : महाराष्ट्राचा कृषी विकास, पिपळापूरे प्रकाशन, नागपूर.

३. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी, २०१२-१३.

४. दैनिक लोकसत्ता, १४ नोव्हेंबर २०१७.

५. Datta & Sundaram, Indian Economy, S. Chand Publishing, New Delhi.

६. www.indiaenvironmentportal.org.in.


◆◆◆

# कृषी प्रत्यय : एक आढावा

**उमेश भाऊराव घोडेस्वार**
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
अकोला.

स्वातंत्र्याच्या ७२ वर्षातही भारतामध्ये शेती क्षेत्र वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरविणारे क्षेत्र म्हणून कायम आहे. तरी देखील शेतीतील अनिश्चितता कायम असून शेती हा धोकादायक व्यवसाय म्हणूनही ओळखला जातो. देशाच्या उत्पन्नामध्ये कृषीचा वाटा दिवसेंदिवस कमी होतांना दिसत आहे. शेतकऱ्याला आपल्या उत्पादन कार्यासाठी व विविध कार्यासाठी प्रत्ययाची आवश्यकता असते. प्रत्ययाची शेतीमधील महत्वपूर्ण भूमिका लक्षात घेता भारतातील कृषी प्रत्ययाचा आढावा प्रस्तुत शोधलेखामध्ये घेतला आहे.

**प्रास्ताविक :**

भारतातील शेती ही नेहमीच पावसावर अवलंबून असते आणि म्हणूनच धोकादायक व्यवसाय म्हणूनही शेतीला ओळखले जाते. ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली, विविध साम्राज्यांतर्गत अत्याधिक ग्रामीण कर प्रणाली भारतात अस्तित्वात होती. देशातील पतपुरवठा प्रणालींनी शेतीतील हंगामी गरजा व शेतीतील चढ-उताऱ्याचा विचार केला पाहिजे जेणेकरून वर्षभरात शेतकऱ्यांच्या उपभोग पद्धतीचा सहज उपयोग होऊ शकेल. पावसाचा लहरीपणा आणि शेतीची कमी उत्पादकता ह्या भारतीय शेतीचे नेहमीचेच वैशिष्ट्य आहे. पारंपरिक शेती कार्यात अधिक जोखमीचा धोका आहे. निसर्गावरील अवलंबित्व, उच्च व्याजदर, सावकारी शोषण आणि कौटुंबिक शेती ही भारतीय शेतीची परंपरागत मागासलेपणाची कारणे होत. म्हणूनच शेतीला विकसित करण्यासाठी शेतीतील उत्पादकता वाढ, उत्पादन व्यय कमी होणे आवश्यक आहे.

कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे कारण लोकसंख्येच्या मोठ्या भागाला रोजगार पुरविणारे क्षेत्र म्हणून ते ओळखले जाते. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण ४८१.७ दशलक्ष कामगारांपैकी ११८.७ दशलक्ष शेती करणारे आणि १४४.३ दशलक्ष शेतमजूर आहेत याचा अर्थ एकूण कामगारांपैकी सुमारे ५५ टक्के शेती व संलग्न क्षेत्रात कार्यरत आहेत. असे असले तरी कृषी क्षेत्रात कार्यरत कामगारांची टक्केवारी कमी होत आहे. लेबर ब्युरो अहवालाच्या मते, २०१५-१६ मध्ये ही टक्केवारी कमी होवून ४६.१ टक्के शेती व संलग्न क्षेत्रात कार्यरत होते. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या अंदाजानुसार २०१८ मध्ये कृषी क्षेत्रातील रोजगाराची टक्केवारी ४४ टक्के होती. २०१५-१६ च्या कृषी समंकानुसार सूक्ष्म आणि सीमांत धारणक्षेत्राचे प्रमाण ८६.२१ टक्के होते तसेच एकूण धारणक्षेत्राचे सरासरी प्रमाण हे १.०८

एकर इतके होते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीची महत्वाची भूमिका लक्षात घेता एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये १९५० मध्ये शेतीचा वाटा ५२ टक्के होते व १९९० मध्ये ३० टक्के होते. हे प्रमाण २०१० मध्ये २० टक्के इतके होते तर २०१८-१९ मध्ये हे प्रमाण कमी होवून २०११-१२ च्या किंमतीनुसार १४.४ टक्के तर चालू किंमतीनुसार १६.१४ टक्के इतके झाले. भारतीय कृषी आणि संबंधित क्षेत्रामध्ये पीक, पशुधन, वनीकरण आणि मत्स्यपालन या चार उपक्रमांचा समावेश होतो. या उपक्रमांच्या उत्पादकतेस चालना देण्यासाठी, भारत सरकारने वेळोवेळी धोरणात्मक बदल केल्यामुळे १९६० मध्ये धान्य उत्पादनातील हरितक्रांती घडवून आली. १९७० मध्ये श्वेत क्रांती, २००२ च्या प्रारंभी कापूस उत्पादनात क्रांती, १९९३-२००२ कालावधीमधील मत्स क्रांती घडवून आली. त्यामुळे भारत तांदूळ, कापूस आणि सागरी उत्पादनामध्ये निर्यातक देश बनला. ही प्रगती भारत सरकार आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ध्येयधोरणान्वये दिसून आली. १९५१-५४ च्या अखिल भारतीय ग्रामीण पत सर्वेक्षण समितीने भारतात शेतीसाठी वित्तपुरवठा करण्यासाठी प्रत्यय वितरण प्रणाली स्थापन करण्यासाठी संस्थात्मक चौकटीचा पाया रचला होता. ज्याव्दारे पुढे प्रत्यय वितरण करण्यात येवू लागले. १९६० च्या उत्तरार्धापर्यंत शेतीला कर्जे पुरविण्यासाठी सहकार क्षेत्राने महत्वाची भूमिका बजावली. १९६९ व १९८० मध्ये प्रमुख १४ बॅकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. याच दरम्यान १९७६ मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना करण्यात आली. ज्याव्दारे ग्रामीण प्रत्ययाची सुविधा पुरविण्यात येऊ लागली. परिणामत: औपचारिक संस्थागत स्त्रोतांकडून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जे देण्यात येऊ लागली. म्हणजे शेती प्रत्ययामध्ये बहुस्तरीय सरकारी संस्थांचा दृष्टीकोन स्वीकारण्यात आला. १९६८ मध्ये शेती व लघू उद्योगांना दिल्या जाणाऱ्या वित्तपुरवठयावर विशेष भर देण्यात आला. या पार्श्वभूमीवर कृषी क्षेत्राला औपचारिक पत मोठ्या प्रमाणात मिळाले आहे. १९८१ मध्ये ३७.७१अब्ज डॉलर्स प्रत्यय हा शेतीमध्ये होता हे प्रमाण शेती उत्पादनाच्या (शेती जीडीपीच्या) १६ टक्के होते. २०१७-१८ मध्ये हे प्रमाण लक्षणीय वाढून १३६९४.५६ अब्ज डॉलर्स प्रत्यय होते.

**भारतातील कृषी प्रत्ययाची टप्पे :**

शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखला जाते. शेती क्षेत्रातील व्यापक मागण्यांमुळे कृषी वित्त संस्थेच्या संस्थात्मक चौकटीला आकार देण्यात आला. कृषी पत धोरणे आणि टप्पे यांचा उत्क्रांतीसाठी तीन विशिष्ट टप्प्यात विस्तृतपणे वर्गीकृत केले जाऊ शकते.

**प्रथम टप्पा (१९५१-१९६९)**

भारत सरकारने प्रथम पंचवार्षिक योजना १९५१ मध्ये सुरू केली आणि प्राथमिक क्षेत्राचा विकास करण्यावर भर दिला. नॅशनल क्रेडिट कौन्सिलने जुलै १९६८ मध्ये झालेल्या बैठकीत यावर जोर दिला की व्यावसायिक बँकांनी 'राष्ट्रीय प्राधान्य' समजल्या जाणाऱ्या शेती आणि लघु उद्योग या प्राथमिकता असलेल्या क्षेत्रांच्या अर्थसहाय्यात सहभाग वाढवावा. १९६९ मध्ये जेव्हा बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले, तेव्हा ६९५५ सार्वजनिक क्षेत्रातील बँक शाखा होत्या आणि प्रत्येक शाखा कार्यक्षेत्रात सरासरी लोकसंख्या ६४००० होती. ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी भारतीय रिझर्व्ह

बँकेने शहरी व ग्रामीण तसेच अर्ध-शहरी भागामध्ये शाखा सुरू करण्यासाठी १:३ गुणोत्तर विहित केले होते.

**दुसरा टप्पा (१९७०-१९९०) :**

स्वातंत्र्यांच्या पहिल्या दोन दशकांत शेतीला संस्थात्मक पतपुरवठा करण्याचे माध्यम सहकारी क्षेत्र होते. १९६९ मध्ये व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यावर १९७० च्या दशकात व्यापारी बँकांव्दारे कृषी प्रत्यय देण्यात येऊ लागला. या काळात अग्रगण्य क्षेत्रातील कर्ज देण्याची अग्रणी बँक योजना आणि प्राथमिक क्षेत्राकरिता नियामक मंडळाची सुरूवात झाली. हया दोन सुधारणांनी कृषी पत आणि ग्रामीण विकासासाठी महत्वपूर्ण असे प्रत्यय पुरवठयाचे कार्य केले आहे. १९७६ मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँक अधिनियम लागू करण्यात आला. त्याव्दारे शेती आणि ग्रामीण क्षेत्रातील प्रत्यय पुरवठ्यांवर भर देण्यात येऊ लागला. त्यानंतर १९८२ मध्ये राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास अधिकोष म्हणजे नाबार्डची स्थापना करण्यात आली. नाबार्डअंतर्गत शेतीला अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या प्रत्यय पुरवठयामध्ये मोठा बदल पाहायला मिळाला. १९८९ मध्ये रिझर्व्ह बँकेने सेवा क्षेत्र दुष्टिकोन आणि वार्षिक प्रत्यय योजना याद्वारे ग्रामीण प्रत्ययाची व्याप्ती वाढविली. १९९२ मध्ये स्वयंसहायत बचत गट प्रारुपाव्दारे वित्तीय समावेशानचा प्रयोग ग्रामीण भागात करण्यात येऊ लागला.

**तिसरा टप्पा (१९९१ नंतर) :**

१९९० मध्ये परकीय गंगाजळीच्या तुटवडयामुळे आर्थिक सुधारणांची सुरूवात करण्यात आली. १९९० च्या पहिल्या नरसिंह समितीच्या अहवालामध्ये ग्रामीण वित्तीय संस्थांसह वित्तीय क्षेत्राच्या आर्थिक सुदृढपणा आणि कार्यक्षमतेवर भर देण्यात आला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने बँकांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी व्याज दरात कपात करायला सुरवात केली. १९९० मध्ये सर्वप्रथम देशव्यापी कृषी कर्जमाफीची घोषणा करण्यात आली आणि राष्ट्रीय तिजोरीवर सुमारे १०० अब्ज डॉलर्सचा भार पडला. १९९५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या घोषणेनुसार, भारत सरकारने नाबार्डबरोबर ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी (आरआयडीएफ) ची स्थापना केली. आरआयडीएफ जे मुख्यत: ग्रामीण पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांच्या अर्थसहाय्यसाठी होते. राज्य सरकार आणि राज्य मालकीच्या कंपन्यांना कर्ज देऊन एखाद्या राज्यात कर्ज शोषून घेण्याची क्षमता अधिक मजबूत करण्यावर त्यामध्ये भर दिलेला होता. प्राधान्य क्षेत्रातील कर्ज देण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी अनुसूचित वाणिज्य बँकांचा फंड वाढविण्यात आला. १९९२-९३ नाबार्डने स्वयंसहायता बचत गट-बँक लिंकेज प्रोग्रामवरील पथदर्शी प्रकल्प सुरू केला. एक स्वयंसेवी गट, बँका आणि स्वयंसेवी संस्था यांचे भागीदारी प्रारुप हयाच काळात पाहायला मिळाले. किसान क्रेडिट कार्ड (केसीसी) ही १९९८ मध्ये शेतकऱ्यांना प्रत्यय मिळवितांना कमी त्रास होईल अशी योजना त्याद्वारे आणण्यात आली. केंद्र सरकारने वर्ष २००३-०४ मध्ये ग्राउंड लेव्हल क्रेडिट (जीएलसी) धोरण आणले. या धोरणांतर्गत, भारत सरकार दरवर्षी केंद्रीय अर्थसंकल्पात कृषी आणि संबंधित क्षेत्रासाठी जीएलसी लक्ष्य जाहीर करते जी वित्तीय वर्षात बँकांना साध्य करणे आवश्यक आहे. हे लक्ष्य प्रदेशनिहाय, एजन्सीनिहाय (एससीबी, आरआरबी आणि सहकारी बँका) आणि कर्ज

श्रेणीनिहाय (पीक व मुदत कर्ज) ठरवले आहेत. २००४-०५ मध्ये सुरू केलेला आणखी एक धोरणात्मक उपक्रम म्हणजे तीन वर्षाच्या कालावधीत शेतीच्या कर्जाची रक्कम दुप्पट करणे आणि औपचारिक वित्तपुरवठा वाढविणे हा होता. २००६ साली बऱ्याच घडामोडी घडल्या. २००६-०७ च्या अर्थसंकल्पाच्या घोषणेनुसार केंद्र सरकारने अल्प मुदतीच्या पीक कर्जासाठी व्याज सबवेशन योजना (आयएसएस) आणली. त्यायोगे शेतकऱ्यांना कमी व्याज दराने शेती पत मिळू शकेल. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पहिल्यांदाच आर्थिक समावेशास कारणीभूत ठरण्यासाठी व्यवसाय प्रतिनिधी आणि व्यवसाय सुलभता प्रथमच आणले. नाबार्डने जॉइंट लायबिलिटी ग्रुप (जेएलजी) मॉडेल सादर केले. जे भाडेकरु शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि शेतीत-पीकधारकांपर्यंत पत पोहचविण्यासाठी पूर्वीच्या एसएचजी मॉडेलचा विस्तार होता. केंद्र सरकारने जाहीर केलेली कृषी कर्ज माफी आणि कर्जमुक्ती योजना (एडीडब्ल्यूडीआरएस) २००८ मध्ये लहान शेतकऱ्यांचे संस्थात्मक कर्ज माफ करणे आणि इतर शेतकऱ्यांना २५ टक्के सवलत देणारी एकमुखी बंदोबस्त संधी यांचा समावेश आहे. ५२५.१६ अब्ज डॉलर्स इतक्या मोठ्या प्रमाणात कृषी कर्जाची एकप्रकारे लेखी ऑफर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या कायम समस्येला दिलासा देण्यासाठी आणि शेतकऱ्यांना होणारा आर्थिक दबाव कमी करण्यासाठी योजना आखण्यात आली. २००९-१० मध्ये सरकारने आयएसएस अंतर्गत ३ टक्के त्वरित परतफेड प्रोत्साहन (पीआरआय) पद्धत लागू केली. ज्यांनी परतफेड करण्यासाठी त्यांच्या तारखेला किंवा त्यापूर्वीच्या तारखेला कर्ज परतफेड केलेले अशा शेतकऱ्यांना व्याजाचा प्रभावी दर ४ टक्क्यांपर्यंत खाली आणला. २०१२ मध्ये, प्राधान्य क्षेत्र कर्ज पुरविण्याच्या (पीएसएल) च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये रिझर्व्ह बँकेने पात्र उपक्रमांच्या व्याप्तीसाठी सुधारणा केली. पुन्हा एप्रिल २०१५ मध्ये, अंतर्गत कार्यकारी गटाच्या (आयडब्ल्यूजी) शिफारसींच्या आधारे मार्गदर्शक तत्त्वे सुधारण्यात आली. कृषी क्षेत्राशी संबंधित सुधारित प्राधान्य क्षेत्रास कर्ज पुरविण्यासाठी मार्गदर्शक प्रणाली विकसित करण्यात आली. ज्यामध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कृषी पत यातील फरक, एएनबीसीच्या ८ टक्के किंवा ऑफ बॅलन्स शीट एक्सपोजरच्या क्रेडिट समतुल्य रकमेपैकी जे जे जास्त असेल तेवढे उप-लक्ष्य लहान आणि सीमांत शेतक-यांसाठी विहित केले गेले.

**कृषी पतपुरवठयाची प्रवृत्ती :**

कृषी पत आणि कृषी उत्पन्नाचा; जीडीपीच्या कामगिरीवर झालेल्या कार्यक्षमतेच्या धोरणातील टप्प्यांचा परिणाम समजून घेण्यासाठी कृषी पत थकीत व वितरण विचारात घेऊन कृषी पत उत्पन्नाचे गुणोत्तर कृषी जीडीपीची गणना करतांना विचारात घेणे आवश्यक ठरते.

शेतीमधील थकीत कर्ज आणि शेतीचे उत्पन्नाचे प्रमाणाचा विचार करता१९५०-५१ मध्ये ०.६ टक्क्यांवरून १९७१-७२ मध्ये ९.८१ इतके झाले. १९७२ नंतर हे प्रमाण १९८७-८८ पर्यत वाढीचा कल दर्शविते. हे प्रमाण २१.७६ टक्क्यांपर्यंत वाढलेले दिसून येते. १९५०-१९८० च्या दशकात कृषी जीडीपी विरूद्ध कृषी पतपुरवठा करणारी प्रभावी कामगिरी म्हणजे बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना सुरू केल्यामुळे देशात शेतीक्षेत्रातील औपचारिक पतपुरवठा वाढला.

१९९०-९१ नंतर गुणोत्तरातील उलट कल सुरू झाला आणि १९९८-९९ मध्ये ते १३.३४ टक्क्यांपर्यंत प्रमाण खाली आले. १९९९ नंतर हे प्रमाण झपाट्याने वाढले आणि २००६-०७ मध्ये ते ३५.५५ टक्क्यांपर्यंत पोहोचले, जे सूचित करते की किसान क्रेडीट कार्डचे कृषी पतपुरवठा करण्यामध्ये मोठे योगदान होते.२०१५-१६ मध्ये शेतीमधील थकीत कर्ज आणि शेतीचे उत्पन्नाचे प्रमाण ४९.६३ टक्के आणि २०१७-१८ मध्ये ५१.५६ टक्क्यांवर पोचले. वरील चित्रातील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, दोन्ही कृषी-पतपुरवठा आणि शेती-जीडीपीच्या टक्केवारीच्या रूपात वितरणाची प्रवृत्ती काही कालावधीत वगळता मुख्यत्वे सारखीच आहे कर्जमाफीची घोषणा होण्याची कारणे ही असू शकतात ज्यामुळे कर्जदारांच्या कर्जाची परतफेड करण्याच्या वर्तणुकीवर नकारात्मक परिणाम झाला आणि बँकांना नव्याने कर्ज देण्यास रोखले. कृषी पत आणि वरच्या कृषी जीडीपीच्या कामगिरीवर झालेल्या कार्यक्षमतेच्या धोरणातील टप्प्यांचा परिणाम समजून घेण्यासाठी कृषी पत थकित व वितरणास विचारात घेऊन कृषी पत उत्पन्नाचे गुणोत्तर कृषी जीडीपीचे गणले गेले.

सर्व राज्यात कृषी पतपुरवठा करण्यात राज्य सहकारी बँका; ह्या आघाडीच्या संस्था आहेत. काही राज्यांमध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांची; स्थिती लक्षणीय दिसून येते उदा. बिहार (३५ टक्के), तेलंगणा (१५ टक्के), हिमाचल प्रदेश (१० टक्के) आणि उत्तर प्रदेश (१० टक्के). सहकारी संस्थांनी ओडिशा (४६ टक्के), गोवा (३४ टक्के), महाराष्ट्र (३११ टक्के), छत्तीसगड (२७ टक्के), मध्य प्रदेश (२७ टक्के), गुजरात (२२ टक्के) आणि कृषी पतपुरवठा करण्यासाठी प्रादेशिक ग्रामीण बँकांचे लक्षणीय योगदान दिसते.

**सूक्ष्म वित्त संस्था (एमएफआय)**

ग्रामीण पतपुरवठा बाजारासाठी सूक्ष्म वित्त संस्था एक महत्त्वपूर्ण विभाग म्हणून विकसित झाला असून अलिकडच्या वर्षात विविध प्रकारच्या व्यवसाय मॉडेलचे प्रदर्शन हया संस्थांनी केले आहे. २०१० मध्ये आंध्रप्रदेश निर्माण झालेल्या संकटानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मालेगाम समितीच्या शिफारशींच्या आधारे एमएफआयच्या कर्ज देण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली. एनबीएफसी-एमएफआयची एक नवीन श्रेणी समाधानकारक अटींच्या अधीन आणली गेली होती. म्हणजेच, रोजगार म्हणून भांडवल, सदस्यांना कर्ज, व्याज दरावरील व्याज आणि कायम ठेवलेली मर्यादा इत्यादी. एमएफआयद्वारे कर्ज वाढविल्यामुळे बँका प्राधान्य क्षेत्रातील कर्जासाठी पात्र ठरतात. अटींच्या पूर्ततेनुसार, इतर एमएफआय देखील या मार्गदर्शक तत्त्वांचे अनुसरण करण्याचा प्रयत्न करतात. एनबीएफसी-एमएफआय विषयी नियामक मार्गदर्शक तत्त्वे आणि बँकांना प्राधान्य क्षेत्रातील कर्ज दिशा निर्देशांतर्गत एमएफआयला कर्ज समाविष्ट करण्यात येते.

२०१५ मध्ये, रिझर्व्ह बँकेंच्या नियमांमध्ये असे म्हटले गेले होते की किमान ५० टक्के एमएफआय कर्जे उत्पन्नाच्या कार्यासाठी देणे बंधनकारक असावे. भारत मायक्रो फायनान्स रिपोर्ट (२०१७) नुसार शेती, पशुसंवर्धन आणि व्यापार ही प्रमुख उप-क्षेत्रे आहेत जेथे उत्पन्न देणारी कर्जे दिली जावू शकतात. उत्पन्न न मिळालेल्या कर्जाचा उपयोग उपभोग, गृहनिर्माण, शिक्षण, पाणी आणि

स्वच्छता आणि आरोग्यासाठी केला जावा असे सूचित करण्यात आले आहे.

**शेती कर्जमाफीचा परिणाम :**

कृषी कर्ज माफी अर्थात कृषी व ग्रामीण कर्ज मुक्ती योजना(एआरडीआरएस) या योजनेअंतर्गत सर्वप्रथम १९९० मध्ये कर्ज माफीचा कार्यक्रम देशव्यापी स्तरावर हाती घेण्यात आला.त्यानंतर २००८ मध्ये कृषी कर्ज माफी देशव्यापी कर्जमाफी झाली. कर्ज आणि कर्जमुक्ती योजना, २००८ अस्तित्त्वात आली. या कार्यक्रमात सार्वजनिक क्षेत्रातील बँका (पीएसबी) आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांना (आरआरबी) थकीत मुदतीच्या कर्जाचे थकीत हप्ते सुलभ करण्यात आले आणि काही कर्जे माफ करण्यात आलीत. या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त मदत रक्कम प्रति शेतकरी १०,००० रू. इतकी होती आणि त्यांच्या जमिनीच्या आकाराच्या आधारे कोणतेही तारण ठेवण्याचे प्रावधान नव्हते.

थोडक्यात, कृषी प्रत्ययासंदर्भात भारतामध्ये तीन टप्प्यामध्ये सुधारणा झालेल्या दिसून येतात. पहिल्या टप्प्यामध्ये (१९५१-१९६९) अंतर्गत प्रथम पंचवार्षिक योजनेने प्राथमिक क्षेत्राच्या विकासावर भर दिला. १९६९ च्या  मध्ये जेव्हा बँकांच्या राष्ट्रीयकरणाने ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी शहरी व ग्रामीण तसेच अर्ध-शहरी भागामध्ये बँकांच्या शाखा सुरू करण्यात आले. दुसरा टप्प्यामध्ये (१९७०-१९९०)नाबार्डअंतर्गत शेतीला अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या प्रत्यय पुरवठयामध्ये मोठा बदल पहायला मिळाला. ग्रामीण वित्तीय संस्थांसह वित्तीय क्षेत्राच्या आर्थिक सुदृढपणा आणि कार्यक्षमतेवर भर देण्यात आला. तर तिसऱ्या टप्पा अंतर्गत (१९९१ नंतर) १९९० मध्ये परकीय गंगाजळीच्या तुटवडयामुळे आर्थिक सुधारणांची सुरूवात करण्यात आली.शेती कृषी कर्जमाफीची सुरवात हया टप्याअंतर्गत दिसून येते.

भारतामध्ये शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या ह्या शेती व्यवसाय कमकुवत व जोखिमेचा आहे हे दर्शवित आहे. त्यामुळे शेतकरी हा आपला परंपरागत व्यवसाय सोडून शहरीकरणाच्या प्रक्रियेत नवा व्यवसाय शोधू पाहत आहे. त्यामुळे शेती हा स्वाभिमानाचा व्यवसाय आहे अशी पत व प्रतिष्ठा निर्माण होण्यासाठी शेतकऱ्याला कर्जे काढण्याची वेळ येणार नाही अशी व्यवस्था होणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतकऱ्यांसाठी नवे तंत्र विकसित करावे लागेल, त्याचा उपयोग करावा लागेल, शाश्वत पर्यावरणासाठी वाढत्या रसायनांचा मर्यादित वापर करण्याबरोबरच पीक पध्दतीमध्ये देखील बदल करावा लागेल. शेतमालाला खर्च वजा जाता ५० टक्के उत्पन्न शेष राहील अशी व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतीतील आदाने यामध्ये देखील बदलत्या काळानुसार बदल करावा लागेल. शेती प्रत्ययाची गरज लागणार नाही असा स्वावलंबी शेतकरी घडविणे हे शेतकऱ्यांच्या व सरकारच्या योग्य धोरणांचाच परिणाम ठरणार आहे. त्यासाठी तशी व्यवस्था निर्माण होणे शेतीप्रधान असणाऱ्या देशाला आवश्यक झाले आहे.

**संदर्भ :**

1. Das Abhiman, SenapatiManjusha, Joice John (2009): 'Impact of Agricultural Credit on Agriculture Production : An Empirical Analysis in India'. Reserve

Bank of India Occasional Papers. Vol. 30, No.2.

2. Bhole, L.M.(2006) : Financial Institutions and Markets : Structure, Growth and Innovations. New Delhi: Tata McGraw-Hill Publishing Company Ltd.
3. Misra S.K. and V.K. Puri (2010). Indian Economy Himalaya P ublishing House, New Delhi.
4. Naga Raju Alluri (2011). "Agricultural Credit-the Gateway for Inclusive Growth", in Inclusive Growth in Agriculture, edited by M. Upender et al. New Delhi: A Mittal Publication, pp.-27-36.
5. EPW Research Foundation, Agricultural Credit in India: Trends, Regional Spreads and Database Issues Occasional Paper-59, NABARD, Mumbai, 2014.
6. Government of India, Report of the Committee on the FinancialSystem (Chairman: Shri M. Narasimham), Ministry of Finance, New Delhi, 1991.
7. https://www.rbi.org.in/scripts/bs_viewcontent.aspx?Id=2240

◆◆◆

ISSN 2320-0197

# भारतीय अधिकोषण व्यवस्था : राष्ट्रीयीकरणाची पार्श्वभूमी

**वनिता चोरे**
सहयोगी प्राध्यापक,
(कै.) नारायणराव अमृतराव देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय,
चांदूरबाजार, जि.अमरावती.

**प्रास्ताविक :**

आधुनिक काळात देवाण-घेवाण, पैशाचे व्यवहार सर्वत्र अधिकोषण व्यवस्थाद्वारे होतात. रोखीने होणारे व्यवहार कमी होत आहे. नव्हे तर 'रोकड विरहित अर्थव्यवस्था' निर्माण व्हावी म्हणजे ७५ प्रतिशतपेक्षा जास्त व्यवहार हे अधिकोषणाचे माध्यमातून व्हावे असे शासकीय धोरण देखील असलेले निदर्शनास येते. अशा परिस्थितीमध्ये अधिकोष हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशाच्या आर्थिक व्यवहारात बँकेचे महत्त्व काय आहे हे सांगण्याची गरज आज नाही. सामान्यांपर्यंत बँकेचे व्यवहार व्हावे. सामान्य जनतेची अगदी अल्पशी रोख देखील अधिकोषामध्ये ठेवींच्या स्वरूपात स्वीकारल्या जाण्यात व ती ठेव अत्यंत गरजू व्यक्तीला उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये कर्जाऊ म्हणून उपलब्ध व्हावी या उदात हेतूने बँकिंग प्रणाली अस्तित्वात आली. नव्हे तर हे प्राथमिक कार्य करणाऱ्या संस्थेस बँक म्हणून संबोधल्या गेले.

आज या बँकाच्या स्वरूपात अग्रगण्य बदल झाले. ५० वर्षापूर्वी प्राथमिक कार्य करणाऱ्या संस्थेचे १९६९ मध्ये राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १४ राष्ट्रीयीकरण झालेल्या अधिकोषांचा शाखा पद्धतीने भारतामध्ये विस्तार झाला. ५० वर्षानंतर म्हणजे राष्ट्रीयकरणानंतर राष्ट्रीयकृत अधिकोषांच्या स्थितीचे सविस्तर अध्ययन सर्वत्रच होत आहे. त्यासंदर्भातील अहवाल देखील प्रसिद्ध झाले आहेत. आज राष्ट्रीयकृत अधिकोषांच्या समोर असणारी आव्हाने, बुडीत कर्जाची समस्या सर्वत्र चर्चिली जात आहे. राष्ट्रीयीकरणानंतर अधिकोषांवर ही वेळ येत असेल तर ५० वर्षापूर्वी राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता होती का? या अनुषंगाने अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण करण्यामागची पार्श्वभूमी या शोधनिबंधामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**भारतीय अधिकोषांचा इतिहास :**

भारतामध्ये अधिकोषण पद्धतीची उत्क्रांती ही साधारणत: अनेक अर्थतज्ञांच्या मते प्राचीन काळामध्येच (Ancient Era) झालेली निदर्शनास येते. याबाबत मोहेंजो दरो व हडप्पा येथे मिळालेल्या अवशेषांमध्ये काही पुरावे निदर्शनास येतात. तसेच मुघलांच्या काळात सरकारी तिजोरी निर्माण केली होती. सुवर्ण व रौप्य मुद्रांना मुगल सरकारने 'अशरफी' नाव दिले होते.

भारतामध्ये १७ व्या शतकाच्या सुरवातीला सेठ कुटुंबाच्या काळामध्ये व्यापार करण्याच्या अनुषंगाने अधिकोषणाचे कार्य करणारी संस्था जगामध्ये प्रसिद्ध होती. जी भारतातील विशिष्ट

जमातीकरिता कार्य करीत होती. तीच १७ व्या शतकामध्ये 'हिन्दुस्थान बँक' म्हणून कार्य करीत होती.

ब्रिटीशकाळामध्ये अधिकोषण व्यवस्थेची कार्यप्रणाली ब्रिटिशांनी विकसित केली व १७८४ मध्ये बंगाल बँकेने पत्रमुद्रा विकसित केल्या. त्यानंतर १७८७ मध्ये 'जनरल बँक ऑफ इंडिया', इ.स. १८०६ मध्ये बँक ऑफ बंगाल, १८४० मध्ये बँक ऑफ बॉम्बे व १८४३ मध्ये बँक ऑफ मद्रासची स्थापना झाली. वरील तीनही बँकांचे विलीनीकरण म्हणजे १९२० मध्ये स्थापन केलेली 'इम्पेरियल बँक ऑफ इंडिया'.

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तिला 'स्टेट बँक ऑफ इंडिया' म्हणून संबोधल्या जाते. 'इम्पेरिअल बँक ऑफ इंडिया' ही अनेक वर्ष मध्यवर्ती केंद्रीय अधिकोष म्हणून 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' स्थापन करण्यात आली.

खाजगी बँक व्यवसायाची झपाट्याने प्रगती होत असतांना बँक व्यवसायावर मध्यवर्ती बँकेचे नियंत्रण असावे असे मानले जाऊ लागले. विकासाबरोबर उद्योग आणि व्यापारी क्षेत्रामध्ये बँक कर्जाची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता निर्माण झाली. दळणवळणांच्या सुविधांमध्ये वाढ होऊन बाजारपेठा विकसित व्हायला लागल्या.या परिस्थितीत अधिकोषांच्या ठेवींचे व कर्जाचे प्रमाणही वाढत गेले. त्यामुळे बँकेच्या प्राथमिक कार्यासोबतच आधुनिक सेवांही विकसित होत गेल्या. त्यामुळे बँकेने आर्थिक व्यवसाय व विविध सेवांची निर्मिती करण्यावर भर दिला आणि हे क्षेत्र विकसित होत गेले.

**भारतातील आधुनिक अधिकोषण प्रणालीचा उदय:**

भारतीय अर्थव्यवस्था विकसित होत असतांना सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीसोबतच आर्थिक व्यवहार वाढीस लागले. पैशाची देवाण–घेवाण करण्याकरिता बँक व्यवसायाला चांगले दिवस आले. बँकांची संख्या वाढू लागली. भारतामध्ये शाखा अधिकोषण पद्धती अस्तित्वात आल्यामुळे बँकांच्या शाखा विस्तारित होत गेल्या. पंजाब नॅशनल बँक, कॅनरा बँक, बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया इ. बँका वाढत गेल्या. खाजगी बँकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत गेली. बँकांचे विकेंद्रीकरण होऊन बँका निमशहरे व ग्रामीण भागात विकसित होत गेल्या.

आधुनिक अर्थव्यवस्थेत क्षेत्रनिहाय गरजांची पूर्तता करण्याकरिता बँकांची निर्मिती झाली. त्यामुळे विविध बँकांच्या कार्यांचे विशेषीकरण होऊन त्या कार्यानुसार, रचनेनुसार, मालकी व संघटनानुसार बँकाचे वर्गीकरण केले आहे. परंतु आज सर्वत्र बँकांच्या कार्ये विविध प्रकारची व गुंतागुंतीची झाली आहेत. एखाद्या बँकेचा समावेश विशिष्ट कार्यात केला तरी ती तेवढ्यापुरती मर्यादित कार्य करीत नाही. बँकांच्या विविध कार्यांपैकी बहुतांश कार्यांचा उद्देश व्यापार, उद्योगांना मदत करणे हाच असतो. व्यापार आणि उद्योगांना प्रामुख्याने अल्प, मध्यम व दीर्घमुदतीची कर्जे दिली जातात.

अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये प्रामुख्याने औद्योगिकरणाच्या विकासाला प्राधान्य दिल्यामुळे उद्योगधंद्याच्या वाढीकरिता भांडवल पुरवठा होणे आवश्यक झाले. त्याकरिता अल्प मुदती पेक्षा दीर्घ मुदतीच्या भांडवलीची आवश्यकता भासते. त्यामुळे दीर्घ मुदतीची कर्जे देणाऱ्या बँकाची नितांत गरज असते. त्यामुळे 'औद्योगिक किंवा गुंतवणूक अधिकोषांची' वाढ करावी लागले.

अशा प्रकारे भारतीय अधिकोषण पद्धती

विकसित होऊन अल्पकालीन व दीर्घकालीन कर्जे देणाऱ्या विविध बँकांची स्थापना झाली. कर्जे देत असतांनाचा नफ्याच्या हेतूने प्रेरित होऊन कार्य करतांना अर्थव्यवस्थेला हानिकारक अशा काही बाबी घडण्याचा संभव असतो. प्रत्ययनिर्मिती मुळे चलनवाढ व त्यामधून भाववाढ निर्माण होऊन सामाजिक दुष्परिणाम होतात. तसेच अनावश्यक कर्जाचे वाटप केल्यास बुडीत कर्जाची समस्याही निर्माण होते. त्यामुळे बँक व्यवसाय नियंत्रित करण्याकरिता मध्यवर्ती अधिकोषाची निर्मिती केली जाते. मध्यवर्ती अधिकोष कुठेही नफा प्राप्त करण्याच्या हेतूने निर्माण केल्या जात नाही. त्यामुळे व्यापारी बँकासोबत त्या स्पर्धा करीत नाहीत. इतर बँकापेक्षा ती बँक वेगळी समजली जाते. देशाच्या आर्थिक धोरणाशी सुसंगत असे धोरण आखले जाते. भारतामध्ये साधारणत: कार्यानुसार वर्गीकरण केले आहे. भारतामध्ये शाखा अधिकोषण पद्धती अस्तित्वात असून प्रत्येक अधिकोषाने ग्रामीण भागांमध्ये आपल्या शाखांचा विस्तार केला आहे. त्यामुळे सर्वत्र बँक व्यवहारांची सवय सामान्य व्यक्तींमध्येही रूळलेली दिसून येते.

**राष्ट्रीयीकरणाची पार्श्वभूमी :**

जगामध्ये अधिकोषण प्रणाली विकसित करतांना कोणत्याही देशामधील अधिकोषांची रचना ही आर्थिक, सामाजिक व प्रासंगिक राजकीय परिस्थितीवर तसेच स्वरूपावरही अवलंबून असते. भारतामध्ये अधिकोषण व्यवस्था विकसित करताना शाखा अधिकोषण पद्धतीचा स्वीकार केला गेला. भारतामध्ये बँकिंग कायदा १९४९ मध्ये 'मागणी करताच परत करण्याच्या अटींवर ठेवी स्वीकारणे व स्वीकारलेल्या ठेवीतून पैसे काढण्याची परवानगी देणे व ठेवींमधून रक्कम कर्जाऊ म्हणून देणारी संस्था म्हणजे बँक' अशी व्याख्या केली गेली. पैशाची देवाणघेवाण करण्याकरिता भारतामध्ये बँक व्यवसाय विकसित होत गेला. १९ व्या शतकात खाजगी बँकाच्या संख्येत वाढ मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. मात्र त्यावेळी बँकामध्ये काही दोष व अपप्रवृत्ती वाढत गेल्या व भारतामधील अनेक बँकांना त्याची झळ पोहचू लागली. त्यामुळे या व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याकरिता १९३५ मध्ये केंद्रीय अधिकोषाची स्थापना करण्यात आली व मध्यवर्ती अधिकोष सरकारच्या मालकीचा असावा अशी सूचना आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कडून आली १९४९ मध्ये केंद्रीय अधिकोषाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

भारताने स्वातंत्र्योत्तर काळात बँकासारख्या अत्यंत महत्त्वाच्या आर्थिक शाखांचे केंद्रीकरण होऊ नये व समाजाचे प्रभावी नियंत्रण असावे ही भूमिका स्वीकारल्यामुळे ते केंद्रीय अधिकोषाद्वारे खाजगी बँकावरील नियंत्रणावर वाढ करण्याकरिता केंद्रीय अधिकोषांच्या अधिकारात वाढ करण्यात आली. १९५५ मध्ये इंपेरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण ग्रामीण भागात शाखा विस्ताराच्या आनुषंगाने करण्यात आले. व राष्ट्रीयीकरणानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया असे तिचे नामकरण झाले.

स्टेट बँकेला जुन्या संस्थानिकांच्या सात खाजगी बँका, उपबँका म्हणून जोडण्यात आल्या.

**अधिकोष राष्ट्रीयीकरण :**

खाजगी बँकावर सरकारची मालकी आणि नियंत्रण प्रस्थापित करणे बँक-राष्ट्रीयीकरण होय. अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण व्यापक सामाजिक हिताच्या भूमिकेतून केले जाते. बँक शाखांचे निमशहरी व ग्रामीण भागात विकेंद्रीकरण करणे, आर्थिक सत्तेचे

केंद्रीकरण होण्यास प्रतिबंध घालणे व प्राधान्य क्षेत्राला अधिक कर्जे देणे, अग्रक्रम क्षेत्रातील दुर्लक्षित उद्योगांना प्राधान्य मिळणे, खाजगी क्षेत्राचे स्वार्थी व्यवस्थापन नष्ट करणे, श्रमिकांच्या सेवाशर्ती व किमान वेतन मिळणे व समाजवादी समाजरचना अंमलात आणणे इ. त्यामागची उद्दिष्टे होती.

व्यापारी अधिकोषांच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी मोठ्या प्रमाणावर व्हायला लागली ती प्रामुख्याने शेती व ग्रामोद्योगांना कर्ज देण्याकरिता टाळाटाळ करणाऱ्या खाजगी भांडवलदारांचे वर्चस्व कमी करण्याकरिता. तसेच अधिकोषण व्यवसाय स्थिरावण्याच्या दृष्टीने १९४९ नंतर भारतीय अधिकोषांच्या गुणात्मक प्रगतीकडे लक्ष दिले जाऊ लागले. अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने १९५४ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. ग्रामीण भागातील लोकांना बँकेच्या सोयी, विशेषत: कर्ज पुरविण्यासाठी बँकेच्या शाखा काढल्या पाहिजेत. स्टेट बँकेसोबत काही लहान बँका मोठ्या बँकामध्ये विलीन कराव्यात अशी विचारसरणी समोर आली. १९६० मध्ये दोन मोठ्या बँक बंद पडल्या तेव्हा मोठ्या बँकांमध्ये लहान बँकांच्या विलीनीकरण योजना करणे व ती अंमलात आणण्याचे अधिकार कायदा संमत करून केंद्रीय अधिकोषाकडे देण्यात आले. यामुळे अनेक लहान बँकाचे मोठ्या बँकेत विलीनीकरण केल्यामुळे या व्यवसायाचे स्थैर्य वाढले. यानंतर भारतामध्ये अधिकोषांची प्रगती वेगाने व्हायला लागली. देशाच्या विकासामध्ये बँकानी भाग घ्यावा या हेतूने १९६७ साली बँकावरील सामाजिक नियंत्रणाची योजना अंमलात आणली गेली. १९६९ साली भारतीय अधिकोषणाचा सर्वांगीण अभ्यास करून भारतीय बँकाची विकासात्मक कार्यात उपयुक्ता वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्याकरिता बँकिंग आयोगाची निर्मिती करण्यात आली. अवघ्या काही महिन्यामध्ये १९ जुलै १९६९ मध्ये १४ अधिकोषणांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

अधिकोषांच्या राष्ट्रीयीकरणामागील मुख्य उद्देश स्व. इंदिराजी गांधी पंतप्रधान असतांना गरिबीचे निर्मूलन करणे हा होता. १९७१ मध्ये 'गरीबी हटाव कार्यक्रम' जाहीर केला व २० कलमी कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने भारत सरकारने मोठ्या बँकाचे राष्ट्रीयीकरण केले. सुरवातीला १४ बँकाचे ज्यांचे भांडवल ५० कोटी रू. जास्त आहे व १९८० मध्ये अजून ०६ बँकाचे ज्यांचे भांडवल २०० कोटी रू. होते त्याचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. यानंतर शाखा विस्तार, ठेवी, कर्जे, अग्रक्रम दिलेल्या क्षेत्रांना अर्थपुरवठा इ. दृष्टीने राष्ट्रीयकृत अधिकोषांचे महत्त्व वाढले. परंतु काही खाजगी बँकाचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. सामाजिक कल्याण आणि राष्ट्रीय विकास साध्य करणे हे एकूणच राष्ट्रीयीकरणाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले. शाखा विस्तार करून बँकामधील ठेवी वाढविण्याकरिता प्रयत्न करणे, लोकांना बँकिंगची सवय लावणे, बँकांचा उपयोग मुख्यत: शेती, लघुउद्योग, निर्यात व्यापार, समाजातील दुर्बल घटक व आर्थिकदृष्ट्या मागासलेले विभागांचा विकास, नवीन उद्योजकांना प्रेरणा व मदत देणे ही उद्दिष्टे पूर्ण होतील या अपेक्षेने राष्ट्रीयीकरणास प्राधान्य देण्यात आले.

**समारोप :**

सरकारी अपेक्षेनुसार अधिकोषांचा शाखा विस्तार ग्रामीण भागामध्ये होऊ शकला नाही. पर्यायाने

ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष झाले. सर्वसामान्यांकडून ठेवींच्या स्वरूपात जमा झालेल्या पैसा औद्योगिकीकरणाकडे वळविण्यात आला.

अधिकोष व्यापारी तत्त्वावर कार्य करीत असल्यामुळे ग्रामीण भागाऐवजी शहरी भागांमध्ये विस्तार रोखण्याकरिता राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता असल्याचा अहवाल बँकिंग आयोगाने सादर केला.

भारत सरकारने शेती व ग्रामीण विकासाला गती देणे, कर्जपुरवठा वाढविणे, कर्जवाटपाचे प्रमाण वाढविणे इ. समाजातील दुर्बल घटक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विभागांच्या विकास इ. राष्ट्रीयीकरणाची उद्दिष्ट दिसून येतात.

राष्ट्रीयीकरणाचे मुख्य उद्दिष्ट सामाजिक कल्याण व राष्ट्राचा आर्थिक विकास साध्य करणे व आर्थिक केंद्रीकरण रोखण्यास प्राधान्य देणे हा होता.

बँक व्यवसाय नियंत्रित करून, सरकारच्या हितकारक असणारे प्रकल्प, गरिबी हटाव कार्यक्रम, २० कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या आनुषंगाने तत्कालीन पंतप्रधान इंदिराजी गांधी यांनी बँकिंग ॲक्ट करून १४ अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण १९ जुलै १९६९ रोजी केले. या राष्ट्रीयी करणा मागच्या संपूर्ण पार्श्वभूमीचा विचार केल्यास ठोस अशी भूमिका घेतांना ग्रामीण विकास, सामाजिक कल्याण ही उद्दिष्टे असली तरी प्रकर्षाने राजकीय दृष्टीने याची अंमलबजावणी करून लाभ प्राप्त करणे हे देखील प्रमुख कारण असावे.

**संदर्भ सूची :**


१) डॉ. कुळकर्णी एस.एन., डॉ. बेराड आर.आर. आणि डॉ. कुळकर्णी लिला : बँक व्यवसायाची मूलतत्त्वे, विद्या प्रकाशन, रूईकर रोड, नागपूर.

२) मराठी विश्वकोष – बँका आणि बँकिंग, विश्वकोष, मराठी, राज्य सरकार महाराष्ट्र.

३) डॉ. जहागिरदार दि.व्यं. – '१४ बँकांचे राष्ट्रीयीकरण', दै. हिन्दुस्थान.

4) Tallura Sreenivas : Banking Sector & Human Resources, Discovery Publishing House, New Delhi.

5) Website : www.bank.National


◆◆◆

# Banks and Non-Performing Assets

**H.A. Hudda**
Nagpur.

**Introduction :**

The scheduled commercial banks are those which are included in the second schedule of RBI Article, 1934 and which carry out the normal business of banking such as accepting deposits, giving out loans and other banking services.

Scheduled commercial banks can be further divided into four groups, viz.,

i) Public sector banks
ii) Private banks
iii) Foreign banks, and
iv) Regional rural banks

**Research methodology-objectives :**

1. to study the status of non-performing assets of Indian scheduled commercial banks in India.
2. To analyse the impact and the recovery method of NPAs on banks, and
3. To make appropriate suggestions to help avoid future NPAs and to manage existing NPAs in banks.

**Methodology :**

Data for this study has been collected from secondary sources. These include various published articles, books, journals and research papers.

Firstly I like to explain the process of banking system in India since ancient period.

**Ancient India :**

The Vedas (2000-1400 BC) are the earliest Indian text to mention the concept of usury with the world, Kusudini translated as 'usurer'. The sutras (700-1000 BC) and Jatakas (600-400 BC) also mentioned usury. Text of this period also condemned usury. Vashishtha forbade Brahmin and Kshatriya varnas from participating in usury. By the end of century CE, usury became more acceptable. The Manusmruti considered usury an acceptable means of acquiring wealth or leading a livelihood. It also considered money lending above a ceain rate and

different ceiling rates for different castes a grave sin.

The jatakas, dharmashashtra and kautilya also mentioned the existence of loan deeds called suapatra or sualekhaya later during the Mauryan period (321-185 BC). An instrument called 'adesha' was in use, which was an order on a banker directing him to pay the sum on the rate to a third person which corresponds to the definition of a modern bill of exchange. The considerable use of these instruments has been recorded. In large towns, merchants also gave letters of credit to one another.

**Medieval era :**

The use of loan deeds continued in the Mughal era and was called dastawez-indultalb was payable after a stipulated time. The use of payment orders by royal treasuries, called barattes have been also recorded. There are also records of Indian bankers using issuing bills of exchange on foreign countries. The evaluation of hundies, a type of credit instrument, also occurred during this period and remained in use.

**Colonial era :**

During the period of British rule merchants established the Union Bank of Calcutta in 1829, first as private joint stock association, then partnership. Its properties were the owners of the earlier commercial bank and the Calcutta bank which by mutual consent created union bank to replace these two banks. In 1840 it established an agency at Singapore and closed the one at Mirzapur that it had opened in the previous year. Also, in 1840 the bank revealed that it had been the subject of a fraud by the bank's accountant. Union bank also incorporated in 1845 but failed in 1848 having been insolvent for sometime and used new money from depositors to pay its dividends. The Allahabad bank established in 1865 and still functioning today. It is the oldest joint stock bank in India. It was not the first thought that honour belongs to the bank of upper India which was established in 1863 and survived until 1913; when it failed with some of its assets and liabilities being transported to the Alliance bank of Simla. Foreign banks too started to appear particularly in Calcutta in 1860s. Grindlays Bank opened its first branch in Calcutta in 1864. The Comptoir d' Escomptede Paris opened a branch in Calcutta in 1860 and another in Bombay in 1862. Branches followed in Madras and Pondicherry than a in French possession. HSBC established itself in Bengal in 1869. Calcutta was the most active trading port in India, mainly due to trade of the British Empire and so

because of a banking centre.

The presidency banks dominated banking in India but there were also some exchange banks and a number of Indian joint stock banks. All these banks operated in different segments of the economy. The exchange banks mostly owned by Europeans, concentrated on financing foreign trade. Indian joint stock banks were generally undercapitalized and lacked the experience and maturity to compete with the presidency and exchange banks. This segmentation let lord Curzon to observe in respect of banking it seems. We are behind the times. We are like some old fashioned sailing ship divided by solid wooden bulkheads into separate and cumbersome compartments. The period between 1908 and 1911 saw the establishment of banks inspired by the Swadeshi Movement and it was inspired local businessmen and politicians to found banks for the Indian community. A number of banks established viz., Cathalic Syrian Bank, The South Indian Bank, Bank of India, Corporation Bank, Indian Bank, Bank of Baroda, Canara Bank, Bank of Maharashtra and Central Bank of India, that survived to the present. The fervour of Swedish Movement led to the establishment of many private banks in Dakshin Kannada and Udaipur district which were unified earlier and known by the name South Canara District. Four nationalized banks started in this district and also a leading private sector bank. Hence, undivided Dashing Kannada District is known as 'Cradle of Indian Banking'.

Pre-Independence during 1938-1946 bank branch offices trebled to 3469 and deposits quadrupled to ` 962 crore. Nevertheless, the partition of India in 1947 adversely affected the economies of Punjab and West Bengal, paralyzing banking activities for months together. India's Independence marked the end of a regime of the laissez fair for the Indian banking system. The Govt. of India initiated measures to play an active role in the economic life of the nation and the industrial policy resolution adapted by the govt in 1948 envisaged a mixed economy. This resulted in greater involvement of the State in different segments of the economy including banking and finance. The major steps to regulate banking included.

**Nationalisation of banks in 1969 and 1980 :**

Despite the provisions , controls and regulations of the Reserve Bank of India, banks in India except the State Bank of India remain owned and operated by

private persons by the 1960s, the Indian banking industry had become and important tool to facilitate the development of the Indian economy.

**Liberalization in the 1990s :**

In early 1990s the then Govt of India embarked on a policy of liberalization, licensing a small number of private banks. These came to be known as new generation tech-savvy banks and included global trust bank in the first of such new generation banks to be set up which later amalgamated with oriental bank of commerce. Indusland bank, UTI Bank, ICICI bank and HDFC Bank. This move along with the rapid growth in the economy of India; revitalized the banking sector ion India which has been rapid growth with strong combination from all the three sectors of banks, viz., govt banks, private banks and foreign banks.

The next stage for the Indian banking has been set up with proposed relaxation of norms for foreign direct environment. All foreign investors in banks may be given voting rights that could exceed the gap of 10% at present. It has gone up to 74% with some restrictions. The new polling shook the banking sector completely in India. Bankers till this time were used to the 4-6 method. The new wave ushered in modern outlook and tech savvy methods of working for traditional banks. All this led to the retail boom in India. People demand more from their banks and receive more. The Indian banking sector is broadly classified into schedule banks and hone-schedule banks. All banks included in the second schedule to the Reserve Bank of India Act, 1934 are scheduled banks comprise scheduled commercial banks, scheduled cooperative banks. Scheduled cooperative banks consist of scheduled state cooperative banks and scheduled urban cooperative banks.

**Growth of banking in India of scheduled commercial banks**

| | Years | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Indicators** | 2005 | 2006 | 2007 | 2008 | 2009 | 2010 | 2011 | 2012 | 2013 |
| Commercial banks | 284 | 218 | 178 | 169 | 166 | 163 | 163 | 169 | 151 |
| Branches | 70373 | 72072 | 74653 | 78787 | 82897 | 88203 | 94019 | 102377 | 109811 |
| Population/bank | 16000 | 16000 | 15000 | 15000 | 15000 | 14000 | 13000 | 13000 | 12000 |
| Aggregate deposit : **US $** | 242 | 300 Billion | 370 Billion | 450 Billion | 540 Billion | 630 Billion | 730 Billion | 830 Billion | 950 Billion |
| Bank credit : **US $** | 150 Billion | 210 Billion | 270 Billion | 330 Billion | 390 Billion | 450 Billion | 550 Billion | 650 Billion | 740 Billion |
| Credit Deposit Ratio : **Per cent** | 63 | 70 | 74 | 75 | 74 | 74 | 76 | 79 | 79 |

By 2010 the supply product range and reach of banking in India was generally fairly matured even though reached in rural India. It still remains a challenge for the private sector and foreign banks. In quality of assets and capital adequacy, Indian banks are considered to have clean, strong and transparent balance sheets relative to other banks in comparable economies in its region. The Reserve Bank of India is an autonomous body with minimal pressure from the Govt with the growth in the Indian economy expected to be strong for quite some time, especially in its services sector- the demand for banking services, especially retail banking, mortgages and investment services are expected to b e strong. One may also expect M & AS takeovers and assets sales.

In March, 2006, Reserve Bank of India allowed Warburg pincus to increase its 10% stake in Kotak Mahindra Bank. This is the first time an investor has been allowed to hold more than 5% in a private sector bank; since the RBI announced norms in 2005 that any stake exceeding 5% in the private sector bank would need to be vetted by them. In recent years critics have charged that the non-government owned banks are too aggressive in their loan recovery efforts in connection with housing, vehicle and personal loans. There are reports that the banks loan recovery efforts have driven defaulting borrowers to suicide.

Payment bank : This bank is a new model of banks conceptualized by the Reserve Bank of India. These banks can accept a restricted deposit, which is currently limited to `1.00 lakh per customer. These banks may not issue loans or credit cards but may offer both current and savings accounts. Payment bank may issue ATM and Debit Cards and offer net banking and mobile banking facilities. The banks will be licenced as payment banks under Section 22 of the banking regulation Act, 1949. Six payment banks are working (i) Airtel payment banks ltd., (ii) Fino payments bank ltd., (iii) Indian Post payments Bank Ltd., (iv) Jio payments Bank Ltd., (v) MSDL payments Bank Ltd., (vi) PayTm payments Bank Ltd.

**Small finance banks in India :**

(i) All small finance bank ltd., (ii) Capital small finance bank ltd, (iii) Equitas small finance bank ltd., (iv) ESAF small finance bank ltd., (v) Fincare small finance bank ltd., (vi) Jana small finance bank ltd., (vii) North-East small finance bank ltd., (viii) Suryoday small finance bank ltd., (ix) Ujjivan small finance bank ltd., (x) Utakarsh small finance bank ltd.

**Banks and economic development :**

Economic development of a country depends upon an efficient financial system. The banking sector acts as a catalyst for the economic development worldwide. In a developing country and in India the commercial banks play a major role for the economic development in the financial system by capital formation. Commercial banks are accepting deposits from the general public and lending to individuals, corporate and government. Excess saving of the people using to deficit sector in the form of credit for their growth and development purposes. The deposit of the public are liability of a bank as the bank ought to pay them back along with interest either on maturity or on demand. It motivates a bank to lend vigorously in order to increase profitability. However, banks have to make sure that borrowers pay interest and principal amount from time to time so that the profitability is not affected and at the same time the quality of assets remain qualitative. In case, the borrowers do not service as per time schedule due to various reasons, the asset fails to yield income, that it does not perform and becomes a non-performing and the quality deteriorates. The non-performing assets, reduce income generating capacity of banks and ultimately erode the profits. When the amount of non-performing assets is high, the banks' revenue stream decreases. In the short term, many banks have the ability to ride out and increase in non-performing asset s, banks might have the reserves or other capital that can be used to offset the losses which will later imperil banks' health.

**Financial sector reforms :**

In the process of economic reforms initiated in 1991 had redefined the role of government in the economy in coming years. The economy will be dependent on the greater private partnership. Its development such as a changed view to development required an overhauling in the investment structure of the economy. Nowadays, private sector demands in financial market are for invisible capital. Thus, the need to restructure the whole financial system of India and it was felt that these had to be addressed to enable the financial system to play its role ushering in a more efficient and competitive economy. According to the recommendations of a committee, comprehensive reform of the banking system was introduced in the fiscal year, 1992-93. Committee recommendations on certain assumptions, which are basic to the banking industry. The assumptions illustrated that the resources of the banks

come from the general public and are held by the banks in trust that they are to be deployed for maximum benefit of the depositors. The recommendations of the Narasimham committee- (i) Ensuring degree of operational flexibility, (ii) Internal autonomy for public sector banks in their decision making process, (iii) Greater degree of professionalism in banking operation.

The government commenced a comprehensive reform process in the financial system in 1992-93 after the recommendations of Narasimaham committee. In December, 1997 he government did set-up another committee on the banking sector reform under the chairperson, M. Narasimham. The committee suggested the following major suggestions :

i) Need for stronger banking system for which mergers of the PSBS and financial institutions

ii) A-3 tier banking structure was suggested after mergers.

a) Tier-1 : To have 2 to 3 banks of international orientation.

b) Tier-2 : To have 8 to 10 banks of national orientation.

c) Tier-3 : To have a large number of local banks. The committee had suggested various recommendations to improve the Indian banking and financial system in India.

**NPA and stressed assets :**

Non-performing Assets (NPAs) are the bad loans of the banks. The criteria to identify such assets have been changing over the time. In India to follow international best practices and to ensure greater transparency, the RBI shifted to the current policy in 2004 under which a loan is considered NPA if it has not been serviced for one term (90 days). This is known as '90 days' or overdue norm. For agriculture loans the period is tied with the period of concern crops-ranging from two crop seasons to one year overdue norm. NPAs were classified into 3-types; (i) substandard -remaining NPAs for less than or equal to 12 months, (ii) doubtful-remaining NPAs for more than 12 months, and (iii) loss assets- where the loss has been identified by the bank or internal/external auditors or the RBI inspection but the amount has not been written off.

Historically, Indian banks are poor on credit recovery because of very little legal provision governing foreclosure and banking lengthy legal battles, sticky loans made to public sector undertaking, loan

**Composition of Gross Non-performing Assets ratio (GNPA) of schedule commercial banks.**

**CHART - 1**

| Year | Nationalised scheduled commercial banks | 3 YMA* | Private scheduled commercial banks | 3 YMA* | Foreign scheduled commercial banks | 3 YMA* |
|---|---|---|---|---|---|---|
| 2005 | 5.36 | --- | 3.83 | --- | 3.05 | --- |
| 2006 | 3.81 | 3.95 | 2.41 | 2.81 | 2.12 | 2.36 |
| 2007 | 2.69 | 2.85 | 2.19 | 2.36 | 1.92 | 1.99 |
| 2008 | 2.06 | 2.17 | 2.47 | 2.53 | 1.92 | 2.74 |
| 2009 | 1.75 | 1.95 | 2.92 | 2.79 | 4.37 | 3.35 |
| 2010 | 2.03 | 1.92 | 2.99 | 2.80 | 4.36 | 3.78 |
| 2011 | 1.97 | 2.22 | 2.48 | 2.52 | 2.61 | 3.24 |
| 2012 | 2.67 | 2.63 | 2.09 | 2.11 | 2.76 | 2.80 |
| 2013 | 3.24 | 3.33 | 1.77 | 1.88 | 3.04 | 3.22 |
| 201 | 4.09 | 4.20 | 1.78 | 1.88 | 3.86 | 3.37 |
| 2015 | 5.26 | 6.68 | 2.10 | 2.24 | 3.20 | 3.75 |
| 2016 | 10.69 | --- | 2.83 | --- | 4.20 | --- |

waiver and priority sector lending before 1991. Asset quality was not a major worry for the Indian Commercial banks rather than importance was on widening the banking net work, periodicity sector lending and employment generation. After the recommendations of Narasimham Committee in 1991, it was found that Indian banks are burdened with huge amount of non-performing assets due to which banks had gone financially weak. When RBI issued prudential norms in 1992-93, the concept of non-performing assets evolved as a present day issue. Indian banking industry is seriously affected by on-performing assets. Reserve bank of India from year ended 31st March, 2004 to follow global practices and high degree of transparency made it applicable for 90 days overdue norm for identifying NPA.

The above chart reveals that in case of nationalized banks (Allahabad bank, Bank of Baroda, Canara bank), the three years' moving average shows that the concentration of NPAs declined during 2006-08 and from 2009 they started to shoot up. In case of private banks (HDFC, ICICI), the movement of NPAs is more or less stable from 2008 to 2014 and after 2014 it showed an increasing trend. In case of foreign banks, there was a fluctuating trend. Interestingly, the ratio of NPAs in

## CHART - 2

(In Billion `)

| Year | Standard Advances Amount | Per cent (%) | Substandard Advances Amount | Per cent (%) | Doubtful Advances Amount | Per cent (%) | Loss Advances Amount | Per cent (%) | Gross NPAs Amount | Per cent (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2005 | 8379 | 94.6 | 110 | 1.2 | 308 | 3.5 | 59 | 0.7 | 476 | 5.4 |
| 2006 | 10926 | 96.4 | 113 | 1.0 | 246 | 2.2 | 55 | 0.5 | 414 | 3.7 |
| 2007 | 14262 | 97.4 | 143 | 1,0 | 198 | 1.4 | 48 | 0.3 | 389 | 2.7 |
| 2008 | 17786 | 97.8 | 173 | 1.0 | 192 | 1.1 | 40 | 0.2 | 405 | 2.2 |
| 2009 | 22378 | 98.0 | 203 | 0.9 | 206 | 0.0 | 41 | 0.2 | 450 | 2.0 |
| 2010 | 26375 | 97.8 | 288 | 1.1 | 254 | 0.9 | 58 | 0.2 | 599 | 2.2 |
| 2011 | 32718 | 97.8 | 350 | 1.1 | 332 | 1.0 | 65 | 0.2 | 747 | 2.2 |
| 2012 | 38255 | 97.0 | 623 | 1.6 | 409 | 1.2 | 60 | 0.2 | 1173 | 3.0 |
| 2013 | 43957 | 96.4 | 815 | 1.8 | 761 | 1.7 | 68 | 0.2 | 1645 | 3.6 |
| 201 | 49887 | 95.6 | 958 | 1.8 | 1216 | 2.3 | 99 | 0.2 | 2273 | 4.4 |
| 2015 | 53382 | 95.0 | 1054 | 1.9 | 1630 | 2.9 | 100 | 0.2 | 2785 | 5.0 |
| 2016 | 52875 | 90.7 | 2005 | 3.4 | 3232 | 5.5 | 163 | 0.3 | 5400 | 9.3 |

foreign banks has the highest gross non-performing assets rated after 2013 among all SCBs. The overall gross non-performing assets of scheduled commercial banks is showing an increasing trend.

In chart-2 the years 2005-16 have been represented by numbers from 1-12, respectively. The trend line shows that there is an increase in the GNPA after 2012.

Important reasons for non-performing assets in India are :

i) Global, national, regional financial crisis which results in erosion of margins and profits of companies, therefore stressing their balance sheet which finally results in non-servicing of interest and loan payments.

ii) The general slowdown of entire Indian economy after 2011 resulted in faster growth of NPAs.

iii) The slowdown in a specific industrial segment of companies in that area bear the heat and some may become NPAs.

iv) Unplanned expansion of corporate houses during boom period and loan taken at low rates, later brings services at high rates, therefore resulting in NPAs.

v) Severe competition in any particular market segment.

vi) Due to lack of governance and policy paralyse the time line and therefore, the speed of projects leads the loan to NPAs.

vii) The lack of bankruptcy code in India and sluggish legal system make it difficult for banks to recover these loans from both corporate and non-

corporate segments.

viii) Cheap input due to dumping leads to business loss of domestic companies-steel sector in India.

ix) A bad lending practice which is non-transparent way of giving loans and diversification of funds to unrelated business/fraud.

**Current status of non-performing assets in India**

**Impacts & effects :**

At present, NPA situation is worse than expected by the RBI as stated in its financial stability report (June, 2018). The GNPA ratio of scheduled commercial banks stood at 11.60% in March, 2018 and it could hit 12.20% by March, 2019. According to a recent report by CARE ratings agency, India has been ranked 5th with 9.9% ratio of the highest non-performing assets and is on op spat among the BAICS nations. To put the NPA problem in perspective, Indian banks stressed assets now stand at 9.6% of our GDP, or about half of budget 2018. Looked at another way, Indian banks' stressed assets equal 46 times the budget of the ministry of Health and Family Welfare and 28 times of its education budget.

The country is seeing under a huge NPA burden of over 7.33 lakh Crore as of June, 2017. The non-performing assets (NPAs) or bad loans, stood at ` 10.25 lakh Crore as on 31st March, 2018. It accounts for 11.8% of the total loans given by the banking industry. For the financial year, 2018 total bad loans of these banks rose by a whooping 3.31 lakh Crore. Among the banks group, PSBs, GNPA ratio was 15.6% in March, 2019. Under very severe stress scenario and private banks' GNPA ratio may rise from 4.0% to 5.3% in 2019.

The RBI has also stated that the 11 state-owned banks (IDBI Bank, UCO Bank, Dena Bank and others) under its prompt corrective action framework will be in a worsening of their GNPA ratio of 22.3% by the end of fiscal year, 2019 and in six of these the system-level capital to risk weighted assets ratio may come down from 13.5% to 12.8% during the same period. Growth in bank credit averaged 19% per annum between financial years 2018 and 2012, when the rapo rate was first subsequently slowed and the average growth rate came down t o 11.0% between financial years 2012 and 2017. The RBI's financial report revealed that in terms of relative share of frauds (of over ` 1.00 lakh) PSBS have a disproportionate share over 85% significantly exceeding their relative business share. A sharper rate of growth

observed in total number of frauds in 2013-02018, which is driven by a significant jump in card /internet banking related frauds.

The report further highlighted that large borrowers accounted for 54.8% of gross advances and 85.6%of GNPAs. The GNPA ratio in the industry sector rose from 19.4% to 22.8% between Sep 2017 and Mar 2918, whereas stressed advances ratio increased from 23.9% to 24.8%. The results of the stress tests show that among the considered sectors, the most severe shocks to the power sector will cause the banking system GNPAs to rise about 68 bps.

The textile and engineering sector though small in terms of total advances to that sector as compared to the infrastructure sector also exhibited considerable transmission of stress to the banking sector.

Similarly, GNPAs for housing finance assets have gone up from 1.28% in March, 2017 to 1.51% as of March, 2018. This is not the first time that Central bank has put the spot light on NPAs in the housing sector. Earlier while announcing 25% hike in the home loan limits for priority sector lending the RBI had said that the level of NPAs for the ticket size of up to ` 2.00 lakh has been high. So it has advised banks to strengthen their screening and follow up in respect of lending to his segment in particular.

**References :**


1. Google Web Site : Banking in India
2. Banking sector : Non-performing Assets (NAPs) and financial inculsion.
3. Indian Economy : Ramesh Singh


◆◆◆

# राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या ठेवी आणि अग्रक्रम क्षेत्रासाठी वित्तपुरवठ्यात झालेले बदल

**प्राची दिलीप देशपांडे**
सेवानिवृत्त, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय; नंदनवन, नागपूर

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाच्या उन्नतीत, प्रगतीत त्या देशातील बँकांचा सहभाग महत्वाचा असतो. भारतात १९६९ पूर्वी बँकींग व्यवसाय (SBI वगळता) हा पूर्णत: खाजगी क्षेत्राकडे होता. त्यामुळे भांडवलदारांकडे असल्यामुळे बँकांमधील नफ्याचा उपयोग सरकारला काहीच होत नव्हता. याच कारणासाठी तत्कालीन सरकारने काही महत्वाची उद्दिष्टे समोर ठेऊन १९ जुलै १९६९ रोजी भारतातील आघाडीच्या १४ व्यापारी बँकाचे आणि १५ एप्रिल १९८० मध्ये आणखी ६ बँकाचे राष्ट्रीयीकरण घडवून आणून देशाच्या सर्वागीण प्रगतीची दारे उघडून दिलीत. राष्ट्रीयीकरणामुळे या बँकांची मालकी व व्यवस्थापन खाजगी क्षेत्राकडून सरकारकडे हस्तांतरीत झाल्याने व्यापारी बँकाच्या व्यवस्थापन, कार्ये व नीतीत आमुलाग्र बदल घडून आला, ज्यामुळे सरकारला देशाचा सर्वागीण विकास घडवून आणता आला आणि म्हणूनच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात घेतला गेलेला हा सर्वात महत्वपूर्ण आर्थिक निर्णय म्हणून गौरविण्यात आला.

राष्ट्रीयीकरणाचा ठराव संसदेमध्ये संमत करतांना भूतपूर्व प्रधापमंत्री स्व. श्रीमती इंदिरा गांधी यांनी असे मत मांडले होते की,''प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करुन जनतेची जमा राशी-बचत एकत्रित करणे आणि तिला उत्पादनात लावणाऱ्या संस्थेस राजकीय स्वामित्वाच्या अंतर्गत आणण्याचे हे पहिले पाऊल आहे.'' भारत सरकारने १९ जुलै १९६९ रोजी एक वटहुकुम काढून भारतातील ज्या बँकांच्या ठेवी ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहेत अशा १४ मोठ्याा व्यापारी बँकाचे राष्ट्रीयीकरण केले. आणि २५ जुलै रोजी वटहुकुमातील तरतुदींचा समावेश केलेले एक विधेयक संसदेत मांडले. ९ ऑगस्ट रोजी राष्ट्राध्यक्षांनी मान्यता दिल्यानंतर त्याचे The Banking Companies (Acquisition) and Transfer of Undertakings Act 1969 याप्रमाणे कायद्यात रुपांतर झाले. या कायद्यानुसार १९६९ मधील १४ बँका आणि १९८० मध्ये आणखी ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण होऊन या बँका खाजगी भागधारकांच्या मालकीच्या न रहाता सरकारच्या मालकीच्या झाल्यात. त्याचबरोबर बँकाच्या भागधारकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई सरकारने केली. आणि त्यानंतर १९९३ मध्ये न्यू बँक इंडीयाचे पंजाब नॅशनल बँकेत विलीनीकरण करण्यात आले. त्यामुळे नंतर राष्ट्रीयीकृत बँकाची संख्या २० वरुन १९ झाली. सरकारने केलेल्या राष्ट्रीयीकरणाच्या कृतीचे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी स्वागत केले परंतु

ज्याचे निहित स्वार्थ खाजगी बँकांमध्ये गुंतलेले होते, त्यांनी मात्र सरकारच्या या निर्णयावर कडाडून टिका केली. पण वास्तविक पहाता राष्ट्रीयीकरणामुळे अधिकोषण व्यवसायाचा ९० टक्के भाग सार्वजनिक क्षेत्राच्या प्रत्यक्ष नियंत्रणात व प्रबंधनात आला. या संदर्भात आर. एच. टॉनी यांचे असे मत आहे की, ''राष्ट्रीयीकरण स्वत: एक साध्य नसून साधन आहे.'' त्याचा उद्देश अशा सेवांची व्यापकता वाढविणे आहे की, ज्यावर जनतेचे कल्याण अवलंबून आहे. त्यामुळे राष्ट्रीयीकरणाचा फायदा केवळ स्वामित्वाचे परिवर्तनाचा आधार नसून प्रत्यक्षात त्याचे मूल्यांकन राष्ट्रीय सक्षमीकरणावर पडणाऱ्या व्यावहारिक परिणामांच्या आधारावर करता येते.

**राष्ट्रीयीकरणानंतर बँकींग क्षेत्रातील काही महत्वपूर्ण बदल :**

* बँकींग धोरणात बदल – राष्ट्रीयीकरणानंतर भारताच्या नियोजीत अर्थव्यवस्था अनुसरुन बँकांनी देखिल बँक धोरणात बदल करुन स्वत:ला विकासाभिमुख केले आहे. त्यामुळे या बँका आता शेती आणि औद्योगिक क्षेत्रात मध्यम आणि दिर्घकालीन कर्जाचा पुरवठा करीत आहेत. पूर्वी १९५१ मध्ये या बँका औद्योगिक क्षेत्रात एकूण कर्जाच्या ३६ टक्के कर्ज पुरवठा करीत होत्या. त्या सद्यस्थितीत शेती आणि औद्योगिक क्षेत्रात जवळपास ६० टक्के कर्ज पुरवठा करीत आहेत.
* लहान ग्राहकांना विशेष सेवा – राष्ट्रीयीकरणापूर्वी व्यापारी बँका प्रामुख्याने श्रीमंत आणि उच्च मध्यमवर्गीय ग्राहकांनाच मोठया प्रमाणात कर्ज पुरवठा करीत असत परंतु राष्ट्रीयीकरणानंतर बँकाच्या धोरणात बदल होऊन आता त्या सर्वसामान्य जनतेला देखील उपभोग्य वस्तुंच्या खरेदीसाठी कमी व्याज दरावर सुलभ कर्ज उपलब्ध करुन देत आहेत.
* बँकांजवळील ठेवींचे प्रमाण – यासोबतच जनतेला बचतीची सवय लावण्यासाठी विविध योजना राबवून बचत ठेवी स्विकारल्या जात आहेत. परिणामत: सद्यस्थितीत बँकांजवळील एकूण ठेवीपैकी ६० टक्के ठेवी या सर्वसामान्य जनतेच्या आहेत.

राष्ट्रीयीकरणाच्या १८ वर्षा पूर्वी म्हणजे म्हणजे व्यापारी बँकामध्यील ठेवी ९०८ करोड रूपये होत्या. १९६९ मध्ये त्यामध्ये ५ पटीने वाढ होऊन ४६४६ करोड रूपये ठेवीच्या स्वरूपात होते. पुन्हा राष्ट्रीयीकरणा नंतरच्या काळात १८ वर्षानंतर १९८७ मध्ये १९६९ च्या तुलनेत ठेवींमध्ये २६ पटीने वाढ होऊन त्याची रक्कम१०७३४५ करोड रूपये झाली आणि २०१४ मध्ये ह्या ठेवींची रक्कम ८३३६१७५ करोड रूपये झाली. म्हणजे राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांच्या ठेवींमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.

यासोबतच राष्ट्रीयीकरणानंतर बँकामधील मागणी देय ठेवी आणि मुदती ठेवी ह्यामध्ये सापेक्ष बदल होत गेलेत. १९५१ मध्ये मुदती ठेवींचे प्रमाण ५० टक्के होते त्यात वाढ होऊन १९६९ मध्ये ते ७५ टक्के झाले तर डिसेंबर २०१४ पर्यंत त्यामध्ये ९० टक्क्यांपर्यत वाढ झाल्याचे दिसते. यावरून असे स्पष्ट जाणवते की राष्ट्रीयीकरणानंतर या बँकामधील मुदती ठेवींच्या वाढीचा कल जास्त आहे.

राष्ट्रीयीकरणापूर्वी बँकांनी गोळा केलेल्या ठेवींचा फायदा केवळ काही मूठभर लोकांनाच मिळत

असे. त्यामुळे सामान्य लोकांच्या हिताकडे दुर्लक्ष होत असे. परंतु राष्ट्रीयीकरणानंतर मात्र देशातील मोठया बँका काही प्रमाणात रिझर्व्ह बँकेच्या व सरकारच्या नियंत्रणाखाली आल्यानंतर देशातील अर्थव्यवस्थेला मदत करण्यासाठी बँकाचा मोठया प्रमाणात उपयोग होत आहे. १९६९ ते २०१४ या कालावधीत बँकींग क्षेत्राने अग्रक्रमी क्षत्रांना केलेल्या वित पुरवठ्याची व अग्रिमाची कल्पना पुढील तक्त्यावरुन येऊ शकते.

**राष्ट्रीयीकरणानंतर अग्रक्रमी क्षेत्रातील वित्तपुरवठ्यात झालेले बदल :**

बँकाच्या राष्ट्रीयीकरणाची जी अनेक उद्दिष्ट्ये ठरविण्यात आलेली होती. त्यापैकी एक महत्वाचे उद्दिष्ट होते ते म्हणजे ''अर्थव्यवस्थेतील आवश्यक तसेच महत्वपूर्ण (अग्रक्रमी) क्षेत्रांना आर्थिक मदत करणे.''

अग्रक्रम क्षेत्र म्हणजे शेती, लघुउद्योग, छोटे वाहतूकदार यांना संबोधिले जाते. आणि त्यानंतर किरकोळ व्यापारी, छोटे व्यावसायिक, स्वयंरोजगारातील व्यक्ती, दुर्बल घटकांचे शिक्षण, गृहनिर्माण, उपभोग्य कर्जे यांचाही समावेश अग्रक्रम क्षेत्रात करण्यात आला.

सन १९६९ पूर्वी म्हणजे राष्ट्रीयीकरणापूर्वी व्यापारी बँकांनी वित्तपुरवठ्याबाबत परंपरागत दृष्टीकोनाचा स्वीकार केला होता. त्यामुळे उद्योगधंद्यांना खेळते भांडवलाच्या गरजा भागविण्यासाठी अल्पकालीन कर्ज देत होते. परंतु उत्पादक क्षेत्राला आणि त्याचबरोबर कृषी क्षेत्राला तसेच लघु उद्योगांना वित्तपुरवठा करण्याकडे दुर्लक्ष केले होते. परिणामत: कृषी व लघु आणि कुटीर उद्योगाबाबतचे देशाचे आर्थिक नियोजन अपयशी ठरले होते. म्हणूनच बँकाच्या राष्ट्रीयीकरणानंतर इ.स. १९८० मध्ये रिझर्व्ह बँकेमार्फत बँकाच्या अग्रक्रम क्षेत्राच्या वित्तपुरवठ्याबाबत पुढील काही मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले.

१. बँकाच्या एकूण पतपुरवठ्यात अग्रक्रम क्षेत्राचा पतपुरवठा ४० टक्क्यांइतका असला पाहिजे.
२. अग्रक्रम क्षेत्राच्या पतपुरवठ्यापैकी किमान ४० टक्के पतपुरवठा कृषी क्षेत्राला असला पाहिजे.
३. एकूण अग्रक्रम क्षेत्रातील पतपुरवठ्यापैकी ५० टक्के हिस्सा कृषी व अनुषंगिक क्षेत्रातील दुर्बल घटकांना मिळाला पाहिजे.
४. ग्रामीण कारागीर, कुटीर उद्योजक, ग्रामोद्योग आदींना लघुउद्योगांना दिलेल्या कर्ज पुरवठ्यापैकी किमान १२.५ टक्के हिस्सा मिळाला पाहिजे.
५. बँक पतपुरवठ्यापैकी १२ टक्के हिस्सा निर्यातदारांना दिला जावा.

रिझर्व्ह बँकेच्या या मार्गदर्शक तत्वामुळे राष्ट्रीयीकरणानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकाच्या वित्तपुरवठ्याच्या दृष्टीकोनात गुणात्मक आणि संख्यात्मक सुधारणा घडवून आणण्यावर भर देण्यात आला. तसेच आतापर्यत दुर्लक्षित झालेल्या या अग्रक्रमी क्षेत्रांना वित्तपुरवठा करण्यासाठी विविध योजना तयार करण्यात आल्या.

**पायलट प्रोजेक्ट :**

राष्ट्रीयीकरणानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाने पायलट योजनेतंर्गत कमी व्याज दराने लघु व कुटीर उद्योनांना कर्ज देण्यास सुरवात केली. यंत्रसामुग्री

खरेदी करण्यासाठी ७ वर्षे मुदतीची कर्जे देण्यात आलीत. यानंतर स्टेट बँकेसोबतच इतर २० राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकानी सुध्दा लघु उद्योगांना कर्ज देण्याची जबाबदारी सरकारतर्फे सोपविण्यात आली होती.

गेल्या ४५ वर्षामध्ये राष्ट्रीयीकरणानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी अग्रक्रमी क्षेत्राला केलेला वित्तपुरवठा पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. १**

**राष्ट्रीयीकरणानंतर बँकांचा अग्रक्रम क्षेत्राला वित्तपुरवठा**

(रक्कम करोड रुपयांमध्ये)

| | {ks= | t w 1969 | t w 1987 | ekpZ 2014 |
|---|---|---|---|---|
| 1 | 'ksh | 162 ¼5-4%½ | 10666 ¼18-8½ | 702541 ¼29-8½ |
| v | ÁR;{k foRri qjoBk | 40 ¼1-3½ | 9300 ¼16-4½ | 525652 ¼17-3½ |
| c | vÁR;{k foRri qjoBk | 122 ¼4-1½ | 1366 ¼2-4½ | 176889 ¼12-5½ |
| 2 | y?kmn|ks | 251 ¼8-3½ | 9309 ¼16-4½ | 593410 ¼14-4½ |
| 3 | brj vxzØe {ks= | 28 ¼0-9½ | 5525 ¼9-7½ | 290596 ¼7-0½ |
| | , dw.k vxzØeh {ks= vxze | 441 ¼14-6½ | 25500 ¼44-9½ | 1602907 ¼39-0½ |
| | vxzØeh {ks=kP;k [kkR;kaph l[a;k ¼yk[kke/;s½ | 260 | 280-76 | & |
| | , dw.k opl ÁR; | 3017 ¼100-0½ | 132579 ¼100-0½ | 4110591 ¼100-0½ |

संदर्भ - www.economicsdicussion.net

वरील तक्त्यावरुन राष्ट्रीयीकरणानंतर बँकांनी अग्रक्रमी क्षेत्रात केलेल्या वित्तपुरवठ्यातील बदलाबाबतचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आढळून येतात.

१. सार्वजनिक क्षेत्रातील बँकाच्या अग्रक्रमी क्षेत्रातील कर्ज घेणाऱ्या खातेधारकांमध्ये वाढ झाली आहे. जून १९६९ मध्ये ही संख्या २.६० लाख होती. ती मार्च २०११ मध्ये ४८३.३९ लाख झाली.

२. कृषी प्रत्यय पुरवठा जून १९६९ मध्ये १६२ करोड रुपये होता (एकूण बँक प्रत्ययाच्या ५.४ टक्के) त्यात वाढ होऊन मार्च २०१४ मध्ये ७०२५४१ करोड रुपये (एकूण बँक प्रत्ययाच्या २९.८ टक्के) झाला.

३. कृषी क्षेत्राला (थेट) प्रत्यक्ष वित्तपुरवठा जून १९६९ मध्ये फक्त ४० करोड रुपये होता (एकूण बँक प्रत्ययाच्या १.३ टक्के) त्यात वाढ होऊन मार्च २०१४ मध्ये ५२५६५२ करोड रुपये झाला. (एकूण बँक प्रत्ययाच्या १७.३ टक्के)

४. लघू उद्योगांना जून १९६९ मध्ये २५१ करोड

रुपये कर्ज पुरवठा केला होता (एकूण बँक प्रत्ययाच्या ८.३ टक्के) यामध्ये राष्ट्रीयीकरणानंतर विशेषत्वाने वाढ होऊन मार्च २०१४ पर्यत ५९३४१० करोड रुपयांचे कर्ज पुरवठा करण्यात आला. (एकूण बँक प्रत्ययाच्या १४.४ टक्के)

५. अग्रक्रमी क्षेत्र जसे – रस्ते, पाणी, वाहतूकदार, किरकोळ व्यापारी, छोटे व्यावसायिक स्वय रोजगारी व्यक्ती दुर्बल घटकाचे शिक्षण, उपभोग्य कर्जे, गृहनिर्माण कर्जे यासारख्या अग्रक्रमी क्षेत्रांना जून १९६९ मध्ये फक्त २८ करोड रुपयांचा वित्तपुरवठा करण्यात आला (एकूण बँक प्रत्ययाच्या ०.९ टक्के) त्यात लक्षणीय वाढ होऊन मार्च २०१४ पर्यत २९०५९६ करोड रुपयांचा वित्तपुरवठा करण्यात आला. (बँक प्रत्ययाच्या ७ टक्के)

६. सार्वजनिक बँकानी अग्रक्रमी क्षेत्राला केलेला प्रत्ययपुरवठ्या जून १९६९ मध्ये ४४१ करोड रुपये होता. त्यात वाढ होऊन २०१४ पर्यत तो १६०२९०७ करोड रुपये झाला. म्हणजेच अग्रक्रमी क्षेत्राचे एकूण प्रत्ययातील प्रमाण १९६९ मध्ये १४.६ टक्के होते ते वाढून ३९ टक्के झाले.

यावरुन अग्रक्रम क्षेत्राला वित्तपुरवठा करण्यात राष्ट्रीयीकृत बँकांनी महत्वपूर्ण भूमिका बजावल्याचे दिसते. अर्थात वित्तपुरवठ्यातील ही वाढ मुख्यत:–

अ. मोठ्या प्रमाणात ठेवी एकत्र झाल्यामुळे

ब. मुद्रेच्या परिमाणात वाढ झाल्यामुळे झालेली आहे.

**जागतिकीकरणाच्या काळातील राष्ट्रीयीकृत बँकांपुढील आव्हाने :**

१९८० च्या दशकात भारताची आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावलेली होती की १९९१ ला जगातील कर्जबाजारीपणाला भारताचा तिसरा क्रमांक होता, तसेच विदेशी चलन साठ्याची टंचाई यामुळे ६७ टन सोने आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीला विकण्याची नामुष्की भारतावर आली. या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी तसेच जागतिक वित्तीय संस्थांच्या दबावामुळे आणि जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार केला की ज्यात विदेशी गुंतवणूकीला प्रोत्साहन, जागतिक वित संस्थांकडून कर्ज घेण्याची मुभा, रुपयाचे अवमुल्यन आणि परिवर्तनीयता, भांडवल बाजारात वाढ इत्यादींचा समावेश होता. या सर्वाचा परिणाम राष्ट्रीयीकृत बँकाच्या धोरणावर देखील झाला आणि त्यानुसार त्यांनाही आपल्या उद्दिष्टांमध्ये तसेच कार्यामध्ये कालानुरुप योग्य बदल स्विकारावे लागले अर्थात हे सर्व बदल स्विकारतांना त्या काळात या बँकासमोर ही फार मोठी आव्हाने निर्माण झाली होती. जसे– बँकांचे संगणीकरण, बँकांना एकत्रित जोडणे, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, त्याचबरोबर बँकामध्ये नवीन सुविधा उपलब्ध करुन देऊन खातेधारकांची व ठेवीदारांची तशी मानसिकता तयार करणे आणि या सर्वासाठी करावा लागणारा अफाट खर्च ही सर्व आव्हाने पेलणे बँकांना देखिल कठीण होऊ लागले त्यातच बँकामधून VRS (स्वेच्छ निवृत्ती) ची योजना सुरु झाल्याने त्याचा बँकांच्या कार्यप्रणाली वर तसेच सरकारवर देखील बराच आर्थिक दबाव आला. शासनाच्या अनेक नवीन–नवीन योजना राष्ट्रीयीकृत बँकांच्या माध्यमातून

राबविण्याचे धोरण ठरविण्यात आले आणि याचाही काही अंशी परिणाम बँकाच्या कार्यप्रणालीवर होऊन बँकाची लाभप्रदता व सुरक्षितता धोक्यात येऊ लागली.

**सारांश :**

अशाप्रकारे राष्ट्रीयीकरणानंतर सद्य:स्थितीत व्यापारी बँका भारतीय अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान करीत आहेत. राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकाच्या धोरणात बदल झाला असल्याचे केवळ नफा कमविणे हा आता व्यापारी बँकाचा उद्देश राहिला नसून त्या बरोबरच सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने अग्रक्रमी क्षेत्राला मोठ्याा प्रमाणात वित्तपुरवठा करण्याचे धोरण बँकानी स्विकारले आहे. परिणामत: मोठे उद्योग, लघु उद्योग, शेती क्षेत्र, इतर अग्रक्रमी क्षेत्रे जसे- रस्ते, पाणी, छोटे व्यापारी, व्यावसायिक स्वय रोजगारी (उपक्रमी), शिक्षण, गृह कर्जे, उपभोग कर्जे यासारख्या क्षेत्रांना मोठ्याा प्रमाणावर वित्तपुरवठा करण्यात आला आणि यातून देशाच्या आर्थिक विकासाला सुनियोजित पध्दतीने चालना मिळाली आहे हे मात्र निश्चीतच उल्लेखनीय आहे.

एकंदरीत, बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा पर्याय निवडून पाच दशके उलटून गेल्यानंतर आता या सर्वच बाबींचा विचार होणे आवश्यक आहे. स्विकारलेल्या धोरणाची दिशा आणि गती याचे आकलन होण्यासाठी एवढा कालावधी हा पुरेसा असून आता त्यातील काही त्रुटी या विशेषत्वाने जाणवू लागल्याने पून्हा यातील काही बँकांचे एकत्रीकरण करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. तेव्हा आता या प्रयत्नांना कसे यश मिळते हे येणारा काळच ठरवेल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. दामाजी बी. एच.(२०१६) : आधुनिक बँकिंग, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.

२. कानेटकर मेधा (२०१५) : भारतीय बँकींग प्रणाली, श्री साईनाथ प्रकाशन.

३. राजनकर प्रकाश (२०१४) : भारतीय बँकींग, पिंपळापुरे प्रकाशन.

४. कानेटकर, काकडे, पाचपोर (२०१८) : स्थूल अर्थशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन.

५. मिश्रा जे. पी.(२०१६) : अर्थशास्त्र, साहित्य भवन, आग्रा.

6. Desai vassal (2017) : Small - scale Industries and entrepreneurship, in the twenty First Century Himalaya publishing House, 2017.

7. Internet website.


◆◆◆

ISSN 2320-0197

# भारतातील व्यापारी बँकांपुढील आव्हाने – एक टीप

**लाजवंती आर. टेंभुर्णे**
भारतीय महाविद्यालय,
मोर्शी.(जि.अमरावती)

भारताच्या विकासामध्ये कृषी आणि उद्योगांची भूमिका ज्याप्रमाणे महत्वाची आहे. त्याचप्रमाणे तो प्रत्येक देशाच्या भांडवलाच्या व्यवस्थेवर सुध्दा अवलंबून आहे. देशाची भांडवली व्यवस्था प्रबळ असल्यास त्या देशाचा विकास झपाटयाने होतो. भारतीय अर्थव्यवस्थेत बँकाची भूमिका महत्वपूर्ण ठरते. आधुनिक अर्थव्यवस्थेत विकासाबरोबरच भांडवलाची सुरक्षितता हा फार महत्वाचा प्रश्न आहे. भारतातील बँकाची भूमिका अर्थिक विकासातील महत्वाची असून ती वारंवार बदलत गेलेली दिसून येते. आजच्या या बदलत्या स्थितीत मुक्त अर्थव्यवस्थेत आणि जागतिककीकरणा मध्ये बँकाची भूमिका काय आहे हे बघणे महत्वाचे ठरते. जगातील कोणत्याही देशाच्या प्रगतीमध्ये बँकाचा सिंहाचा वाटा आहे.

**स्वातंत्र्यपूर्व कालावधीत बँकींग व्यवसाय :**

भारतातील बँकींग व्यवस्था ही ब्रिटीश बँकींगच्या दिशेने चालत आली आहे. भारत ब्रिटनच्या अधिपत्याखाली असल्याने बँकींग ही साहाजिकच व्यापारी स्वरूपाचे राहिले यामुळे आपल्या बँकींगचा विकास व्यापारावर आधारित झाला. १७७० साली अलेक्झांडर ॲन्ड कंपनीने कलकत्याला 'बँक ऑफ हिंदुस्थान' नावाची भारतातील पहिली बँक स्थापन केली. पण सुमारे वीस वर्ष काम केल्यानंतर ही बँक बंद पडली. बँकींग आणि व्यापाराचे व्यवहार करणाऱ्या अनेक संस्था निर्माण झाल्या कंपनीने १८०६ ला बँक ऑफ कलकत्ता, १८०९ ला बँक ऑफ बंगाल तर १८४० ला बँक ऑफ बॉम्बे नावाने ती प्रेसीडसी बँकाची स्थापना केली, या कालखंडात बँकावर जवळजवळ नियंत्रणे नव्हती. विनिमयाचा अभाव, बेजबाबदार प्रशासन यामुळे बँका मोठया प्रमाणावर अडचणीत आल्या. याचा मोठा फटका ठेवीदारांना बसला, याचा परिणाम होऊन सरकारने लक्ष घालून या अधिकोषण व्यवहारावर नियंत्रण ठेवणारी अधिकोषण विनियमित करण्यासाठी १९४९ मध्ये 'बँकींग विनियमन कायदा' अंमलात आणला. यातील तरतुदीनुसार नवीन बँका काढणे अगर शाखा उघडण्याकरिता रिझर्व बँकेची परवानगी घ्यावी लागत असे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील बँकींग व्यवसाय :**

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर बँकींग क्षेत्रात एक नविन पर्व सुरू झाले. स्वकीय सरकारने आपल्या देशाची मोठ्या प्रमाणावर औद्योगिक वाढ करण्याचे ठरविले, परंतु एवढया उद्योग धंद्याला कर्जपुरवठा करणे बँकांना शक्य नव्हते. देशात पंचवार्षिक योजनामुळे फार मोठे बदल घडुन येऊ लागले त्याचा परिणाम बँकाच्या

व्यवहारावर होणे अटळ होते. ही परिस्थिती १९५१ पासून अस्तित्वात आली. १९५१ ते १९६९ हा कालखंड म्हणजे नियोजनपूर्वक विकास होय. यात सरकारी धोरणानुसार सर्व मुलभूत उद्योग सरकारी क्षेत्रात घेतले गेले. यामुळे औद्योगिक क्षेत्राला मोठया प्रमाणावर पैशाची गरज भासू लागली. या कालखंडात बँकींग व्यवहारात व्यापाराचे असलेले महत्व कमी होऊन औद्योगिक व्यवहाराचे प्रमाण वाढले. खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना मोठया प्रमाणावर पैसा उपलब्ध करून देणे हे बँकींग व्यवहाराचे एक प्रमुख धोरण बनले. बँकाच्या एकूण कर्जाच्या व्यवहारापैकी औद्योगिक क्षेत्राला ८०% पर्यंत कर्जपुरवठा करण्यात आले. बँकाचे व्यवहार फक्त श्रीमंत व उच्च व मध्यम वर्गाभोवतीच केंद्रित झाले. सामान्य माणूस बँकापासून दूरच राहिले. म्हणजेच बँक व्यवसायाचे क्षेत्र याकाळात उद्योगाभिमुख बनले.

**बँकाच्या राष्ट्रीयकरणानंतरच्या बँक व्यवसाय :**

बँक व्यवसायामध्ये निर्माण झालेल दोष व राजकीय गरज लक्षात घेऊन १९ जुलै १९६९ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी १४ प्रमुख बँकाचे राष्ट्रीयीकरण केले. त्याकरिता ५० कोटीच्या ठेवीचा निकष वापरण्यात आला. या क्रांतीकारक निर्णयामुळे देशातील बँक व्यवसायाचा ८५% अधिक भाग सरकारी एकाधिकार खाली गेला. या राष्ट्रीयीकरणाने बंद व्यवसायाचा चेहरामोहराच बदलून गेला. राष्ट्रीयीकरणानंतर भारतातील बँकाच्या शाखाविस्तारा संबंधीचा भौगोलिक दृष्टिकोन बदलला. म्हणजेच ग्रामीण भागात प्राधान्य देण्याचा दृष्टिकोण अंगीकारला गेला. १९६९ मध्ये व्यापारी बँकाच्या एकूण शाखापैकी २२% शाखा ग्रामीण भागात होत्या. १९६९ पूर्वी बँकींग व्यवसायात प्रादेशिकदृष्टया असमतोल होता तो कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकाच्या एकूण ठेवीत देखील झपाटयाने वाढ झाली. लघुउद्योग, कृषी, घरबांधणी, प्रवास, वाहन खरेदी, शिक्षण यासाठी कर्ज उपलब्ध होऊ लागली. राष्ट्रीयीकरणामुळे बँकांच्या शाखांचे जाळे ग्रामीण भागात पसरू लागले.

राष्ट्रीयीकरणानंतरच भारतीय बँकानी शेती क्षेत्राला कर्जे देण्यास खऱ्या अर्थाने सुरूवात केली. बँक ठेवीतील वाढ, कर्जातील वाढ, गुंतवणूकीत यामुळे व्यापारी बँकाच्या उत्पन्नात वाढ झाली. गैरव्यवहाराचे नियंत्रण आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण कमी करणे समाजवादी समाजरचना स्थापन करणे, कार्यक्षमतेत सुधारणा करणे, व्यापारी बँक शाखांचा विस्तार करणे अशा अनेक प्रकारची कार्ये या काळात पुर्णत्वास गेलेली दिसून येतात.

**जागतिकीकरणानंतरचा कालखंड :**

भारतात १९९१ मध्ये जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. आंततराष्ट्रीय निधी कडून भारताने कर्ज घेतल्यानंतर भारताने उदारीकरण खाजगीकरण व जागतिकीकरणाचे धोरण स्विकारले. भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. मुक्त अर्थव्यवस्था म्हणजे मुक्त अधिकोषण हे ओघानेच आले. उदारीकण म्हणजे शासनाचा बाजारातील हस्तक्षेप टप्प्याटप्प्याने कमी करत जाणे होय. भारतातील बँकाची खालावलेली स्थिती सुदृढ करणे यासाठी रिझर्व बँकेने वेळोवेळी समित्या नेमल्या आणि त्यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे उपाय योजन्यात सुरूवात झाली. १९९१ मध्ये भारतातील बँकाची रचना त्याचे संगठण व कार्यपध्दती यांचा अभ्यास करण्यासाठी 'नरसिंहम समिती' ची नियुक्ती करण्यात आली. या समितीच्या शिफारशी फार

महत्वाच्या होत्या. यामुळे बँकींग क्षेत्रात त्या सक्षम होण्यासाठी त्यांना स्वायत्ता देणे, व्याजदराचे नियंत्रण, रोख राखीव निधीचे प्रमाण कमी करणे, अशा शिफारशी केल्या. या शिफारशीमुळे शासकीय क्षेत्रामध्ये बँकेची गुंतवणूक वाढली. एकूण कर्जामध्ये प्राधान्य क्षेत्राच्या दिल्या जाणाऱ्या कर्जाचे प्रमाण वाढले. व्यापारी बँकांनी ग्रामीण व अर्धनागरी भागात अधिकोषण कार्यामध्ये वाढ केली. नफा मिळविण्याची क्षमता कमी झाली असे बदल घडून आले. राष्ट्रीयकृत बँका वर असलेले शासनाचे नियंत्रण काढून त्यांना न्याय स्वायत्ता देणे योग्य राहिल असे नरसिंहम समितीने सुचविले.

सन १९९८ मध्ये भारत सरकारने बँकींग क्षेत्रातील सुधारणाचा आढावा घेण्यासाठी पुन्हा श्री नरसिंहम यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी समिती नियुक्त करण्यात आली. यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातल्या २८ बँकाची पुर्नरचना करण्यात आली. मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणांचा पुन्हा पाठपुरावा करून जागतिक स्तरावरील बँक व्यवहारातील संकेत आपल्या बँकांनी अंमलात आणावे अशी सूचना केली. तसेच बँकांच्या आर्थिक स्थितीचा विचार करून वेळोवेळी बदलही केल्या गेले. सर्वात मोठा बदल रिझर्व बँकेने आपल्या अधिकोषण क्षेत्रावरील नियंत्रण संदर्भात केला. बँकाना आपल्या व्यवहारा संदर्भात योग्य ते निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले गेले. कर्जव्यवहारावर असलेली यापूर्वीची नियंत्रणे बहुतांश रद्द करण्यात आली. बँकांना नविन शाखा उघडण्यात परवानगी देण्यासंबंधीचे नियमही शिथील व उदार केले गेले. थोडक्यात आता र्निनियंत्रित बँकींग युगास सुरूवात झाली होती. बँकींग क्षेत्रात आता एकूणच मुक्त स्पर्धेत वातावरण निर्माण झाले आहे.

जागतिकीकरणाची सर्वात महत्वाचे घटना म्हणजे जागतिक व्यापार संघटना होय. यापूर्वीच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक करारात सेवा क्षेत्राचा समावेश केला गेला नव्हता, परंतु नव्या करारात तो केला गेला. बँकांना मोठया प्रमाणावर आणि सातत्याने गुंतवणूक करावी लागते.

**बँकापुढील आव्हाने :**

बँकींग व्यवसायामध्ये सतत बदल होत आहे व याचा परिणाम म्हणून बँकापुढे अनेक समस्या निर्माण होतात. २१ व्या शतकात बँकाना प्रामुख्याने पुढील आव्हानांना सामोरे जावे लागेल.

**१) माहिती तंत्रज्ञानाचे आव्हान** : बँकींग व वित्तीय क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानात आमुलाग्र बदल झाल्यामुळे बँकापुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. या नविन तंत्रज्ञानाचा अवलंब, नागरी सहकारी बँका करू शकतील आणि किती हा महत्वाचा प्रश्न आहे. ज्या बँका या नवीन तंत्रज्ञानाचा बँकीग व्यवसायात वापर करणार नाहीत त्यांच्या समोर अनेक समस्या उभ्या राहतील.

**२) व्यावसायिक स्पर्धेचे आव्हान :** जागतिकी –करणामुळे बँक व्यवसायामध्ये मोठया प्रमाणावर स्पर्धा सुरू झाली आहे. विदेशी बँका भारतात मुक्तपणे येऊ शकतात व त्यांच्या कडील अद्ययावत तंत्रज्ञानाने आपल्या बँकाशी गळेकापू स्पर्धा करतील या बँकाचे आर्थिक सामर्थ फार मोठे असल्याने त्यांच्याही स्पर्धा करणे बँकांना अवघड जाईल.

**३) ग्राहकांच्या अपेक्षा वाढीचे आव्हान**: माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात ग्राहक जागरूक व हुशार झालेला असल्यामुळे त्याचा वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करणे हे एक आव्हान बँकेपुढे आहे. त्यामुळे बँकाचा खातेदारांशी प्रत्यक्ष संपर्क मोठया प्रमाणावर कमी होईल. केवळ खातदारांशी निष्ठा व संपर्क या बळावर उभ्या असलेल्या बँक भविष्यकाळात

अडचणीत येतील.

**४) ग्राहक सेवेचे आव्हान** : आज सेवा व्यवसायाला अत्यंत महत्व प्राप्त झाले असून सेवा व्यवसायाचा विकास व प्रगती ही प्रामुख्याने ग्राहकांना दिलेल्या सेवेवर अवलंबून आहे. बँकाना अधिकाधिक ग्राहक मिळविण्यासाठी व आहे ते ग्राहक टिकविण्यासाठी ग्राहकांना त्वरीत व चांगल्या प्रकारची सेवा देणे आवश्यक आहे. कारण बँकींग व्यवसायाचा समावेश हा उद्योगामध्येच होतो.

**५) वाढत्या थकीत कर्जाचे आव्हान :** भारतीय बँकापुढे थकीत कर्जे ही बँकापुढील मोठी समस्या आहे. यांची पाळेमुळे मक्तेदार भांडवलशाही व्यवस्थेमध्ये आहे. ही समस्या केवळ सार्वजनिक बँकापुरतीच सिमीत नाही तर भारतातील खाजगी बँकाचे गुणोत्तर सुध्दा जास्त आहे. बँकांनी अशा लोकांना कर्जे दिली आहेत की जेथून कर्जफेड थांबली आहे. नीरव मोदी व मेहूल चौकशी यासारखे लोक पंजाब नॅशनल बँकेच्या घोटयाळयात दिसून येतात. किंगफिशर एअर लाईन्सला दिलेल्या कर्जाचा यात मोठा वाटा आहे. यामुळे स्टेट बँकेच्या अनुत्पादक मालमत्तेची रक्कम ३७ हजार १५६ कोटी रू. आहे.

**६) सरकारचा वाढता खर्च :** सरकारचा वाढता खर्च आणि महसुलात मात्र वाढ न होणे यामुळे वित्तिय तूर प्रमाणाबाहेर वाढत आहे. मध्येमध्ये रूपयाची होत असलेली घसरण, औद्योगिक मंदी यामुळे देशाची अर्थव्यवस्था अध:पतनाकडे जाईल लक्ष देणे गरजेचे आहे.

**७) अपारंपरिक क्षेत्रे** : पुढील काळात बँकाची नफ्याची कल्पना केंद्रस्थानी राहणार त्यामुळे बँकाना उत्पन्न वाढीकरता निरनिराळे मार्ग शोधून काढावे लागतील शेअर्सची खरेदी विक्री करणे, डेरिव्हेटीव्हज वगैरे सारखे अनेक मार्ग अवलंबावे लागतील. स्पर्धा वाढल्याने बँकाचे कामकाज अतिशय कुशलतेने चालविण्याचे आणि वेळोवेळी तत्परतेने निर्णय घेण्याचे मोठे आव्हान भविष्यकाळात बँकासमोर उभे राहणार आहे.

व्यापारी बँकाच्या कामगिरीचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, बँकींग उद्योग एका नवीन वळणावर येऊन ठेपला आहे. व्यापारी बँकाच्या राष्ट्रीयीकरणानंतर एका बाजूला बँकाची प्रगती होत असली तरी दुसरीकडे भारतीय अधिकोष क्षेत्रावर विदेशी बँकाचा पगडा बसण्याची शक्यता लक्षात घेऊन काही बँकानी एकत्र येणे नविन तंत्रज्ञाविज्ञान आत्मसात करण्यारिता परस्परात सहकार्य करणे आवश्यक आहे. बँकाचे उत्पन्न वाढत असले तरीही अनेक बँकाचे नफ्याचे प्रमाण समाधानकारक नाही. बँकींग व्यवस्था हे अर्थव्यवस्था प्रवाही ठेवणारे हृदय आहे. बँका जर सुदृछ व कार्यकुशल असतील तरच ही बाब खरी ठरेल पण आज बँकापुढे सारखे मोठे आव्हान पुढे ठाकले आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१) डॉ.कायंदे पाटील गंगाधर, प्रा.सांगळे बाबासाहेब, प्रा.रकीबे हरिभाऊ (२००३) : भारतीय बँकीग व्यवस्था, चैतन्य पब्लीकेशन, नाशिक, जुलै .

२) कानेटकर मेधा, बोधनकर सुधीर (२०१०) : भारतीय बँकीग प्रणाली, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३) पाटील के.के. (२०१२) : भारतीय बँकींग- एक दृष्टीक्षेप, मराठी अर्थशास्त्र अध्यक्षीय भाषण, ३६ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन दि. २२,२३,२४ नोव्हेंबर.

४) खरे सी.प. (२०११) : वित्तिय अरिष्टचे स्वरूप व उपाय, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

५) बँकींग महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा मुख्य परिक्षा के सागर पब्लीकेशन, पुणे, २००६

६) रंजन काळे (२०१९) : भारतीस अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे, जाने.


◆◆◆

# व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण ते विलीनीकरण

**राजेश रामासा चव्हाण**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
स्व. छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालय,
अचलपूर कॅम्प, (जि.अमरावती)

**प्रस्तावना :**

अर्थव्यवस्था सक्षमपणे चालविण्यासाठी बँकींग प्रणाली ही आवश्यक मानली जाते. सद्य:स्थितीत उद्योग आणि वाणिज्य ह्या संस्था बँकांच्या भोवती फिरतांना दिसतात कारण बँकांकडून या सर्व क्षेत्राच्या गरजा पूर्णपणे भागविल्या जातात. त्यामध्ये व्यापारी बँका विविध कार्य पार पाडतात. अशा तऱ्हेने आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक वृद्धी आणि विकास घडवून आणण्यासाठी बँका महत्वाची भूमिका पार पाडत असतात. बँक ही एक अशी संस्था होय की, जी लोकांच्या ठेवी स्वीकारते आणि हा पैसा गरजू लोकांना व कर्ज संस्थांना म्हणून देते थोडक्यात ठेवींचे रक्षणकर्ता म्हणून काम करतांना बँका बचतीला प्रोत्साहन देऊन तिचे रूपांतर गुंतवणूकीत करतात. भारतीय बँकींग नियमन कायदा १९४९ कलम (ब) आणि (क) नुसार भारतात बँक व्यवसाय करणारी कंपनी म्हणजे होय.

१७७० साली सुरु झालेली बँक ऑफ हिंदुस्तान ही भारतातील पहिली बँक होय.१८२६ साली ही बँक बंद पडली.जून १८०६ मध्ये कलकत्ता येथे सुरु झालेली बँक ऑफ कलकत्ता हिचे नाव बदलून १८०९ मध्ये बँक ऑफ बेंगाल ठेवले गेले. तत्कालीन ब्रिटीश सरकारने १८४० मध्ये बँक ऑफ बॉम्बे आणि १८४३ मध्ये बँक ऑफ मद्रास सुरु केल्या.

१९२१ मध्ये या तिन्ही बँका एकत्र करुन इम्पीरियल बँक ऑफ इंडिया बनवली गेली. १९५५ मध्ये राष्ट्रीयकरणानंतर या बँकेचे नाव बदलून भारतीय स्टेट बँक केले गेले.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) व्यापारी बँकाची राष्ट्रीयीकरणाची कारणे अभ्यासणे

२) व्यापारी बँकाच्या विलीनीकरणाची परिस्थिती अभ्यासणे

**बँकांचे राष्ट्रीयीकरण :**

१ फेब्रुवारी १९६९ व्यापारी बँकावर सामाजिक नियंत्रणला दण्यात आले. व्यापारी बँकाची मालकी व व्यवस्थापन खाजगी भागधारकांकडेच ठेवून राष्ट्राच्या विशिष्ट आर्थिक व सामाजिक उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी त्याचे सरसकट राष्ट्रीयीकरण करण्याऐवजी त्याच्यावर सरकारने विविध नियंत्रणे लावण्याच्या पध्दतीस सामाजिक नियंत्रण म्हणतात. याबाबत निर्णय तत्कालीन उपपंतप्रधान व अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी घेतला होता.

१९ जुलै १९६९ रोजी श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान असतांना १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण

राष्ट्रपतींच्या वटहुकूमाने करण्यात आले. यावेळेस त्या बँकांचे किमान भांडवल ५० कोटी रु. असावे हा निकष लावण्यात आला होता. या राष्ट्रीयीकरणाच्या वेळी सर्वात जास्त ठेवी सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या होत्या. तर सर्वात शेवटची बँक, बँक ऑफ महाराष्ट्र होती.

याव्यतिरिक्त १५ एप्रिल १९८० ला आणखी सहा बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. हे राष्ट्रीयीकरण करतांना १४ मार्च १९८० रोजी किमान २०० कोटी रु. भांडवल असावे हा निकष लावण्यात आला होता. त्या सहा बँका पुढीलप्रमाणे.

१) आंध्र बँक २) न्यु बँक ऑफ इंडिया
३) ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स
४) कॉरपोरेशन बँक ५) पंजाब अँड सिंध बँक
६) विजया बँक

तथापी न्यु बँक ऑफ इंडियाचे विलीनीकरण ४ सप्टेंबर १९९३ पंजाब नॅशनल बँकेत करण्यात आल्यामुळे सध्या राष्ट्रीयीकृत बँकाची संख्या १९ आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया राष्ट्रीयकृत बँक असली तरी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची एजन्ट मानली जाते. यामुळे सार्वजनिक क्षेत्रात १९ बँका होत्या. आयडीबीआय लिमिटेडचा समावेश करता राष्ट्रीयकृत बँकाची संख्या २० झाली आहे.

**राष्ट्रीयीकरणाची कारणे :**

१) आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण दुर करणे
२) अग्रक्रम क्षेत्राला कर्जपुरवठा उदा. कृषी, लघुउद्योग, ग्रामीण विकास, इ.
३) ग्रामीण भागात बँकाचा विस्तार
४) प्रादेशिक समतोल साधने, इ.

**राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांचे व्यवस्थापन :**

सन १९४९ च्या बँकिंग कंपनीज (ॲक्विझिशन ॲण्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकिंग्ज) ॲक्ट या कायद्यान्वये चौदा राष्ट्रीयीकृत बँकांच्या व्यवस्थापनासाठी शासनाने एक योजना तयार केली. प्रत्येक राष्ट्रीयीकृत बँकेचे व्यवस्थापन संचालक मंडळाकडून केले जाते. संचालक मंडळातील संचालकांची संख्या १५ असून त्याशिवाय दोन पूर्णवेळ संचालक आणि त्यापैकी एक व्यवस्थापक संचालक म्हणून कार्य करतो. सर्व संचालकांची नेमणूक मध्यवर्ती सरकारकडून रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याने केली जाते. त्यापैकी एक संचालक राष्ट्रीयीकृत बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधिक संघटनेने तयार केलेल्या ३ कर्मचाऱ्यांच्या यादीतून मध्यवर्ती सरकारकडून नेमला जातो. एक संचालक राष्ट्रीयीकृत बँकेच्या कामगार नसलेल्या नोकरांमधून मध्यवर्ती सरकारकडून रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याने नेमला जातो. ठेवीदारांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी शासनाकडून एक संचालक नेमला जातो. शेतकरी, कामगार आणि कारागीर यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी तीन संचालकांची नेमणूक केली जाते. बँक व्यवसाय क्षेत्रातील प्रत्यक्ष व्यवहारांचे विशेष ज्ञान असलेल्या व्यक्तींमधून पाच संचालकांची नेमणूक केली जाते. एक संचालक रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांमधून नेमला जातो, एक संचालक मध्यवर्ती सरकारच्या अधिकाऱ्यांमधून नेमला जातो.

संचालक मंडळाच्या अध्यक्षाची नेमणूक मध्यवर्ती सरकारकडून रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याने केली जाते. व्यवस्थापक संचालक हा राष्ट्रीयीकृत बँकेचा प्रमुख कार्यकारी अधिकारी म्हणून कार्य करतो. संचालक मंडळाकडून प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यावर जी कार्ये सोपविली जातात ती कार्ये

त्या अधिकाऱ्याला करावी लागतात. राष्ट्रीयीकृत बँकेचा अध्यक्ष म्हणून आणि व्यवस्थापक संचालक म्हणून कार्य करण्यासाठी मध्यवर्ती सरकार रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याने एकाच व्यक्तीची नेमणूक करू शकते.

संचालक मंडळाची एक व्यवस्थापक समिती असते. संचालक मंडळ जी कार्ये व्यवस्थापक समितीकडे सोपविते ती कार्ये व्यवस्थापक समितीला करावी लागतात. संचालक मंडळ विशिष्ट कार्यासाठी अन्य समितीची नेमणूक करू शकते.

**राष्ट्रीयीकरणानंतर झालेले बदल :**

- बँकांचा भौगोलिक व कार्यात्मक विस्तार हे बँक राष्ट्रीयीकरणाचे उद्दिष्ट होते.
- १९६९-२००६ या कालावधीत ग्रामीण शाखांचे प्रमाण १७.५ टक्के वरुन ४२.१ टक्के एवढे वाढले. (सुचित बँकाकडून उघडलेल्या शाखांचे ग्रामीण भागातील प्रमाण मात्र ४९.१ टक्के आहे.)
- १९६९-२००६ या काळात एका शाखेमागे लोकसंख्येचे प्रमाण ६३८०० वरुन १५००० एवढे सुधारले.
- २००६ पर्यंत व्यापारी बँकाच्या शाखांची संख्या ६९६२० होती. त्यापैकी ३०७५० ग्रामीण भागातील शाखा होत्या. १९६९ मध्ये व्यापारी बँकाचे एकुण शाखा ८२६० होत्या. म्हणजे ३३ वर्षात ८०० टक्के ने वाढ झाली.
- १९६९ मध्ये प्राधान्य क्षेत्रात केलेल्या १४ टक्के पतपुरवठ्यापैकी शेती क्षेत्राचा वाटा १ टक्केपेक्षा कमी होता.
- २००० मध्ये प्रधान क्षेत्रास होणाऱ्या ४० टक्के पतपुरवठ्यापैकी शेती क्षेत्राच्या पतपुरवठ्याचे प्रमाण १५.८ टक्के होते. प्रत्यक्षात १८ टक्के पतपुरवठ्याचे उद्दिष्ट आहे.

**भारतातील व्यापारी बँका :**

भारताच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वपूर्ण घटक म्हणून व्यापारी बँकांकडे पहिले जाते. बँकामुळे शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण इ. क्षेत्रांच्या भांडवल विषयक गरजा पूर्ण होतात. बँकांमुळे विविध राष्ट्रातील देण्याघेण्याचे व्यवहार पूर्ण होतात. प्रत्ययाची निर्मिती आधुनिक अर्थव्यवस्थेतील व्यापारी बँकांचे एक खास वैशिष्ट्ये आहे.

**अ) सन १९४७-६९ या कालखंडातील व्यापारी बँकांची आढावा.**

- खाजगी क्षेत्रातील बँका नफा तोटा विचारात घेऊनच शाखा उघडत होत्या त्यामुळे शाखा विस्तार मंद गतीने झाला.
- प्राधान्यक्रम क्षेत्रांना होणाऱ्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण अत्यंत कमी होते.
- भारताची मदार कृषीवर असतानाही कृषी व त्या संबंधीत क्षेत्रांना १९४७-१९६९ या कालावधीत व्यापारी बँकांच्या एकूण कर्जव्यवहारात कृषी क्षेत्राचा वाटा जेमतेम 2% राहिला.
- व्यापारी बँकांच्या व्यवहारांमुळे खाजगी उद्योगपतीकडे आर्थिक संपत्तीचे केंद्रीकरण होत होते.
- ग्रामीण भागात कर्जपुरवठा योग्य प्रकारे व्हावा व ग्रामीण भागातील बचती आकर्षित करणे या कामी व्यापारी बँकांनी गांभीर्याने प्रयत्न केले नाहीत.
- बँका व त्यांच्या शाखा मुख्यत: शहरातच

निर्माण झाल्या.

- व्यापारी बँकांची प्रगती प्रादेशिक असमतोलात भरच टाकच होती.
- बँकांच्या कर्जव्यवहारात वाढ झाल्यामुळे पतचलनाची निर्मिती वाढून भाववाढीला प्रोत्साहन मिळाले.
- सरकारी रोख्यातील गुंतवणूकीपेक्षा अन्य मान्यताप्राप्त रोख्यातील गुंतवणूकीत वाढ झाली.
- आकर्षक ठेव योजनांमुळे बँकांच्या ठेवीच्या प्रमाणात वाढ झाली.
- आर्थिकदृष्ट्या कमकुवत बँकांचे एकत्रिकरण केल्यामुळे सक्षम बँकिंग व्यवस्था उभारण्यास हातभार लागला.

**ब) बँकांचे राष्ट्रीयीकरण - सन १९६९ पासूनची स्थिती :**

- खाजगी क्षेत्रातील व्यापारी बँकांच्या नफ्याच्या तुलनेत राष्ट्रीयीकृत बँकांच्या नफ्यात काही वर्षी घट झालेली दिसते.
- अग्रक्रम क्षेत्रांच्या उन्नतीसाठी बँकांना एकूण कर्जाच्या ४० प्रतिशत कर्ज द्यावी लागली. त्याचा परिणाम बँकांच्या कर्ज वसुलीवर झाल्याचे दिसते.
- बँकांच्या ठेवी मोठ्या प्रमाणात वाढल्या असल्याचे प्रथम दर्शनी दिसत असले तरी त्यांच्या स्वनिधीच्या प्रमाणात म्हणावी तशी वाढ दिसत नाही. त्याचे प्रमाण एकूण खेळत्या भांडवलाशी २.५ ते ३ प्रतिशत इतके कमी दिसते.
- राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांचा ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा इ.स. १९८५ पर्यंतच्या काळात निम्न प्रतीचा होता.
- राष्ट्रीयीकरणानंतर बँकेतील कर्मचाऱ्यांच्या संघटना अधिक सक्रिय झालेल्या आहेत परिणामी राष्ट्रीयीकृत बँकांच्या कार्यावर बंधने येऊ लागलीत.
- बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर दैनंदिन कारभारात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष राजकारणाचा हस्तक्षेप होत आहे.
- जागतिक स्तरावर अनेक बड्या बँकांशी स्पर्धा करावयाची असल्याने बँकांनी स्वत:च्या आकारमानाचे भान ठेवणे आवश्यक आहे.
- राष्ट्रीयीकरणापूर्वी व्यापारी बँकांचे नफा कमविणे हे उद्दिष्ट होते. आता त्यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा दृष्टिकोन ठेवला आहे.
- आर्थिक विकासासाठीच्या योजनांसाठी राष्ट्रीयीकृत बँका वित्तपुरवठा करतील अशी अपेक्षा होती परंतु प्रत्यक्षात या बँकांनी शासकीय रोखे खरेदीत फारसा सहभाग घेतला नाही.
- पतपुरवठा विस्तार अति किंवा अल्प असा करण्यात आला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा पत विस्तार अद्यापही काळजी पूर्वक होत नाही.
- पत-अंतर (Credit Gap) भरून काढण्यात राष्ट्रीयीकृत बँका अपयशी ठरलेल्या आहेत. सुरळीतपणे होणारी पतप्रववाहाची पद्धती निर्माण करण्यात बँकांना यश आलेले नाही.

**थकीत कर्जे :**

भारतीय बँकिंग या विषयाचा आवाका अत्यंत मोठा आहे. त्या अनुषंगाने काही महत्वपूर्ण बाबींचा विषयावर प्रकाश टाकण्यासाठी विचार

करण्यात आला आहे.

भारतीय बँक प्रणालीचा प्रवास विविध अवस्थातून झाला आहे. सन १९६९ पूर्वी म्हणजे राष्ट्रीयीकरणापूर्वी बँका केवळ नफा मिळविण्याच्या हेतूने प्रेरित होत्या. राष्ट्रीयीकरणानंतर सामाजिक दायित्वाच्या भूमिकेतून कार्य करण्याची जबाबदारी बँकांवर आली. परिणामस्वरूप बँकिंग शाखा व्यवसायाचा झपाट्याने विकास झाला. पण गुणात्मकतेचा बँकांना विसर पडला. स्वातंत्र्यानंतर विशेषत: विकासाच्या अवस्थेत मोठ्या प्रमाणावरील औद्योगिकीकरणासाठी भांडवल पुरवठा करतांना बँका नफ्याच्या अभिलाषेने अमर्यादित स्वरूपात पतनिर्मिती करू लागल्यात त्यातून चलनवाढी सारख्या समस्यांनी अर्थव्यवस्था हादरावयास सुरूवात झाली. परिणाम स्वरूप रिझर्व्ह बँकेला ती जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी बँकां संबंधीच्या कायद्यांची आवश्यकता भासली.

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकींग आज एका अभूतपूर्व पेचप्रसंगातून जात आहेत. हा पेचप्रसंग आहेत भांडवल पर्याप्तता निधी ज्यांचे मुळ आहेत वाढत्या थकीत कर्जात सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात थकीत कर्जाची रक्कम १५०% ने वाढून ३,२३,२१६ कोटी रूपयावर गेली आहेत. यामुळे मार्च २०१६ मध्ये ९ बँका तोट्यात गेल्या तर मार्च २०१७ मध्ये ८ बँका तोट्यात गेल्या. मार्च २०१६ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा नफा १,३६,२७५ कोटी रूपये होता. पण थकीत कर्जासाठी केलेल्या तरतुदीमुळे निव्वळ तोटा १८,४१७ कोटी रुपयावर गेला तर मार्च २०१७ मध्ये १,५८,९८२ कोटी रुपये नफा होता तर निव्वळ तोटा झाला ११,३८८ कोटी रुपये एवढा होता. स्टेट बँक ही सुद्धा या प्रक्रियेत तोट्यात गेलेली दिसून येते. यातील काही बँकाचे थकित कर्जाचे प्रमाण २१ प्रतिशत पर्यंत जाऊन पोहचले आहेत.

रिझर्व्ह बँकेने नुकताच वित्तीय स्थर्य अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात असे नमुद केले आहे की, एकूण कर्ज रकमेतील ५५ प्रतिशत कर्ज ही बँकांनी मोठ्या उद्योगांना दिली आहेत. त्यापैकी ८६ प्रतिशत कर्ज थकित आहेत. स्वत: रिझर्व्ह बँकेनेच १२ मोठी थकित कर्ज निश्चित केली आहेत. त्यामध्ये २५३७२९ कोटी रुपये एवढी मोठी रक्कम आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील बँकातून थकित कर्जाचा प्रश्न आ वासून उभा आहेत. आणि तो मोठ्या उद्योगाकडील थकित कर्जामुळेच झाला आहेत.

**विलीनीकरण :**

दोन किंवा अधिक बँकांनी एकत्र येवून बँकीग व्यवहार करणे म्हणजे विलीनीकरण होय. दोन बँका विलीन झाल्यावर लहान बँकेची ओळख पूर्णपणे पुसली जाते. आता विलीन झालेल्या बँका राष्ट्रीय पातळीवरच्या असल्या तरी त्यांची प्रादेशिक पातळीवर एक वेगळी ओळख होती.

विलीनीकरण झाल्यानंतर बँकांच्या शाखाची संख्या कमी होते. मोठ्या बँकेत लहान बँक विलीन झाल्यानंतर त्यांची ओळख राहत नाही. त्यामुळे मोठ्या बँकेच्या कामाच्या संस्कृतीशी लहान बँकाना जुळवून घ्यावे लागते.

**विलिनीकरणाची कारणे :**

सार्वजनिक बँकाचा एन.पी.ए. मोठा आहे. लहान बँका रिझर्व्ह बँकेच्या देखरेखेखाली आहेत. त्यांना स्वतंत्र्य अस्तित्व टिकवणे अवघड होणार आहे. एन.पी.ए. वाढले असतांना बँकाकडे पुरेसे

भांडवल नसते. त्यामुळे ज्या मोठ्या बँका आहेत त्यात लहान बँकांचा समावेश केला तर एकत्रितपणे भांडवल जमा होते व ते योग्य पध्दतीने वापरता येईल. केंद्राच्या विलिनीकरणाच्या महत्वपुर्ण निर्णयानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकाची संख्या आता २७ वरुन १२ वर येणार आहे.

दुसरे म्हणजे सार्वजनिक बँकांचे प्रश्न अनेक होते. अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर कमी झाला आहे. लघुउद्योग ठप्प झाले आहेत. गेल्यावर्षी शेतकी व्यवसायासमोर अनेक अडचणी होत्या. या सगळ्याचा परिणाम बँकावर होतो. आणि लहान बँकावरही त्याचा बोजा होतो. आर्थिक दबावामुळे सरकारला विलीनीकरणाचा निर्णय घ्यावा लागला आहे.

**तक्ता क्र. १**

**अधिकोष गटानुसार गैरप्रकार संख्या व त्यांची एकुण राशी**

| [illegible] | 2017-18 | | 2018-19 | |
|---|---|---|---|---|
| | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | 2885 (48.8) | 382608.7 (92.9) | 3766 (55.4) | 645094.3 (90.2) |
| [illegible] | 1975 (33.4) | 24782.5 (6.0) | 2090 (30.7) | 55151.4 (7.7) |
| [illegible] | 974 (16.5) | 2560.9 (0.6) | 762 (11.2) | 9553.0 (1.3) |
| [illegible] | 12 (0.2) | 1647.0 (0.4) | 28 (0.4) | 5534.1 (0.8) |
| [illegible] | 65 (1.1) | 61.9 (0.0) | 115 (1.7) | 75.2 (0.0) |
| [illegible] | 3 (0.1) | 9.0 (0.0) | 39 (0.6) | 21.1 (0.0) |
| [illegible] | 2 (0.0) | 0.4 (0.0) | 1 (0.0) | 0.2 (0.0) |
| [illegible] | 5916 (100.0) | 411670.4 (100.0) | 6801 (100.0) | 715429.3 (100.0) |

स्त्रोत : आर.बी.आय. रिपोर्ट २०१८-१९

तक्ता क्र. १ वरून असे दिसून येते कि, २०१८-१९ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील अधिकोषाची गैरप्रकार ही सर्वाधिक ३७६६ असून त्याची एकूण राशी ६,४५,०९४.३ मिलीयन रूपये म्हणजेच एकूण

राशीच्या ९०.२ प्रतिशत इतकी आहे. २०१७-१८ मध्ये गैरप्रकारांची संख्या २,८८५ होती. ती २०१८-१९ मध्ये वाढून ३,७६६ झाली म्हणजेच ३०.५३ टक्के गैरप्रकारात वाढ झाली तसेच २०१७-१८ मध्ये ३,८२,६०८.७ रु. मिलियन राशी होती. ती वाढून २०१८-१९ मध्ये ६,४५,०९४.३ रु. मिलियन झाली. म्हणजे यातील वाढ ही ६८.६० टक्के दिसुन येते. याचा अर्थ असा कि, सार्वजनिक क्षेत्रातील अधिकोषाचा गैरप्रकार राशी फार जास्त आहे. त्यामुळे केंद्र सरकारने विलीनीकरणाचा निर्णय घेतला असे म्हणता येईल.

अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी दुसऱ्या टप्प्यातही अनेक उपाययोजना जाहीर करतांना अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी देशातील काही राष्ट्रीयकृत बँकांच्या एकत्रीकरणाची महत्वपूर्ण घोषणा केली. देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलीयन डॉलर्स करण्याच्या सरकारच्या निर्धाराचा पुनरुच्चार करताना यासाठी कृति आराखडा तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

१० राष्ट्रीयीकृत बँकांच्या विलीनीकरणातून ४ मोठ्या बँका निर्माण केल्या जाणार आहेत. ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि युनायटेड बँक ऑफ कॉमर्सचे पंजाब नॅशनल बँकेत विलीनीकरण करण्यात येणार असून, यातून १७ लाख ९५ हजार कोटी डॉलर्सची देशातील दुसरी सर्वात मोठी बँक तयार होणार आहे. सिंडीकेट बँकेचे कॅनरा बँकेत विलीनीकरण करुन, १५ लाख २० हजार कोटी रुपये भांडवलाची देशातील चौथ्या क्रमांकाची बँक उभी होईल. युनियन बँक, आंध्र बँक आणि कार्पोरेशन बँक यांच्या एकत्रिकरणातून १४ लाख ६० हजार कोटी भांडवलाची देशातील पाचवी मोठी बँक विकसित झालेली असेल. इंडीयन बँक आणि अलाहबाद बँक यांच्या एकत्रीकरणातून ८ लाख ०८ हजार कोटी रुपये भांडवलाची सातवी बँक तयार होणार आहे. देशात आतापर्यत २७ सार्वजनिक क्षेत्रातील बँका होत्या. बँकांच्या विलीनीकरणानंतर ही संख्या १२ वर आली आहे. ९ लाख ३० हजार कोटी भांडवलाची बँक ऑफ इंडीया, तसेच ४ लाख ६८ हजार कोटी भांडवलाची सेंट्रल बँक ऑफ इंडीया नेहमीप्रमाणे कार्यरत राहणार आहे.

बँकांच्या विलीनीकरणातून देशातली तिसरी मोठी बँक

देना बँक, विजया बँक आणि बँक ऑफ बडोदा या देशातल्या तीन मोठ्या बँकाच्या विलिनीकरणाची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटलींनी केली होती. या तिन्ही बँकाच्या विलिनीकरणानंतर जन्माला येणारी बँक ही देशातली तिसरी मोठी बँक असेल असंही जेटलींनी जाहीर केले. विलीनीकरणाच्या प्रक्रियेत बँकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला कमी केले जाणार नसल्याचही जेटलींनी स्पष्ट केलंय.

गेल्या अर्थसंकल्पात सरकारने सार्वजनिक बँकांचे विलीनीकरण करण्याचं धोरण जाहीर केलं. होतं. सरकारी बँकांची वाढती थकित कर्जे, देशाच्या कानाकोपऱ्यात बँकिंग सेवा पोचवण्यासाठी असलेला आग्रह या पार्श्वभूमीवर हे विलीनीकरण करण्यात आल्याचं समजते.

यापूर्वी देशातील सहा सहकारी आणि एका महिला बँका एसबीआयमध्ये विलिनीकरण करण्यात आल्या. या मोठ्या बदलानंतर भारतीय स्टेट बँकने दशकभरातील जवळपास १३०० शाखांचे नाव आणि आयएफएससी कोड बदललेत. तशी स्टेट बँक ऑफ इंडियाने शाखांचे बदललेले नांव

आणि आयएफएससी कोडची यादी जाहीर केली होती. त्यात शाखांची जुनी नावं आणि बदललेले आयएफएससी कोड नमूद करण्यात आले होते.

या बँकांचे विलीनीकरण करीत आंतरराष्ट्रीय पातळीवरील बँका तयार करण्याची भारत सरकारची योजना आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील ४ ते ५ बँका तयार करण्यात येतील. सहा बँकाचे विलीनीकरण करण्यात आल्याने भारतीय स्टेट बँक जगातल्या ५० मोठ्या बँकामध्ये सहभागी झाली आहे.

आता सार्वजनिक क्षेत्रात फक्त १२ बँका

१) भारतीय स्टेट बँक २) पंजाब नॅशनल बँक युनाइटेड बँक ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स

३) बँक ऑफ बडोदा, देना बँक, विजया बँक

४) कॅनरा बँक, सिंडिकेट बँक

५) युनियन बँक ऑफ इंडिया, आंध्रा बँक, कॉरपोरेशन बँक ६) बँक ऑफ इंडिया

७) इंडियन बँक, इलाहबाद बँक

८) बँक ऑफ महाराष्ट्र ९) सेंट्रल बँक ऑफ इंडिया

१०) इंडियन ओवरसीज बँक

११) पंजाब एंड सिंध बँक १२) युको बँक

**सारांश :**

भारतात सार्वजनिक बँकांचा एन.पी.ए. अधिक होत आहे. दिवसेंदिवस गैरप्रकारांची संख्या वाढत आहे. तसेच सार्वजनिक बँकांचे अनेक प्रश्न आहेत. यासर्वांचा परिणाम बँकींग व्यवसायावर झालेला दिसून येतो त्यामुळेच सरकारने सार्वजनिक बँकाचा विलीनीकरणाचा निर्णय घेतलेला आहे असे वाटते.

**संदर्भ ग्रथ :**


१) डॉ.जहागीरदार दि.व्यं.,आर्थिक जगत,खंड२ व ३.

२) डॉ. कैलास पाटील (२०१२) : 'भारतीय बँकींग- एक दृष्टीक्षेप' - अध्यक्षीय भाषण मराठी अर्थशास्त्र परिषद, नोव्हेंबर.

३) डॉ.देसाई स.श्री., डॉ.भालेराव निर्मला (२०१४) : 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन

४) डॉ. देशपांडे विनायक (२००९) : वित्तीय संस्था व बाजार.

५) रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया अहवाल २०१८-१९

६) दैनिक तरुण भारत- ऑगस्ट २०१९


◆◆◆

**परिशिष्ट : बँकांच्या विलीनीकरणानंतरची स्थिती :**

| [illegible] | | | | |
|---|---|---|---|---|
| | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | 11,82,224 | 4,04,194 | 2,08,106 | 17,94,526 |
| [illegible] | 5,06,194 | 1,71,549 | 73,123 | 7,50,867 |
| [illegible] | 6,76,030 | 2,32,645 | 1,34,983 | 10,43,659 |
| [illegible] | 6,992 | 2,390 | 2,055 | 11,437 |
| [illegible] अनुपात | 6.55% | 5.93% | 8.67% | 6.61% |
| [illegible] | 65,116 | 21,729 | 13,804 | 1,00,649 |

| [illegible] | | | | |
|---|---|---|---|---|
| | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | 7,41,307 | 3,98,511 | 3,19,616 | 14,59,434 |
| [illegible] | 3,25,392 | 1,78,690 | 1,35,048 | 6,39,130 |
| [illegible] | 4,15,915 | 2,19,821 | 1,84,568 | 8,20,304 |
| [illegible] | 4,292 | 2885 | 2432 | 9609 |
| [illegible] | 6.85% | 5.73% | 5.71% | 6.30% |
| [illegible] | 37,262 | 20,346 | 17,776 | 75,384 |

| [illegible] | | | |
|---|---|---|---|
| | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | 10,43,249 | 4,77,046 | 15,20,295 |
| [illegible] | 4,44,216 | 2,17,149 | 6,61,365 |
| [illegible] | 5,99,033 | 2,59,897 | 8,58,930 |
| [illegible] | 6,310 | 4,032 | 10,342 |
| [illegible] | 5.37% | 6.16% | 5.62% |
| [illegible] | 58,350 | 31,535 | 89,885 |

| [illegible] | | | |
|---|---|---|---|
| | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | 4,29,972 | 3,77,887 | 8,07,859 |
| [illegible] | 1,87,896 | 1,63,552 | 3,51,448 |
| [illegible] | 2,42,076 | 2,14,335 | 4,56,411 |
| [illegible] | 2,875 | 3,229 | 6,104 |
| [illegible] | 3.75% | 5.22% | 4.39% |
| [illegible] | 19,604 | 23,210 | 42,814 |

ISSN 2320-0197

# Amalgamation of Public Sector Banks

**Madhuri Pradeep Lele**
Assistant Professor in Commerce (Retired)
Shri Binzani City College, Nagpur.

## INTRODUCTION :

After entire merger exercises, the next-generation PSBs of India can now be ranked according to their business size, as follows :

| Sr.No | BANK NAME | PSB RANK BY SIZE |
|---|---|---|
| 1 | State Bank of India | 1st Largest |
| 2 | Punjab National Bank | 2nd Largest |
| 3 | Bank of Baroda | 3rd Largest |
| 4 | Canara Bank | 4th Largest |
| 5 | Union Bank of India | 5th Largest |
| 6 | Bank of India | 6th Largest |
| 7 | Indian Bank | 7th Largest |
| 8 | Central Bank of India | 8th Largest |
| 9 | Indian Bank | 9th Largest |
| 10 | Central Bank of India | 10th Largest |
| 11 | Indian Overseas Bank | 11th Largest |
| 12 | UCO Bank | 12th Largest |
| 13 | Punjab and Sind Bank | 13th Largest |

**Canara Bank + Syndicate Bank**

| | Canara Bank | Syndicate Bank | Amalgamated bank |
|---|---|---|---|
| Total business (in crore ₹) | 10,43,249 | 4,77,046 | 15,20,295 |
| Gross advances (in crore ₹) | 4,44,216 | 2,17,149 | 6,61,365 |
| Deposits (in crore ₹) | 5,99,033 | 2,59,897 | 8,58,930 |
| CASA ratio | 29.18% | 32.58% | 30.21% |
| Domestic branches | 6,310 | 4,032 | 10,342 |
| PCR | 41.48% | 48.83% | 44.32% |
| CET-I ratio | 8.31% | 9.31% | 8.62% |
| CRAR ratio | 11.90% | 14.23% | 12.63% |
| Net NPA ratio | 5.37% | 6.16% | 5.62% |
| Employees | 58,350 | 31,535 | 89,885 |


© BCCL 2019. ALL RIGHTS RESERVED.

March 2019 financials

| Anchor bank | Amalgamating bank(s) | Business size* | PSB rank by size | CBS |
|---|---|---|---|---|
| Punjab National Bank | Oriental Bank of Commerce<br>United Bank of India | ₹ 17.94 lakh cr. | 2nd largest | Finacle |
| Canara Bank | Syndicate Bank | ₹ 15.20 lakh cr. | 4th largest | iFlex |
| Union Bank of India | Andhra Bank<br>Corporation Bank | ₹ 14.59 lakh cr. | 5th largest | Finacle |
| Indian Bank | Allahabad Bank | ₹ 8.08 lakh cr. | 7th largest | BaNCS |
| SBI | Amalgamated earlier | ₹ 52.05 lakh cr. | | |
| Bank of Baroda | Amalgamated earlier | ₹ 16.13 lakh cr. | | |

| Bank | Business size* |
|---|---|
| Bank of India | ₹ 9.03 lakh cr. |
| Central Bank of India | ₹ 4.68 lakh cr. |

| Bank | Business size* |
|---|---|
| Indian Overseas Bank | ₹ 3.75 lakh cr. |
| UCO Bank | ₹ 3.17 lakh cr. |
| Bank of Maharashtra | ₹ 2.34 lakh cr. |
| Punjab and Sind Bank | ₹ 1.71 lakh cr. |




* March 2019 financials

## Big bank theory

Investors and bankers will be keen to see if the merger becomes a template for further mergers among PSBs given asset quality issues plaguing several of them

| Parameters | Bank of Baroda | Vijaya Bank | Dena Bank | Amalgamated Bank |
|---|---|---|---|---|
| Total business (in cr. ₹) | 10,29,811 | 2,79,674 | 1,72,937 | 14,82,422 |
| Gross advances (in cr. ₹) | 4,48,327 | 1,22, 348 | 69917 | 6,40,592 |
| Deposits (in cr. ₹) | 5,81,484 | 1,57,326 | 1,03,020 | 8,41,830 |
| CASA ratio (%) | 35.52 | 24.91 | 39.80 | 34.06 |
| Branches (domestic) | 5,502 | 2,129 | 1,858 | 9,489 |
| Return on Assets (annualised) (%) | 0.29 | 0.32 | (-2.43) | (-0.02) |
| Net NPA ratio (%) | 5.40 | 4.10 | 11.04 | 5.71 |
| Employees | 56,361 | 15,874 | 13,440 | 85,675 |

Source: Ministry of Finance

**Benefits of Merger :**

* Competitive : The consolidation of PSBs helps in strengthening its presence globally, nationally and regionally.
* Capital and Governance : The government's intention is not just to give capital but also give good governance.Hence, post consolidation boards will be given the flexibility to introduce the chief general manager level as per business needs. They will also recruit chief risk officer at market-linked compensation to attract the

best talent.

* Efficiency : It has the potential to reduce operational costs due to the presence of shared overlapping networks. And this enhanced operational efficiency will reduce the lending costs of the banks.
* Technological Synergy: All merged banks in a particular bucket share common Core Banking Solutions (CBS) platform synergizing them technologically.

**Core Banking Solutions :**

* Core Banking Solutions (CBS) can be defined as a solution that enables banks to offer a multitude of customer-centric services on a 24x7 basis from a single location, supporting retail as well as corporate banking activities. The centralisation thus makes a "one-stop" shop for financial services a reality. Using CBS, customers can access their accounts from any branch, anywhere, irrespective of where they have physically opened their accounts. The customer is no more the customer of a Branch. He becomes the Bank's Customer.
* Self-Sufficiency : Larger banks have a better ability to raise resources from the market rather than relying on State exchequer.
* Recovery: The loan tracking mechanism in PSU banks is being improved for the benefit of customers.
* Monitoring: With the number of PSBs coming down after the process of merger - capital allocation, performance milestones, and monitoring would become easier for the government.

**Challenges :**

* Decision Making : The banks that are getting merged are expected to see a slowdown in decision making at the top level as senior officials of such banks would put all the decisions on the back-burner and it will lead to a drop in credit delivery in the system.
* Geographical Synergy : During the process of merger, the geographical synergy between the merged banks is somewhat missing. In three of the four merger cases, the merged banks serve only one specific region of the country.However, the merger of Allahabad Bank (having a presence in East & North region) with the Indian Bank (having a presence in South) increases its geographical spread.
* Slowdown in Economy: The move is a good one but the timings are not just

apt. There is already a slowdown in the economy, and private consumption and investments are on a declining trend. Hence, there is a need to lift the economy and increase the credit flow in the short-term, & this decision will block that credit in the short-term.

* Weak Banks : A complex merger with a weaker and under-capitalized PSB would stall the bank's recovery efforts as the weaknesses of one bank may get transferred and the merged entity may become weak. As per studies conducted until now most of the mergers done in the past, have proved to be an overall success for the weaker banks although there are no concrete parameters to verify this observation. Hence going by the track record merger and acquisition in Indian banking have been fruitful for the Indian Economy.The Indian Banks too did not stay aloof from this wave of mergers and acquisitions (M&A). Initially banks were merged to save non-performing banks or non efficient banks but as time evolved the system too evolved. In the recent times mergers and acquisitions have also been made on grounds of business growth, profitability and organizational restructure.

**History of Mergers in Indian Banking:**

Mergers of banks began in India in the 1960s in order to bail out the weaker banks and protect the customer interests. After that in post liberalization period the quest to create an Indian bank that would be in the league of global giants had been continuing since 1990. Moving on the path of creating one of the largest global banks, the government had approved the merger of five associate banks with SBI in February 2017. Later in March, the Cabinet approved merger of BMB also.Merger & Nationalization during the period from 1961-1969: The period is called pre-nationalization period because in 1969 the government nationalized 14 private banks. As many as 46 mergers took place mostly of private sector banks in order to revive the poorly performing banks which proved to be quite a successful move for the underperforming banks.The period from 1969-1991: The period was called post-nationalization period. It saw six private banks being nationalized in 1980. In this period 13 mergers took place mostly between public and private sector banks.

The post liberalization period, which stretches from 1991-2015, saw major economic reforms initiated by Government

of India. Many new policies were framed. Greater FDI and foreign investment was allowed which saw resurgence in Indian Banking. As many as 22 mergers took place - some to save weaker banks and some for the sake of synergic business growth.

**Bank Mergers (1993-2004) :**

The merger of Oriental Bank of Commerce with Global Trust bank in 2004 saved the latter after its net worth had wiped off and also handed OBC a million depositors and a decent market in South India. Mergers of Punjab National Bank (PNB) with the then eroded New Bank of India (NBI) in 1993-94 and that of Benaras State bank Ltd with Bank of Baroda in 2002 also proved to be life saving for the weaker bank.

**Bank Mergers & Consolidation 2008-2010 :**

SBI first merged State Bank of Saurashtra with itself in 2008. Two years later in 2010, State Bank of Indore was merged with it. The board of SBI earlier approved the merger plan under which SBBJ shareholders got 28 shares of SBI (Re.1 each) for every 10 shares (Rs10 each) held. Similarly, SBM and SBT shareholders got 22 shares of SBI for every 10 shares.Post the merger, the SBI was in the process to rationalize its branch network by relocating some of the branches to maximize reach. This, according to SBI helped the bank optimize its operations and improve profitability. SBI had approved separate schemes of acquisition for State Bank of Patiala and State Bank of Hyderabad. There was no proposal for any share swap or cash outgo as they were wholly-owned by the SBI.

**Consolidation of Banks (2015-2017) -**

This phase saw five associates of SBI and Bhartiya Mahila Bank getting merged in SBI. The vision was to have strong banks rather than having large number of banks. This resulted in SBI being one amongst the 50 largest banks in the world.Union Cabinet decided to merge all the remaining five associate banks of State Bank Group with State Bank of India in 2017. After the Parliament passed the merger Bill, the subsidiary banks ceased to exist and the State Bank of India (Subsidiary Banks) Act, 1959 and the State Bank of Hyderabad Act, 1956 were repealed.

Five associates and the Bharatiya Mahila Bank became the part of State Bank of India (SBI) beginning April 1, 2017. This has placed State Bank of India among the top 50 banks in the world. The five associate banks that were merged into State Bank of India were- State Bank of

Bikaner and Jaipur (SBBJ), State Bank of Hyderabad (SBH), State Bank of Mysore (SBM), State Bank of Patiala (SBP) and State Bank of Travancore (SBT). The other two Associate Banks namely State Bank of Indore and State Bank of Saurashtra had already been merged with State Bank of India. After the merger, the total customer base of SBI increased to 37 crore with a branch network of around 24,000 and around 60,000 ATMs across the country.

The government had merged Dena Bank and Vijaya Bank with Bank of Baroda, creating the third-largest bank by loans in the country in 2018.

**Mega Merger of Banks 2019-**

With the mega merger announced on August 30, 2019, ten public sectors banks will be reduced into four large banks. The four sets of banks are to be created out of Canara Bank and Syndicate Bank merger; Indian Bank and Allahabad Bank merger; Union Bank of India, Andhra Bank and Corporation Bank merger; and the bank to be created after merger of Punjab National Bank, Oriental Bank of Commerce and United Bank of India.India has 12 Banks Now The biggest overhaul in public sector banks has left India with only 12 banks now instead of 18 before the decision. According to the Government this decision of making large entities will make the Indian banks capable of meeting the higher funding needs of the economy and will help in acquiring the global scale.

| Banking order (Largest to Smallest) | Business in Lakhs of crore Rupees | Market Share |
|---|---|---|
| State Bank of India | 52.1 | 22.5 |
| PNB+OBC+United Bank | 17.9 | 7.7 |
| HDFC Bank | 17.5 | 7.6 |
| Bank of Baroda | 16.1 | 7 |
| Canara + Syndicate Bank | 15.2 | 6.6 |
| Union+Andhra+Corporation Bank | 14.6 | 6.3 |
| ICICI Bank | 12.7 | 5.5 |
| Axis Bank | 10.6 | 4.6 |
| Bank of India | 9.0 | 3.9 |
| Indian + Allahabad Bank | 8.1 | 3.5 |

Rs. 55000 Crore Recapitalization Plan with Mega Merger. The Finance Minister of India has also announced Rs.55,000 Crore recapitalization plan for the banks formed after merger. Besides, recapitalization will also be infused to the six other banks which are not the part of this merger.

| Banking Recapitalization (Highest to Lowest) | Amount of Recapitalization announced (Rs. in Crores) |
|---|---|
| Punjab National Bank | 16,000 |
| Union Bank of India | 11,700 |
| Bank of Baroda | 7,000 |
| Canara Bank | 6,500 |
| Indian Overseas Bank | 3,800 |
| Central Bank of India | 3,300 |
| UCO Bank | 2,100 |
| United Bank of India | 1,600 |
| Punjab & Sind Bank | 750 |

**Advantages of Bank Mergers in current scenario :**

* Larger Bank is capable of facing global competition
* The merger will reduce the cost of banking operation
* Merger will result in better NPA and Risk management
* Merger will help in improving the professional standards
* Decisions on High Lending requirements can be taken promptly
* For the bank, retaining and enhancing its identity as a larger bank becomes easier. After the merger, benefits of merger are enormous and the biggest is generation of a brand new customer base, empowering of business, increased hold in the market share, opportunity of technology upgrade. Thus overall it proves to be beneficial to the overall Economy
* Provides better efficiency ratio for business operations as well as banking operations which is beneficial for the economy
* Minimization of overall risk is there due to mergers and acquisitions which is always good from the business point of view.

* Leads to increase in profitability and helps in raising the standard of living which is absolutely crucial for a growing economy like India.
* Chances of survival of underperforming banks increases hence customer trust remains intact which is vital for the Economy. The weaker bank gets merged into stronger one and gets the benefit of large scale operations.
* The objectives of financial inclusion and broadening the geographical reach of banking can be achieved better with the merger of large public sector banks and leveraging on their expertise.
* With the large scale expertise available in every sphere of banking operation, the scale of inefficiency which is more in case of small banks, will be minimized.
* The merger will help the geographically concentrated regionally present banks to expand their coverage
* Larger size of the Bank will help the merged banks to offer more products and services and help in integrated growth of the Banking sector.
* A larger bank can manage its short and long term liquidity better. There will not be any need for overnight borrowings in call money market and from RBI under Liquidity Adjustment Facility (LAF) and Marginal Standing Facility (MSF).
* In the global market, the Indian banks will gain greater recognition and higher rating.
* With a larger capital base and higher liquidity, the burden on the central government to recapitalize the public sector banks again and again will come down substantially.
* Multiple posts of CMD, ED, GM and Zonal Managers will be abolished, resulting in substantial financial savings
* Bank staff will be under single umbrella in regard to their service conditions and wages instead of facing disparities.
* Problems Arising due to Mergers & Acquisitions in Indian Banking. Most of the problems arising due to mergers and acquisitions are more emotional and social in nature than technical or managerial.

**The major problems which arise are :**

* Compliance needed in every decision which might not be favourable as thinking perspectives and risk-taking abilities of different organizations are different. It leads to friction and rift which, if not managed well may lead

to the downfall of the organization as a whole.

* Banks are merged only on papers. Their people and culture are difficult to change. It is a recipe for disaster as it leads to poor culture fit not ideal for the organization or the economy.
* Risk of failure increases if the executives are not committed enough in bringing the merger platforms together for the merging and taking over bank. Such failure may prove brutal for the Economy.
* Impact of customers on banking merger or acquisition is often quite emotional. If customer perception is not managed with frequent and careful communication it may lead to loss of business which is never good for the Economy.
* Managing Director of Federal Bank, V.A. Joseph is of the view that Co-existence of the big, medium and regional banks would be preferable in the present scenario. According to him most acquisitions in India were borne out of compulsions and over 90 per cent of past acquisitions had failed to achieve the objectives.
* Many banks focus on regional banking requirements. With the merger the very purpose of establishing the bank to cater to regional needs is lost.
* Large bank size may create more problems also. Large global banks had collapsed during the global financial crisis while smaller ones had survived the crisis due to their strengths and focus on micro aspects.
* With the merger, the weaknesses of the small banks are also transferred to the bigger bank.
* So far small scale losses and recapitalization could revive the capital base of small banks. Now if the giant shaped bank books huge loss or incurs high NPAs as it had been incurring, it will be difficult for the entire banking system to sustain.

**Important but to Remain under Watch**

Mergers are important for the consolidation and expansion purposes that is why in today's scenario many private sector banks are genuinely interested in mergers and acquisition. They are also crucial for Economy as they are most of the times successful in saving weak banks which fail in meeting expectations.Merger creates variety of problems which can cause great damage if the process of merging is not executed properly.If merging is needed it must be executed in a manner which leads

to an environment of trust and agreement among the people of both the organizations. If people, work culture and vision are blended together nicely, merging will definitely have synergic effects and create a win-win situation.

**References :**


a. Article by Vidyadhar Anaskar Banking Expert in Daily Lokmat dated 15th Nov.2019

b. Article by Tulajapurkar Secretary of banking employee association in Daily Lokmat dated 2nd oct 2019.

c. Documents published by Finance Ministry

d. Finance Minister's speech in Parliamentary House

e. Times of India. (Charts & Statistics)


◆◆◆

## कमळाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी स्मृति परिसंवाद (२०१८–१९) (वर्ष ५ थे)

विदर्भ अर्थशास्त्र परिषद, कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी, अमरावती आणि स्व. छगनलाल मुलजीभाई कढी कला महाविद्यालय, परतवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने कमळाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी स्मृति परिसंवाद दि. ८ जानेवारी २०१९ रोजी परतवाडा येथील स्व. छगनलाल मुलजीभाई कढी कला महाविद्यालय, परतवाडा येथे आयोजित केल्या गेला. स्मृति परिसंवादाचे हे पाचवे वर्ष होते.

'भारतीय शेतीच्या समस्या व वर्तमान दुष्काळ' या विषयावरील परिसंवादाचे अध्यक्ष डॉ.आर.बी.भांडवलकर, अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद यांनी भूषविले होते. या परिसंवादात डॉ. जयराम गायकवाड (अमरावती), डॉ. करणसिंग राजपूत (वणी) आणि डॉ. उमेश घोडेस्वार (अकोला) या तज्ञांनी सहभाग घेतला. शेतीच्या समस्या व वर्तमान दुष्काळ या विषयाच्या विविध पैलूंवर या तज्ञ व्यक्तींनी शास्त्रीय पद्धतीने प्रकाश टाकला. त्यातून विषयाचे महत्त्व आणि परिणाम ठळकपणे श्रोत्यांच्या लक्षात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

कार्यक्रमास विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. अंजली कुळकर्णी, सचिव डॉ. राजेश चव्हाण (अमरावती विभाग), डॉ विठ्ठल घिनमिने (नागपूर विभाग), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद बावने आणि कौटिल्य ज्ञान प्रबोधनीचे संचालक डॉ. दि.व्यं.जहागिरदार, सचिव डॉ. प्रशांत हरमकर तसेच अन्य महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिसंवाद यशस्वी करण्यासाठी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनचे सचिव श्री. श्रीपादभाऊ तारे, कढी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद, कर्मचारी बंधू या सर्वांनी विशेष प्रयत्न केलेत व हा परिसंवाद यशस्वी केला हे नमूद करावे लागेल.

# विदर्भ अर्थशास्त्र परिषद

## वार्षिक अधिवेशनांचे अध्यक्ष

| अ.क्र. | अधिवेशनाचे स्थळ | वर्ष | अधिवेशनाचे अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७०-७१ | डॉ. बी.आर. ढेकणे |
| २ | एन.एम.डी. महाविद्यालय, गोंदिया | १९७१-७२ | डॉ.सु.द. बाळ |
| ३ | भारतीय महाविद्यालय, अमरावती | १९७२-७३ | प्रा. के.आर. नाणेकर |
| ४ | श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला | १९७३-७४ | प्रा.ग.प्र. पिंपरकर |
| ५ | यशवंत महाविद्यालय, वर्धा | १९७४-७५ | प्राचार्य रा.ना. खर्चे |
| ६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | १९७५-७६ | डॉ. श्री.आ. देशपांडे |
| ७ | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा | १९७६-७७ | प्रा.आर.एम. जोशी |
| ८ | सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर | १९७७-७८ | डॉ.ए.पी. हरदास |
| ९ | एस.पी.एम महाविद्यालय, चिखली,जि. बुलढाणा. | १९७८-७९ | प्रा. ए.एन. लोथे |
| १० | बाबाजी दाते कला वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ | १९७९-८० | प्रा.एस.आर. ओझरकर |
| ११ | धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर | १९८१-८२ | डॉ.एस.एल.लोकरे |
| १२ | आदर्श महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, जि.अमरावती. | १९८२-८३ | प्रा.एस.ए.पाटील |
| १३ | सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर. | १९८८-८९ | डॉ.एम.।.एस.शेणवाई |
| १४ | महात्मा फुले महाविद्यालय, वरूड, जि.अमरावती. | १९८९-९० | डॉ.एस.व्ही.खांदेवाले |
| १५ | यशवंत महाविद्यालय, सेलू, जि.वर्धा. | १९९०-९१ | प्रा.एस.व्ही.जांवधिया |
| १६ | फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि.यवतमाळ | १९९१-९२ | डॉ.के.आर.खेरडे |
| १७ | कर्मवीर महाविद्यालय, मूल | १९९२-९३ | डॉ.डी.एस.वखरे |
| १८ | शासकीय ज्ञान विज्ञान संस्था (विदर्भ महाविद्यालय) अमरावती. | १९९३-९४ | डॉ.सौ.सुनंदा सोनारीकर |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्लय, चिमूर. | १९९४-९५ | प्रा.व्ही.एस.कुळकर्णी |
| २० | जगदंबा महाविद्यालय, अचलपूर, जि.अमरावती. | १९९५-९६ | डॉ.सौ.अंजली कुळकर्णी |
| २१ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९६-९७ | प्रा.डी.आर.अग्रवाल |
| २२ | जी.एस.कॉलेज, खामगांव, जि.बुलढाणा. | १९९७-९८ | डॉ.आर.वाय.माहोरे |
| २३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | १९९८-९९ | डॉ.दि.व्यं.जहागिरदार |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय, नांदगांव (खंडेश्वर), जि.अमरावती. | १९९९-२००० | डॉ.व्ही.एम.वैद्य |
| २५ | सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालय, नागपूर. | २०००-०१ | प्रा.एस.एन.अंभोरे |
| २६ | कै.ना.अ.देशमुख महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अमरावती. | २००१-०२ | प्रा.के.ई.पाटील |
| २७ | लोक महाविद्यालय, वर्धा. | २००२-०३ | प्राचार्य एन.एफ.सुदा |
| २८ | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा. | २००३-०४ | प्राचार्य डॉ.आर.जी.भोयर |
| २९ | एस.एन.मोर महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा. | २००४-०५ | प्रा.एस.एस.देशमुख |
| ३० | श्री.म.द.भारती महाविद्यालय, आर्णी, जि.यवतमाळ. | २००५-०६ | डॉ.सौ.पुष्पा इंदूरकर |
| ३१ | बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, खापरखेडा, जि.नागपूर. | २००६-०७ | डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार |
| ३२ | श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती. | २००७-०८ | प्राचार्य डॉ.पुष्पा तायडे |
| ३३ | जनता महाविद्यालय, चंद्रपूर. | २००८-०९ | प्रा.कमलाकर हनवंते |
| ३४ | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव, जि.यवतमाळ | २००९-१० | डॉ.एस.पी.कुळकर्णी |
| ३५ | न्यु आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, वर्धा. | २०१०-११ | प्रा.एन.ए.पिस्तुलकर |
| ३६ | आप्पास्वामी महाविद्यालय, शेंदुरजना (अढाव), जि. वाशिम. | २०११-१२ | प्राचार्य डॉ.आर.जी.टाले |
| ३७ | वसंतराव नाईक कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर. | २०१२-१३ | डॉ.आर.आर.गव्हाळे |
| ३८ | इंदिरा गांधी कला विज्ञान महाविद्यालय, राळेगाव, जि.यवतमाळ | २०१३-१४ | प्राचार्य डॉ.संजय धनवटे |
| ३९. | शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी/मोर, जि.गोंदिया. | २०१४-१५ | प्राचार्य डॉ. वनिता चोरे |
| ४०. | बी.बी.आर्टस, एन.बी.कॉमर्स आणि बी.पी. सायन्स कॉलेज, दिग्रस, जि.यवतमाळ | २०१५-१६ | डॉ. विनायक देशपांडे |
| ४१. | विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (बिजेवाडा) ता. रामटेक, जि.नागपूर. | २०१६-१७ | डॉ. एच.आर.तिवारी |
| ४२. | जी.एस.टोम्पे महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अम. | २०१७-१८ | डॉ.जे.एम.काकडे |
| ४३. | भिवापूर महाविद्यालय, भिवापूर. जि.नागपूर. | २०१८-१९ | डॉ.आर.बी.भांडवलकर |
| ४४. | भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि.अमरावती. | २०१९-२० | डॉ. मृणालिनी फडणवीस |